सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, २० जून २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २२२ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी

**विचारपुष्प**



कोणतेही राष्ट्र शक्तीच्या अधिष्ठानावर जीवित असते. राष्ट्राचा पराक्रम कायम राहिला नाही तर धर्म आणि संस्कृतीदेखील नष्ट झाल्याशिवाय राहत नाही. तथापि, राष्ट्रीय शक्तीचे पुनर्जागरण आवश्यक आहे.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

## माजी मंत्री शिंगणेंच्या बंगल्यात स्फोट

**बुलढाणा** : शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांच्या येथील निवासस्थानी बुधवारी रात्री अचानक स्फोट झाला. त्यानंतर लागलेल्या आगीत शिंगणे यांच्या घरातील स्वयंपाक घरासह त्यातील वस्तू भस्मसात झाल्या. हा स्फोट फ्रीजच्या कॉम्प्रेसरमुळे झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# खामेनेई संपल्यावरच संघर्ष थांबणार

**हल्ल्यानंतर नेतान्याहू संतापले** | **इराणमध्ये विध्वंस करण्याचा इशारा** | **कारवाईसाठी लष्कराला दिली मोकळीक**

◆ **तेल अवीव, १९ जून**

इराणने दक्षिण इस्रायलच्या बेअरशेबा शहरावर गुरुवारी सकाळी ५.३० वाजताच्या सुमारास बॅलेस्टिक क्षेपणास्त्राने हल्ले केले. यातील एक क्षेपणास्त्र सोरोका रुग्णालयावर डागण्यात आले, यात रुग्ण व वैद्यकीय कर्मचाऱ्यांसह शेकडो नागरिक जखमी झाले. या हल्ल्यानंतर इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी अयातुल्ला अली खामेनेई यांचा खात्मा आणि इराणमध्ये विध्वंस करण्याचा इशारा दिला.यानंतर इस्रायली लष्कराच्या ४० लढाऊ विमानांनी इराणच्या विविध शहरात १०० पेक्षा अधिक हल्ले केले, यात एका अणूऊर्जा केंद्राचाही समावेश आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांची विनाअट शरण येण्याची मागणी धुडकावत खामेनेई यांनी अमेरिकेला संघर्षापासून दूर राहण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर काही तासातच इराणने इस्रायलची राजधानी तेल अवीव आणि बेअरशेबा शहरावर जोरदार हल्ले केले. इराणने डागलेले एक बॅलेस्टिक क्षेपणास्त्र बेअरशेबा शहरातील सोरोका रुग्णालयावर पडले, यानंतर झालेल्या स्फोटात शेकडो लोक जखमी झाले. हल्ल्यावेळी रुग्णालयात हजार रुग्ण भरती होते. बचाव पथकाने तातडीने रुग्णांना सुरक्षित स्थळी हलविल्याची माहिती संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी दिली. हल्ल्यानंतर जनतेला केलेल्या संबोधनात पंतप्रधान नेतान्याहू म्हणाले, इस्रायलवर झालेला आजचा हल्ला हा दहशतवादी कृत्य आहे, याची किंमत इराणला चुकवावी लागेल. हुकूमशाह अयातुल्ला खामेनेई याचा खात्मा केल्याशिवाय आता संघर्ष थांबणार नाही. मी लष्कराला कारवाई करण्याची पूर्ण मोकळीक दिली आहे. दरम्यान रशियाचे उपपराष्ट्रमंत्री सर्गेई रियाबको यांनी संघर्षात अमेरिकेने हस्तक्षेप करू नये अन्यथा याचे परिणाम त्यांना भोगावे लागेल. अमेरिका या संघर्षात उतरल्यास आम्ही इराणला उघड मदत करू, असा इशारा दिला आहे.

◀(वृत्तसंस्था)



इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात रुग्णालयाचे मोठे नुकसान झाले

> संघर्ष थांबविण्यासाठी अमेरिकेला शांतता कराराचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे इराणला त्यांचा अणुकार्यक्रम शांततेत चालवता येईल आणि इस्रायलची चिंतादेखील दूर होईल. संघर्षामुळे महायुद्धाचा धोका निर्माण झाला आहे.
>
> **- व्लादिमीर पुतिन**
> राष्ट्राध्यक्ष, रशिया

> इराणसोबत करार करण्यासाठी आता खूप उशिर झाला आहे, खामेनेई यांना इस्रायलवर केलेल्या हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल. त्यांना शरणागती पत्करल्याशिवाय पर्याय नाही. आमचे ४० हजार सैन्य तैनात आहे.
>
> **- डोनाल्ड ट्रम्प**
> राष्ट्राध्यक्ष, अमेरिका

### इराणची अनेक शहरे बेचिराख, ६३९ नागरिक ठार

इराणच्या हल्ल्यानंतर इस्रायलने पलटवार करीत तेहरानसह १३ शहरांवर ४० लढाऊ विमानांनी १०० हल्ले केले. यात तीन शहरे बेचिराख झाली. इस्रायलच्या हल्ल्यात इराणमध्ये ६३९ नागरिक ठार, तर १३९० जण जखमी आहे. इस्रायलने इराणच्या अणू कार्यक्रमासाठी महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या अराक हेवी वॉटर रिॲक्टरवर आणि लष्करी व हवाई तळांवरदेखील हल्ला केला.

# पुणे, रायगड, नाशिक येथे पावसाचे धूमशान

● **जगबुडीने इशारा पातळी ओलांडली; खडकवासला धरणातून २ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग**

**पुणे, १९ जून-**

पुणे शहरासह परिसरात गुरूवारी सकाळपासून मुसळधार पाऊस सुरु आहे. खडकवासला धरण साखळी क्षेत्रात मोठा पाऊस सुरु आहे. खडकवासला धरणातून दुपारी १ वाजेपासून २000 क्युसेक पाण्याचा मुठा नदीत विसर्ग सुरू करण्यात आला आहे. हा विसर्ग पावसाची स्थिती पाहून कमी जास्त केली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे शहर परिसरात पूरस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. पुणे महानगरपालिका परिसरातील नागरिकांना यासंबंधी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने ही माहिती दिली आहे. तूर्त पुणे शहरातील भिडे पुलाला पाणी लागले आहे. पाऊस असाच राहील तर भिडे पूल पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. लोणावळा लगतच्या मळवली ते देवळे गावचा संपर्क तुटला आहे.



**इंद्रायणी नदीच्या पातळीत वाढ :** मुसळधार पावसामुळे आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराच्या पायऱ्यांपर्यंत इंद्रायणी नदीचे पाणी पोहोचले आहे. मंदिरात जाण्यासाठी भक्तिसोपान पुलाचा वापर केला जातो. मात्र आजचा पावसाचा जोरच एवढा आहे, की या पुलाचे रेलिंग तुटून वाहून गेले आहे. त्यामुळे मंदिरात पोहोचण्यासाठी वारकरी पाण्यातून वाट काढून जात आहेत. पोलिस त्यांना मदत करत आहेत. पण ही धोकादायक बाब असल्याचा दावा केला जात आहे. मावळ, लोणावळा, कामशेत या भागांमध्येही मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे पाण्याची पातळी हळूहळू वाढताना दिसत आहे.

### चांदखेड-आढले गावाचा संपर्क तुटला

पुण्याच्या मावळमधील चांदखेड गावालाही पावसाचा फटका बसला आहे. पावसामुळे चांदखेड-आढले गावाचा संपर्क तुटला आहे. या मार्गावरील ओढे-नाले आता प्रवाह सोडून वाहत आहेत. यामुळे रस्त्यांना नदीचे स्वरुप प्राप्त झाले आहे. कोकण पट्ट्यातील रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू झाला आहे. परिणामी, जिल्ह्यातील खेड व नागोठणे शहरात पूरस्थिती उद्भवली आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली असून, नदीचे पाणी थेट शहरातील मार्केट परिसरात शिरले आहे. मुसळधार पावसामुळे जिल्हा प्रशासनाने शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यात पावसाची संततधार कायम असल्यामुळे खडकवासला धरणातून २ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

### पोलिसांनी मानवी साखळी करून एका व्यक्तीस वाचवले

पुण्यात दुपारी २.३0 वा सुमारास मुळा मुठा नदीवरील पाण्याचा विसर्ग वाढणार असल्याची माहिती खराडी पोलिस ठाण्यास मिळाली होती. त्यानुसार सपोनि खांडेकर व पथक असे खराडीहून केशवनगरकडे जाणाऱ्या मुळा मुठा नदीवरील बंधाऱ्यावरील पुलावरील रस्ता बंद करण्यासाठी गेले होते. तेव्हा त्यांना नवाज खुर्शीद कोतवाल नामक व्यक्ती दुचाकीसह बंधाऱ्यावर मध्यभागी अडकल्याचे दिसून आला. त्यावेळी त्यास वाचवण्यासाठी फायर ब्रिगेडला पाचारण करण्यात आले. परंतु पाण्याचा प्रवाह सातत्याने वाढत होता. त्यामुळे सदर व्यक्ती वाहून जाण्याची भीती वाढली होती. पोलिसांनी स्वतःच्या जिवाची परवा न करता दोरीच्या साह्याने मानवी साखळी बनवून सदर व्यक्तीस सुरक्षित बाहेर काढून त्यांचे प्राण वाचविले. सध्या हा रस्ता बॅरिकेड्स लावून वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

### महाबळेश्वरमध्ये दरड कोसळून रस्ता खचला


सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर -तापोळा रस्त्यावर मुसळधार पावसामुळे दरड कोसळली आहे. यामुळे अवघ्या काही महिन्यांपूर्वी तयार करण्यात आलेला रस्ता तब्बल १0 फूट खचला आहे. रस्ता खचल्याने महाबळेश्वरहून तापोळ्याच्या दिशेने जाणारी वाहतूक ठप्प झाली आहे. या भागात मागील ३ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. सातारा जिल्ह्यातील पश्चिम भागात पावसाचा जोर ओसरला आहे. पण इथे अद्याप संततधार कायम आहे. कोयना धरणात ९ हजार क्युसेक वेगाने पाणी येत असून, धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. सध्या धरणातील पाणीसाठा २६ टीएमसीपर्यंत पोहोचल्याची माहिती आहे.

### नाशिक जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढला

नाशिक जिल्ह्यातही सकाळपासून पावसाचा जोर वाढला आहे. सकाळपासून शहरासह जिल्ह्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे नाशिकमध्ये गोदावरीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. रामकुंड व गोदा घाट परिसरात गोदावरीची पाणी पातळी वाढली आहे. आज नाशिकला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्रंबकेश्वरमध्येही पावसाला सुरूवात झाली आहे. काही भागात रस्त्यावर पावसाचे पाणी साचले आहे.

PATANJALI®

११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनी, आपण एक निरोगी,समृध्द आणि एक गौरवशाली भारत निर्माण करण्याचा संकल्प करूया.



जगातील सर्वात मोठे योग गुरु
योगऋषी स्वामी रामदेव महाराज सोबत योग सिखा

आस्था LIVE — रोज सकाळी : ५.३० ते ७.३० व रात्री ८.०० वाजता | INDIA TV — रोज सकाळी ७.५६ वाजता

योगमय भारत : स्वामी रामदेवजींचे आवाहन

या आपण सर्व या आंतरराष्ट्रीय योगदिवसावर स्वामीजींच्या नेतृत्वात योगव्रती आणि स्वदेशीव्रती होऊन एक निरोगी, समृध्द, संगठीत आणि परम वैभवशाली भारताचा निर्माण करू या.

गेल्या तीन दशकांत, पतंजलीच्या माध्यमातून, जगातील २00 देशांमधील २00 कोटींहून अधिक लोकांना रोगांपासून मुक्तता, व्यसनमुक्ती आणि आध्यात्मिक जागृतीचा मार्ग दाखवण्यात आला आहे. यामुळे केवळ लाखो करोडो रुपयेच वाचले नाही तर आध्यात्मिक सनातन जीवन प्रणालीचा पायाही घातला गेला.



'जागरणाचा देव'

देशातील या शिर्षस्थ संतसहित करोडो लोक स्वामीजी महाराजांना 'जागरणाचा देवता' या रुपात पहातात. ज्यांनी देशभरात २५ लाख किलोमीटर ची यात्रा करुन दहा करोडपेक्षा अधिक लोकांना योग प्रशिक्षण देऊन एक करोड निस्वार्थ आणि निष्काम सेवा करणारे निष्ठावान कार्यकर्ते तयार केले. पतंजलीचे हे प्रशिक्षित योगी बंधू भगिनी देशातील प्रत्येक गाव, शहर, गल्ली आणि मोहल्ल्यात एक लाखापेक्षा अधिक योग शिबिर आणि नियमित योग वर्गद्वारे लोकांना प्रकृती आणि जागरुकतेचा संदेश देत आहेत. सकाळी लवकर उठून योग करण्याची ही क्रांती भारताला नवीन दिशा देत आहे.

**नि:स्वार्थ भावनेने लोककल्याणाचे योगदान** आज देशभरातील १0,000 हून अधिक पतंजली केंद्रे आणि २५00 पात्र आणि प्रशिक्षित वैद्य यांच्या माध्यमातून आयुर्वेद आणि स्वदेशीच्या क्षेत्रात मोठी सेवा केली जात आहे. जर आपण या सेवेचे मूल्यांकन केले तर ते राष्ट्राच्या सेवेत एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त योगदान आहे. पतंजलीचा प्रत्येक प्रकल्प भारतमातेच्या सेवेसाठी समर्पित आहे.

**स्वदेशीद्वारे समृद्धी: संपत्तीद्वारे समृद्धी मिळवणे** ऑक्सफेम ग्लोबल युके आणि अन्य स्त्रोतांच्या सर्व्हेनुसार, १७६५ ते १९00 दरम्यान, परदेशी कंपन्या आणि आक्रमकांनी भारतातून १00 ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम लुटली आणि ही लूट आजही सुरू आहे. स्वदेशीच्या माध्यमातून ही लूट रोखण्यासाठी आणि भारताला आणखी आर्थिक महासत्तेकडे नेण्यासाठी स्वामीजी दृढनिश्चयी आहेत. Prosperity for Charity' पतंजलीने १00% लाभ भारतमातेच्या सेवेत लावला आहे आणि भविष्यातही ते सुरूच राहील.

**भारतीय शिक्षा बोर्डद्वारे मॅकालेच्या शिक्षण पध्दतीपासून मुक्ती** १८३५ पासून चालत आलेल्या मॅकालेच्या शिक्षण पध्दतीपासून देशाला मुक्त करण्यासाठी, पतंजली गुरुकुलम आणि आचार्यकुलम सारखे संस्थान उत्तम नैतिकता, चारित्र्य आणि नेतृत्वगुण असलेली मुले घडवत आहेत. शिवाय, लाखो शाळा भारतीय शिक्षण मंडळाशी संलग्न करून, आपण एक अखंड भारत निर्माण करत आहोत. तुमच्या मुलांना पतंजली गुरुकुलम, आधारकुलम पतंजली विश्वविद्यालयात शिक्षण द्या आणि तुमच्या शाळेला बीएसबीशी संलग्न करून राष्ट्र उभारणीच्या महान बलिदानात तुमची भूमिका बजावा.

**आरोग्य क्रांती: निरोगी भारत** चरक, सुश्रुत, धन्वंतरी आणि पतंजली सारख्या महान ऋषींच्या ज्ञानावर आधारित वैज्ञानिक संशोधनाच्या मदतीने पतंजली वेलनेस, योगग्राम आणि निरामयमसारखी जागतिक दर्जाची एकात्मिक उपचार केंद्रे स्थापन झाली आहेत. जिथे कोट्यवधी लोक निरोगी आणि स्वस्थ होत आहेत. स्वामीजींनी प्रत्येक व्यक्तीला स्वत: योगासने करण्याचे आणि दहा लोकांना शिकवण्याचे आवाहन केले आहे. जर १% लोकांनीही सकाळी योगासने केली आणि शाश्वत जीवनशैली स्वीकारली तर हेल्थ बजेट शून्य होऊ शकते.

**शोध आणि उपाय: विज्ञान आणि परंपरेचा संगम** ५00 हून अधिक शास्त्रज्ञांनी वर्षानुवर्षे संशोधन करून यकृत, मूत्रपिंड, हृदय, पोट आणि श्वसन प्रणालीशी संबंधित आजार बरे करणारी पतंजली औषधे विकसित केली आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये प्रकाशित झालेल्या ५,000 हून अधिक संशोधन प्रोटोकॉल आणि ५00 हून अधिक शोधनिबंधांनी आयुर्वेदाला संशोधन आणि संशोधनावर आधारित औषधांचा दाता बनवण्यात उत्तम काम केले आहे.

**योग धर्म आता युगधर्म झाला पाहिजे: सनातन हाच एकमेव उपाय आहे.** आज योग आणि सनातन धर्म ही जगाची गरज आहे. मानसिक आणि सांस्कृतिक अध:पतनाच्या काळात, पतंजली योग आणि सनातन मूल्यांच्या माध्यमातून नवीन दिशा देत आहे. **चला, योग धर्मावर आधारित सनातन जीवनशैलीचा अवलंब करूया.**

**पंच महाक्रांतीचा शंखनाद** शिक्षण, चिकित्सा आर्थिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी आणि आर्थिक आणि आध्यात्मिक भारत निर्माण करण्यासाठी, पतंजली एक लाखपेक्षा अधिक गायींची सेवा करत आहे आणि गोवंश वाचविण्याकरिता एका मोठ्या योजनेवर कार्य करीत आहे.

पतंजलीचे शुध्द आणि सात्त्विक उत्पादने घ्या
तुमच्या मुलांना आणि कुटुंबाला भेसळीच्या विषापासून वाचवा



# हिंदू जनआक्रोश मोर्चाच्यानिमित्ताने अक्कलकोटकर उतरले रस्त्यावर

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि १९ जून

धुल चटादो गद्दो को जिहादीची पायवाट कायमची बंद करण्यासाठी हा जनआक्रोश मोर्चा आहे. आताची लढाई वैचारिक लढाई आहे धर्मस्थळे उध्वस्त करण्याची शिकवण औरंग्याची होती. औरंग्यानी संभाजी राजांना आतोनात हाल करून मारले. पण संभाजी राजांनी धर्मांतर केले नाही. संभाजीराजांनी जीव दिला धर्म बदलला नाही. अकबर, निजाम, आदीलशहा सर्वांनी आक्रमण केले. पण आजही हिंदू ताठ मानेने उभे राहिले आहे त. महाराष्ट्रातील पहिले बसस्थानक आहे जिथे भक्तांना महिलाना मुक्कामाकरिता भक्त निवास आहे आणि तिथे जाण्यासाठी पायवाट मागता येथील बसस्थानकामागील अतिक्रमणावरही बुलडोजर फिरवणे गरजेचे आहे. बसस्थानकातून वाट पाऊल मागता हे लॅन्ड जिहाद आहे. चपळगाव येथील वन विभागातही जागा ढापुन बसले आहेत . मैंदर्गी येथील अतिक्रमण काढले नाही. सरकारी जागांचे संरक्षण करणे प्रशासनचे काम आहे. मैंदर्गीचे लव जिहाद बंद झाले पाहिजे. मुली सुरक्षित नाहीत. फोटो काढतात. पैसे मागणी करतात. प्रॉपर्टीमध्ये हक्क मागतात. मुलींना ब्लॅकमेल करतात. आई वडिलांना मुलीपासून दूर केले जाते आहे. लव्ह जिहादपासुन सावध रहा. गुलामगिरीची मानसिकता नष्ट करा. धर्मांतरविरोधात कायदा झाला पाहिजे. महाराष्ट्रात संवेदनशील सरकार आहे. धर्मांतराविरोधात लव्हजिहाद विरोधात कायदा झाला पाहिजे. लॅन्ड जिहाद विरोधात बुलडोजर फिरवला पाहिजे. मुझे नाम चाहिए ना इनाम चाहिए मुझे तो भगवा से सजा सारा हिंदुस्थान चाहिए.






श्रीस्वामी समर्थांच्या भुमीत लॅन्ड जिहादचा कट ? पायवाट मागणे म्हणजे अतिक्रमण घुसखोरी आणि महिलांच्या सुरक्षितेला धोका असा घणाघाती आरोप हिंदू जन आक्रोश मोर्चातून अक्कलकोटवासीयांनी व्यक्त केला आहे.

राजकारण आमच्यासाठी महत्वाचे नाही .आमच्यासाठी देव-देश-धर्म महत्वाचे आहे. यासाठी आम्ही एकत्रीत काम करू. यासाठी नागरिकांनी लोकशाही माध्यमातून सजग झाले पाहिजे असे पाऊलवाट तर चिमुटभर गव्हाला लावायला माती सुद्धा मिळणार नाही असा इशारा आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिला.

लॅन्ड जिहाद विरोधात अक्कलकोट वासीयांच्यावतीने भव्य जन आक्रोश मोर्चा आमदार गोपीचंद पडळकर, आमदार संग्राम जगताप, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह हजारो नागरिकांच्या उपस्थिती मध्ये मल्लीकार्जुन मंदिरापासुन काढण्यात आला. विजय कामगार चौक, कारंजा चौक, मेन रोड, फत्तेसिंह चौक, एवन चौक, बसस्थानक असा जनआक्रोश मोर्चाचे मार्गक्रमण झाले. मल्लीकार्जुन मंदिर समोर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. या सभेत आ. गोपीचंद पडळकर बोलत होते.

व्यासपीठावर आमदार गोपीचंद पडळकर, आ. संग्रामसिंह जगताप, आमदार सचिन कल्याणशेट्टी, मैंदर्गीचे निलकंठ महाराज, विरक्त मठाचे बसवलिंग महास्वामीजी, आमदार देवेंद्र कोठे आदिंची प्रमुख उपस्थिती होती.

अक्कलकोटला लाखो भाविक येतात. प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी सुसज्ज बसस्थानक मंजुर केले. बस्थानक पाडकाम होईपर्यंत हे लोक गप्प बसले. बसस्थानक पाडकाम झाल्यावर ही जागा आमची आहे. पुढे आमदार व्हायचे असेल तर बांधकाम करू नका असे सांगुन कोर्टात गेले. बसस्थानक हे काही विशिष्ट लोकांसाठी नाही. सर्वांसाठी आहे. याचवेळी मी अमदारकी आली काय अन गेली काय ठरवून लाखो भाविकांसाठी सुसज्ज बसस्थानक उभे करण्याचा निर्णय घेतला. जिदीने कामाला लागलो. विकासकामात मी कधीही जात-पात, धर्म मानत नाही. बसस्थानक सर्व समाजासाठी बांधले आहे. सर्व समाजाच्या भाविकांच्या सुरक्षितेकरिता पाठीशी राहणे माझा धर्म आहे. बसस्थानकातून वाट देणे म्हणजे सर्वांची सुरक्षा धोक्यात घालणे आहे. याकरिता दोन फुट काय दोन इंच देखील जागा कदापी जाऊ देणार नाही. राजकारणात जात पात आणणार नाही पण भाविकांच्या सर्व समाजाच्या सुरक्षितता अडचणीत आल्यास समाजाच्या पाठिशी उभा राहिन असा ठाम इशारा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी यावेळी बोलताना दिला.

आ. देवेंद्र कोठे यांनी देव देश धर्म याला प्राधान्य देऊन जिहादी वृतीला गाडून टाकू असे सांगितले. अक्कलकोट चे बसस्थानक वातानुकुलीन असणार आहे. अक्कलकोटच्या विकासासाठी खिळ घालणारे आपलेच लोक आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे . त्यांचा बंदोबस्त झाला पाहिजे .स्वारगेट सारखी वाईट घटना टाळायची असेल तर पायवाट देऊन प्रवाशी अक्कलकोट वासीयाची सुरक्षा धोक्यात आणणे आहे. जिहादी सारखी मानसीकता अक्कलकोटच्या विकासासाठी अडथळा ठरणारी आहे अशी घणाघाती टिका जनआक्रोश सभेत संग्रामसिंह जगताप यांनी केली. सर्वांनी निश्चय करा आपण मोर्चा संपल्यानंतर आपली भावना सोशल मिडियावर टाका. चूक दुरुस्त करा. प्रथम पायवाट बंद करा. भाविकांची सुरक्षिता धोक्यात आणू नका. मानसिकता खचू नये याची दक्षता घ्या. प्रत्येकांनी जागृतता ठेवा. सावध रहा सतर्क रहा. लव जिहाद, लॅन्ड जिहाद, वोट जिहाद यापासून सावध रहा. प्रत्येकांनी बसस्थानकाचे संरक्षणाचे काम प्रशासनाचे आहे.

बसस्थानकात यायचे तर समोरून या असे आवाहन आ. संग्रामसिंह जगताप यांनी केले. याप्रसंगी सिध्देश्वर कल्याणशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी, मोतीराम राठोड, उम `श पाटील, अप्पासाहेब पाटील, रामचंद्र आरवत, ऋषिकेश लोणारी, संतोष वगाले, चंद्रकांत दसले, विकास तळवार, नागराज कुंभार, बसवराज माशाळे, प्रसन्न हत्ते, शिवशरण जोजन, मोतीराम राठोड, शिवू वाले, अप्पासाहेब पाटील आदिसह नागरिक मोठ्या संख्येने जनआक्रोश मोर्चात सहभागी झाले होते.

## महत्त्वाचे...



## सोलापूर महानगरपालिकेतील कामगारांना नियमित करण्यासाठी प्रस्ताव पाठवा

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, दि. १९ जून-

सोलापूर महानगरपालिकेतील विविध खात्यांमध्ये १९९५ नंतर रुजू झालेल्या पण नियमित न झालेल्या २४९ कामगारांच्या सेवा नियमित करण्यासाठी महानगरपालिकेने ठरावासह परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठवावा, अशा सूचना विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी गुरुवारी दिल्या. विधिमंडळात उपाध्यक्ष बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे दूरदृश्य प्रणालीद्वारे तसेच अतिरिक्त आयुक्त रवी पवार, नगरविकास विभागाचे अवर सचिव वाणी, कामगारांचे प्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत सुमारे २४९ कामगार नियमित करण्यात आलेले नाहीत. महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेच्या पुढे गेला असल्याने अहवाल पाठविण्यात आला होता. परंतु, या काम गारांना नियमित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव ठरावासह शासनास पाठवण्यात यावा, असे उपाध्यक्ष बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

**विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचे निर्देश**

## मुंबई सीमाशुल्क विभागाकडून थायलंडहून आणलेला २४ कोटींचा गांजा जप्त

तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी
मुंबई, १९ जून :

मुंबई सीमाशुल्क विभागाने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील थायलंडहून तस्करी केलेले अवैध बाजारात २४.६६ कोटी रुपये मूल्य असलेला २४.९६ किलो हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. याप्रकरणी दोन प्रवाशांसह ताब्यात घेणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. बुधवारी गुप्त माहितीच्या आधारे,सीमा शुल्क अधिकाऱ्यांनी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर बँकॉकहून येणाऱ्या दोन प्रवाशांना अडवले. त्यांच्या सामानाची सखोल तपासणी केली असता व्हॅक्यूम-सील केलेल्या पॅकेजेसमध्ये लपवलेला हायड्रोपोनिक गांजा आढळून आला. यानंतर, एका समन्वित कारवाईत,हा माल घेण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या व्यक्तीला अटक करण्यात आली. या तिघांवर नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा, १९८५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक तपासात आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ तस्करी टोळीचा सहभाग असल्याचे दिसून येत आहे, त्यांच्या कारवायांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

## शरद नगर येथून २६ हजार रुपये किंमतीच्या शेळ्या व बोकड चोरट्याने पळविले

मंगळवेढा, दि.१९ जून-

शरदनगर येथे तारेच्या कम्पाऊंड मध्ये बांधलेल्या दोन शेळ्या व दोन बोकडे असा २६ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी औदुंबर गोडसे (रा.शरदनगर) यांच्या राहते घरा शेजारी तारेचे कम्पाऊंड असून यामध्ये काळ्या रंगाच्या दोन शेळ्या अंदाजे तीन वर्षाच्या, तसेच दोन बोकडे काळ्या रंगाची सहा महिन्याचे असे एकूण २६ हजार रुपये किंमतीचे शेळ्या व बोकड दि. १८ जून च्या पहाटे ४ च्या पुर्वी कोणी तरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीच्या संमतीवाचून चोरुन नेल्या असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## ३० वर्षीय महिलेचा विनयभंग; एकाविरुध्द गुन्हा दाखल

मंगळवेढा, दि.१९ जून-

तू मला खूप आवडतेस माझे सोबत चल असे म्हणून एका ३० वर्षीय महिलेच्या अंगाशी झोंबाझोबी करुन लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी अजित बाबू पुजारी (रा.जित्ती) याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील ३० वर्षीय पिडीत महिला दि.१८ रोजी रात्री ११.३०च्या दरम्यान वरील आरोपीने पिडीतेचा उजवा हात धरुन तू मला खूप आवडतेस माझे सोबत चल असे म्हणून मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार मोरे हे करीत आहेत. दरम्यान मंगळवेढा तालुक्यात महिलांचा विनयभंग करण्याच्या घटनेमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून एका आठवड्यात तब्बल सहा ते सात गुन्हे दाखल झाल्याने महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्न चिन्ह उभे राहिले आहे.




## बारा तासांचा ताजेपणा राहतो

सोलापूर, १९ जून-

भारतातील सर्वात विश्वासार्ह स्वच्छता ब्रँडपैकी एक असलेल्या डेटॉलने त्यांच्या प्रसिद्ध कोलोन फ्रेश आणि लाइम फ्रेश साबण प्रकारांमध्ये १२ तासांचा ताजेपणा देऊन वैयक्तिक काळजी घेण्याची वचनबद्धता वाढवली आहे. ही ऑफर वाढत्या ग्राहकांच्या गरजा- म्हणजेच तुम्ही सुरक्षित आहात आणि दिवसभर ताजेतवाने वाटत आहात हे समजल्यावर येणारा आत्मविश्वास तुम्हाला देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. डेटॉल फ्रेश ९९.९% दुर्गंधी निर्माण करणारे जंतू काढून टाकून आणि तुम्हाला १२ तास, ताजेपणा देते तसेच ही दरोजची अस्वस्थता दूर करते,जेणेकरून लोकं आत्मविश्वासाने आणि कोणत्याही संधीचा फायदा घेण्यास तयार असतील.वापरकर्त्यांना त्यांचे पाऊल पुढे टाकण्यास मदत करणारा एक दैनंदिन सहयोगी म्हणजे डेटॉल फ्रेश आहे.

# घंटागाडी : महापालिकेनेच स्वतःची यंत्रणा राबवावी !

जाग उठेंगे भाग्य हमारे,
स्वच्छ बनेगा ये भारत

स्वच्छतेचा जागर करणारे हे स्फूर्तीदायी गाणं घंटागाडीच्या माध्यमातून शहरवासीयांना ऐकायला मिळते मात्र सोलापूर शहराला संपूर्ण कचरा निर्मूलनाचे भाग्य अद्यापही लाभले नाही. शहरात शून्य कचरा ही संकल्पना एक स्वप्नच राहिले आहे. ''नगरसेवा हीच ईश सेवा'', ''स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर'' हे ब्रीद १०० टक्के वास्तवात उतरण्यात महापालिकेला यश आले नाही. ही एक शोकांतिका म्हणावी लागेल. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी सोलापूर शहरात ठिकठिकाणी कचरा कोंडाळे होते. महापालिकेच्या माध्यमातून ट्रक आणि ट्रॅक्टरमध्ये महापालिकेचे बिगारी कामगार कोंडाळ्यातील कचरा भरत असत. तो कचरा तुळजापूर नाका येथील कचरा डेपोत टाकला जात होता. त्या त्या भागात एक ट्रक सोबत कचरा उचलण्यासाठी साधारणतः पाच बिगारी ट्रकच्या तीन खेपा दिवसभरात करायचे. त्यानंतर कचरा कोंडाळ्याच्या जागी लोखंडी कंटेनर ठेवण्यात आले. थेट ते कंटेनर आरसी वाहनात कचरा टाकण्यात येत होता. महापालिकेच्या यंत्रणेकडून घनकचरा उचलण्याचे काम व्यवस्थित सुरू होते. महापालिकेची स्वतःची यंत्रणा होती. मात्र कालांतराने शहरातील कचरा संकलनासाठी घंटागाडी संकल्पना सुरु केली. घंटागाडीद्वारे कचरा संकलनाच्या कामाचे कंत्राटीकरण झाले. महापालिका आणि मक्तेदार यांच्यात करार करून घंटागाडीद्वारे घरोघरी जाऊन कचरा संकलन करण्याचा मक्ता दिला.

सुरुवातीच्या काळात समीक्षा कन्स्ट्रक्शन या कंपनीला घंटागाडीचा मक्ता देण्यात आला होता. त्यानंतर सध्या नाशिकच्या वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनीला हा मक्ता दिला आहे

विशेष म्हणजे, घंटागाडी म हापालिकेच्याच केवळ मक्तेदाराने कंत्राटी पद्धतीने कामगार पुरवणे आणि संकलनाचे नियोजन करणे अशाच पद्धतीने या मक्त्याचे स्वरूप आहे. स्मार्ट सिटी योजनेतून महापालिकेने सुमारे १२० घंटा गाड्या खरेदी केल्या. त्या मक्तेदाराच्या स्वाधीन केल्या. अलीकडच्या काळात महापालिकेने मक्तेदाराला दिलेल्या काही घंटागाड्या नादुरुस्त झाल्याने बंद आहेत. सोलापूर शहरातील घंटागाडीद्वारे कचरा संकलनाचे नियोजन कोलमडले. चार-पाच दिवस घंटागाडी येत नसल्याच्या तक्रारी वाढल्या. इतकेच नव्हे तर घंटागाडी कामगारांना मक्तेदार किमान वेतनानुसार वेतन देत नाही. पीएफ, ईएसआय लाभ नियमाप्रमाणे मिळत नाही. कामगारांचे आर्थिक शोषण होत आहे असा आरोप करत या घंटागाडी कामगारांनी पाण्याच्या टाकीवर शोले स्टाइलसह मागील वर्षात अनेक वेळा आंदोलने केली. मात्र वेळोवेळी ही आंदोलने जणू दडपण्यातच आली असल्याचे चित्र पाहायला मिळाले. भ्रष्टाचारा झाल्याचे आरोपही झाले.


सध्या सोलापूर महापालिकेने नाशिकच्या वॉटर ग्रेस प्रॉडक्ट कंपनीला एक जानेवारी २०२४ रोजी तीन वर्षाचा मक्ता दिला. त्यासाठी कचरा टेंडरचा करार ही करण्यात आला. २ हजार १५० रुपये प्रति टनाप्रमाणे कचरा संकलनाचा मक्ता देण्यात आला. पोट मक्तेदार नेमण्यात आले. ते करारात कुठेही नमूद नाही मात्र अप्रत्यक्ष ही पद्धत राबविण्यात आली. यामुळे घंटागाडी व्यवस्थापनाचा विस्कळीतपणा उघड झाला. घंटागाडी काम गारांचे आर्थिक शोषण होत असल्याची बाब पुढे आली आहे. याकडे महापालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष केले. शहरातील कचरा संकलनासाठी महापालिकेकडून १९० घंटागाड्या मक्तेदारास देणे आवश्यक आहे. त्याची पूर्तता झाली नाही. कचऱ्याच्या यंत्रणेमुळे अडचणी येतात.पाच पाच सहा दिवस घंटागाडी येत नसल्याच्या तक्रारी हद्दवाढ विभागातील नागरिकांकडून येतात.

सध्याच्या स्थितीत सोलापूर शहरात एकूण मार्ग १८३ , मार्गावरील घंटागाडी १८०, बंद घंटागाडी २५, आरसी वाहने १४, बंद आरसी वाहने ५, हुक लोडर दोन /एक बंद, कॅम्प्सूल आठ /दोन बंद, चालक व वाहक ५५० उपलब्ध आहेत. सध्या २५० ते २७० टन दैनंदिन कचरा संकलन करण्यात येते. तर सोलापूर शहराची आजची गरज पाहता शहरातील एकूण मार्ग २०० आहेत. एकूण घंटागाड्या २२५, कॅप्सूल १०, आरसी वाहने १५ , हुक लोडर ५, चालक व वाहक ६०० अशी यंत्रणा आवश्यक आहे. दैनंदिन कचरा संकलन ३०० ते ३२५ टन होणे गरजेचे आहे.

शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पाहायला मिळत असल्याचे आरोप होतात. यामुळे नवीन मक्तेदार नियुक्ती बाबतचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे दिसून येते. सध्याच्या मक्तेदाराने तोकड्या यंत्रणेमुळे काम करणे शक्य नसल्याचे पत्र दिले असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. परिणामी, मक्तेदार बदलण्याच्या हालचाली महापालिका पातळीवर सुरू असल्याचे चित्र आहे. वाहनांसह कचरा संकलना मक्ता देण्याचा विचार महापालिका स्तरावर सुरू असल्याचे दिसून येते. असे झाल्यास प्रति टन दर तीन हजारपेक्षा अधिक राहू शकतो. यामुळे खर्चात वाढ होणार आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध योजना अंतर्गत शासनाकडून निधी मिळतो. नागरिकांकडून घनकचरा व्यवस्थापन फी ६०० रुपये आकारली जाते.

नव्या मक्तेदाराला मक्ता देताना वाहनांसह कचरा संकलना मक्ता देण्याचा विचार महापालिका करीत आहे. मुळातच फसलेला घंटागाडी कंत्राटीकरणाचा प्रयोग म हापालिकेच्या आर्थिक हिताचा नसताना याचा अट्टाहास कशासाठी ? हे ''अर्थकारण'' अनाकलनीय आणि आश्चर्यकारक आहे. शून्य कचरा हा उद्देश सफल झाला नाही. तर मग कंत्राटीकरण का करायचे ? महापालिका इतकी मेहेरबान आणि उदार कशासाठी ? फसलेला कंत्राटीकरणाचा हा प्रयोग पुन्हा पुन्हा राबविणे चुकीचे आहे. नागरी आरोग्यासाठी ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. वास्तविकता महापालिका प्रशासनानेच ही यंत्रणा स्वतःहून राबविणे आवश्यक आहे. तेच महापालिकेच्या आर्थिक हिताचे ठरणार आहे. घनकचरा व्यवस्थापन हे अत्यावश्यक सेवेपैकी एक आहे. अत्यावश्यक सेवा पुरविणे ही महापालिकेची जबाबदारी आणि कर्तव्य आहे. यामुळे कचऱ्याचे कायमस्वरूपी नियोजन महापालिकेने करणे गरजेचे आहे. त्यासाठी घनकचरा व्यवस्थापनासाठी घंटागाडी कंत्राटीकरणाऐवजी पूर्वीप्रमाणेच सोलापूर म हापालिका प्रशासनाने कर्मचाऱ्यांसह स्वतःचीच सक्षम अशी यंत्रणा राबविणे नितांत गरजेचे आहे. त्यासाठी उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याची विशेष नियुक्ती करावी. तरच शून्य कचरा ही संकल्पना प्रामाणिकपणे वास्तवात उतरू शकेल. आणि स्वच्छता की ज्योत लेकर घर-घर जायेंगे, साफ़ सुथरी रौशनी में सब नहायेंगे, जाग उठेंगे भाग्य हमारे.....




## सदोष मनुष्यवधाखाली एकास ५ वर्षे सक्तमजुरी

**५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश**

तभा वृत्तसेवा
सोलापूर, दि. १९ जून -

सदोष मनुष्यवधाच्या अपराधाखाली पाटकूल (ता. मोहोळ) येथील तरूणास जिल्हा व सत्र न्यायाधीश वाय. ए. राणे यांनी ५ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. तसेच ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

अरूण जालिंदर गावडे (वय ३३, रा. पाटकूल, ता. मोहोळ) असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. सुनिल गोरखनाथ घोडके (वय ४६, रा. पाटकूल) असे मरण पावलेल्याचे नाव असून याबाबत अनिल गोरखनाथ घोडके (वय ४५, रा. पाटकूल) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील मयत सुनिल, आरोपी अरूण आणि फिर्यादी अनिल हे सर्वजण पाटकूल येथील रहिवासी आहेत.२६ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी अनिल, सुनिल व त्यांचा मुलगा संग्राम हे सर्वजण मिळून मोटारसायकलवरून त्यांच्या शेतात गेले होते. शेतातील ऊस कारखान्याला जाणार असल्याने शेतातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी खोलीतून खोऱ्या व टिकाव घेऊन आरोपी जालिंदर गावडे याच्या शेताच्या बांधालगत असलेल्या रस्त्यावर खड्डे बुजवत होते. त्यावेळी जालिंदर गावडे, अरूण गावडे, संतोष येडके, अक्षय येडके, रोहन येडके हे सर्वजण हातात काठ्या घेऊन पळत आले. त्यांनी आमच्या बांधाच्या कडेची माती घेऊन तुम्ही रस्त्यावरील खड्डे बुजवता का, आमचा बांध खचून जाईल असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी करू लागले. त्यावेळी अरूण गावडे याने सुनिल गावडे यांच्या डोक्यात टीकाव मारला, त्यावेळी सुनिल खाली पडले. त्यामुळे अनिल व संग्राम हे सोडविण्यासाठी गेले असता त्यांना इतर आरोपींनी हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. जखमी झालेल्या सुनिल यांना उपचारासाठी दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्यांस मृत घोषित केले. याबाबत मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले. याप्रकरणी सरकारपक्षाच्यावतीने ११ साक्षीदार तपासण्यात आले. अरण जालिंदर गावडे यास जन्मठेप तर रोहन संतोष येडके, अक्षय संतोष येडके, जालिंदर विठोबा गावडे हे तिघे निर्दोष सुटले आहेत. याप्रकरणी सरकारपक्षाच्यावतीने अँड. प्रदीपसिंग रजपूत तर आरोपींच्या वतीने अँड. धनंजय माने यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलिस शिपाई पवार यांनी काम पाहिले.

## एका महिलेस बेदम मारहाण प्रकरणी एका विरुध्द गुन्हा दाखल

मंगळवेढा दि.१९ जून-

येळगी येथे एका ४० वर्षीय महिलेस घरासमोर येवून शिवीगाळी करुन तुम्ही माझे काय करणार आहात? असे म्हणून लाकडी काठीने बेदम मारहाण केल्या प्रकरणी बिराप्पा मणगेनी याच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी कस्तुराबाई पारे ह्या दि.१६ जून रोजी सकाळी १० वाजता घरी असताना आरोपी बिराप्पा पारे याने घरासमोर येवून शिवीगाळी करत तुम्ही माझे काय करणार आहात? तुम्हाला बघतोच असे म्हणून फिर्यादीस लाकडी काठी घेवून पाठीवर मारुन गंभीर जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीमध्ये म्हटले आहे. अधिक तपास पोलीस हवालदार काळे हे करीत आहेत.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# महाराष्ट्राने वेगाने रंग बदलणारा सरडा पाहिला

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

**मुंबई, दि. १९ जून -**
एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही शाब्दिक हल्ला चढवला. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्राने वेगाने रंग बदलणारा सरडा पाहिला आहे. हे मी नाही तर त्यांचेच नातेवाईक आणि सगेसोयरे सांगत असल्याचेही ते म्हणालेत. सत्तेसाठी लाचारी पत्करली आणि कंबरेचे डोक्याला गुंडाळले. शिवसेनेच्या मतदारांशी, बाळासाहेबांशी आणि बाळासाहेबांच्या विचारांशी त्यांनी विश्वासघात केला. मराठी माणसाचा, हिंदुत्वाचा विश्वासघात केला.

पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर कठोर कारवाई केली. ऑपरेशन सिंदूर राबवून सरकारने पाकिस्तानला आपली जागा दाखवण्याचे काम केले. पण काही नेते सरकारला कायम आपले किती क्षेपणास्त्र पाडले? किती नुकसान झाले? हेच विचारत होते. त्यांनी भारतीय लष्कराच्या पराक्रमावर शंका उपस्थित केली. भारताच्या पंतप्रधानांवर शंका उपस्थित केली. लष्कराच्या पराक्रमावर त्यांना शाबासकी देण्याचे सोडून उलट ते त्यांच्यावर अविश्वास व्यक्त करत आहेत. देशात राहून ही लोक पाकिस्तानची भाषा बोलत आहेत. हे देशप्रेम नाही, तर देशद्रोह असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तुफान फटकेबाजी केली. ते शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.




### नुसताच शोर, मनगटात नाही जोर

शिंदे म्हणाले- वाघाचं कातडं पांघरून कुणीही वाघ होत नाही. त्याला मनगटात जोर लागतो. आणि तोंडात दम असून चालत नाही तर मनगटात दम लागतो. तो फक्त आमच्या शिवसेनेत आहे. अडीच वर्षाआधीच तुमचे टांगा पलटी घोडे फरार केले आम्ही. त्यामुळे तुम्ही आमच्या नादाला लागू नका. धर्मवीर आनंद दिघे यांच्या तालमीतला हा एकनाथ शिंदे आहे. आम्ही कुणाला छेडत नाही आणि आम्हाला कुणी छेडल तर आम्ही त्याला सोडत नाही.

### राहुल गांधी पाकिस्तानात हिरो; अनब देशात झीरो

एकनाथ शिंदे म्हणाले- लष्कराच्या पराक्रमावर त्यांना शाबासकी देणे सोडून त्यांच्यावर अविश्वास व्यक्त करत आहेत. किती नुकसान झाले हे विचारत आहेत. देशात राहून पाकिस्तानची भाषा बोलत आहेत. हे करून का तुम्हाला पाकिस्तान-ए-इशारे मिळणार आहे का? बाळासाहेब असते तर अशा सगळ्यांचा कोर्ट मार्शलच केला असता. भाषणादरम्यान शिंदे यांनी राहुल गांधी यांचे वक्तव्यांचा पाकिस्तानने केलेल्या बातम्याही दाखवल्या. ते म्हणाले पाकिस्तानमध्ये तुम्ही हिरो तर देशात झीरो झाले आहात. हे देशप्रेम नाही तर देशद्रोह आहे.

### भारतीय लष्कराच्या पराक्रमावर शंका घेता

शिंदे म्हणाले- लष्करावर आणि पंतप्रधान मंत्र्यांवर त्यांना विश्वास नाही, पण त्यांना पाकिस्तानच्या अध्यक्षांवर विश्वास आहे. संपूर्ण भारतीय जनतेला ऑपरेशन सिंदूर आणि लष्करी सेनेबद्दल अभिमान आहे. बाळासाहेब असते तर मुक्तकंठाने त्यांनी शाबासकी दिली असती, पण ही कदरू माणसे आरोपाशिवाय करणार तरी काय?

# ठाकरेंना संपवायला निघालेल्यांचा नामोनिशाणही ठेवणार नाही

## उद्धव ठाकरेंचे एकनाथ शिंदेंना जाहीर आव्हान

**मुंबई, दि. १९ जून -**
कुणाला वाटत असेल की, शिवसेना प्रमुखांचा ब्रँड पुसुन टाकाल, तर तुमचे नामोनिशाण महाराष्ट्राच्या धर्तीवरून पुसुन टाकल्याशिवाय राहणार नाही. आज तर मी तयारीने उभा आहे, असे ते म्हणाले. तसेच नाना पाटेकरांच्या प्रहार चित्रपटातील कम ऑन किल मी... डॉयलॉग मारला. ते पुढे म्हणाले, असेल हिंमत तर या अंगावर. फक्त अंगावर येणार असाल, तर ॲम्ब्युलन्स घेऊन या. कारण येताना सरळ याला, जाताना आडवे होऊन जाल, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना जाहीर आव्हान दिले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसेनेचा वर्धापन दिन सोहळा सायन येथील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गट आणि भाजपवर जोरदार हल्ला चढवला. तसेच राज ठाकरेंसोबतच्या युतीबाबतही सकारात्मक व्यक्तव्य केले. महाराष्ट्राच्या आणि कार्यकर्त्यांच्या मनात जे आहे, ते मी करणारच, असे ते म्हणाले. यासोबतच ठाकरेंना संपवायला निघालेल्यांचा नामोनिशाणही ठेवणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. बातम्या सुरू आहेत. काय होणार. कसले. होणार का. होणार की नाही, होणार, कळेल ना. जे कार्यकर्त्यांच्या आणि राज्याच्या मनात आहे तेच मी करणार आहे, असे सूचक विधान उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंच्या युतीबाबत केले. पण ते होऊ नये, मराठी माणसांची शक्ती एकत्र येऊ नये म्हणून यांच्या मालकाचे नोकर इकडे तिकडे, हॉटेलमध्ये भेटी घेत आहेत. मुंबई पुन्हा मराठी माणसाच्या ताब्यात गेली तर यांच्या मालकाचे काय होणार? आम्ही मुंबई परत घेणारच आहोत. मुंबई पुन्हा मराठी माणसाच्या ताब्यात गेली, तर मालकाचे कसे होणार? अदाणीचे कसे होणार? त्यामुळे मराठी माणसाची शक्ती एकवटता कामा नये, यासाठी शेठजी नोकर आणि जे आज नालायकपणाने वर्धापन दिन साजरा करतात ते त्या शेठजींच्या नोकरांचे नोकर मुंबईत मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणून हे प्रयत्न करत आहेत, असा आरोप उद्धव ठाकरेंनी केला.



### अरे तुझी उंची केवढी, तुझा आवाज कसा? ठाकरेंची नीतेश राणेंवर टीका

हिंदू-मुस्लीम भांडण लावायचे काम सुरू आहे. एक बेडूक त्यासाठी ओरडतोच आहे. त्याला तेवढेच काम दिलेले आहे. अरे तुझी उंची केवढी, तुझा आवाज कसा? उंची पेंग्विनची, चाल बदकाची, आवाज कोंबडीचा, डोळे कोणासारखे आहेत, माहिती नाही. तुझी पार्श्वभूमी काय? वडिलांची पार्श्वभूमी काय? आणि आमच्यावर बोलतोस. एक कुणीतरी बाप ठरवा. आमची शिवसेना ५९ वर्षांची झाली, तरी सुद्धा आमचा नेता एकच आहे. भगवा एकच आहे. दैवत एकच आहे. विचार एकच आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी नीतेश राणे यांच्यावर टीका केली.

### हिंदीला आमचा विरोध नाही, पण सक्ती खपवून घेणार नाही; ठाकरेंचा इशारा

हिंदी सक्तीचा करण्याची गरज काय? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला. हिंदीला आमचा विरोध नाही, पण हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मराठी आणि अमराठीमध्ये भांडण लावण्याचा कार्यक्रम भाजपने केला. एकदा आपण भांडायला लागलो, म्हणजे हे भ्रष्टाचार करायला मोकळे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

# विमानतळांच्या आसपास सुरक्षा मानके कठोर करणार

अहमदाबाद, **दि. १९ जून -**
अपघातापासून धडा नागरी उड्डयन मंत्रालयातर्फे नवी नियमावली नवी दिल्ली, १९ जून १२ जूनच्या अहमदाबाद विमान अपघाताची भीषणता पाहता नागरी उड्डयन मंत्रालयाने विमान सुरक्षेसाठी धोका निर्माण करणाऱ्या संरचनावर नियंत्रण आणण्यासाठी नवे नियम जाहीर केले आहेत. अहमदाबाद विमानतळाजवळ झालेल्या अपघातानंतर सरकारने नवे नियम आणले आहेत. एअरक्राफ्ट (डोलिशन ऑफ ऑब्सट्रक्शन) नियम २०२५ नावाची अधिसूचना लवकरच जारी होणार आहे. या नियमांतर्गत विमानतळाच्या आसपासच्या परिसरात इमारतीच्या उंचीचा मुद्दा कटाक्षाने पाळला जाणार आहे. विमानतळाच्या आसपास वाजवीपेक्षा जास्त उंच इमारत असेल किंवा मोठे वृक्ष असतील तर त्यासंदर्भात तातडीने कारवाई करण्यात येईल. यासाठी संबंधित इमारतीच्या मालकांना नोटीस पाठवली जाईल. नोटीस पाठवल्यानंतर दोन महिन्यांच्या कालावधीत संबंधितांना यावर उपाययोजनांविषयी सविस्तर अहवाल पाठवावा लागेल.

# कर्णिक नगरात एकाच खोलीत दोघांनी घेतला गळफास

## सोलापुरचा मुलगा अन् कर्नाटकातील मुलगी

## गुरुवारी सायंकाळी उघडकीस आली घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून -**
शहरातील अक्कलकोट रोडवरील कर्णिक नगरातील एका घरामध्ये सोलापूरातील मड्डी वस्ती येथील तरूणाने अन् व्हिटीसी शिरूर (जि. बागलकोट, कर्नाटक) येथील मुलीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सायंकाळी उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

रोहित भिमु ठणकेदार (वय २३, रा. शांती नगर, मड्डी वस्ती, सोलापूर) आणि अश्विनी विरेश केशापुरे (वय २३, रा. व्हिटीसी शिरूर, जि. बागलकोट, कर्नाटक) अशी आत्महत्या केलेल्या दोघांची नावे आहेत. सोलापुरातील कर्णिक नगरातील घर नं. ६००-बी या घरातील पहिल्या माळावरील हॉलमध्ये छताला असलेल्या लोखंडी हुकला ओढणीच्या सहाय्याने रोहित व अश्विनी यांनी गळफास घेतल्याचे गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास दिसून आले. याबाबत एमआयडीसी पोलिसांना माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्यातील हवालदार एस एन गायकवाड यांनी दोघांनाही खाली उतरवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, दोघांचाही उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. राजेंद्र सैनी यांनी घोषित केले. या दोघांनीही एकाच ठिकाणी एकाचवेळी गळफास का घेतला असावा, गळफास घेणारे दोघेही वेगवेगळ्या ठिकाणचे असून त्या दोघांचा काय संबंध आहे. हे दोघे कर्णिक नगरातील घरात एकत्र कसे आले असे अनेक प्रश्न उपस्थित होते आहेत. मयत रोहित हा वाहनावर चालक असल्याचे त्याच्या ओळखीच्या व्यक्तींनी सांगितले.

घटना कळाल्यानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, सहा पोलिस निरीक्षक राधिका केंद्रे, पोलिस कर्मचारी घटनास्थळी गेले. पाहतो तर दोघांनीही गळफास घेतला होता. अश्विनी व रोहितेचे दोघांचेही मोबाईल बंद होते. पोलिसांनी दोघांचे मोबाईल चालू केले, त्या दोघांच्या आई वडीलांना निरोप दिला,त्यानंतर त्याच्या नातेवाईकांना घटनेविषयी माहिती मिळाली. घटनेची माहिती कळताच रोहिते आई भाऊ बहिण यांनी सिव्हिलमध्ये दाखल झाले होते. घटनास्थळी एक चिट्‌टी मिळाली आहें. तरूण तरूणीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे त्या प्रकरणाची एमआयडीसी पोलिसांत अकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली. मुलाच्या नातेवाईक मुलीस ओळखत नसल्याचे म्हणालेत, मुलीचे कोणीच तक्रार देण्यासाठी रात्री उशिरापर्यंत आलेले नव्हते. तपासाअंती कारवाई करण्यात येईल .अशी माहिती पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी दिली.





### चिठ्ठीतील मजकुर

आम्ही बहिण भाऊ आहोत, वडील मुलगी आहे, नात्यास संशय घेवू नये, कोणास ही जबाबदार धरू नये असा मजकूर चिठ्ठीत आहे.

# दहशतवाद हा मानवतेचा शत्रू

## पंतप्रधान मोदींचे क्रोएशियात संबोधन ● भारतीय पंतप्रधानांची पहिलीच भेट

◆ **झाग्रेब, १९ जून**
पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी कॅनडाहून क्रोएशियाला पोहोचले. पंतप्रधान मोदी यांनी येथे क्रोएशियाचे पंतप्रधान आंद्रेज प्लेनकोविक यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. यावेळी त्यांनी सांगितले की, दहशतवाद हा मानवतेचा शत्रू आहे. तो लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या शक्तींविरुद्ध आहे.

भारत आणि क्रोएशिया लोकशाही, कायद्याचे राज्य आणि विविधता यासारख्या सामायिक मूल्यांनी बांधलेले आहेत. क्रोएशियाचा हा दौरा जरी लहान असला, तरी तुमच्या शहरातील लोकांची संस्कृती, जीवनशैली आणि उदारपणा मी अनुभवला. मला येथे आपलेपणाची भावना जाणवली. आम्ही अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, ज्यामुळे भारत-क्रोएशिया भागीदारी आणखी मजबूत होईल आणि नवीन क्षेत्रात एकत्र काम करण्याचे मार्ग खुले होतील, अशी आशाही पंतप्रधानांनी व्यक्त केली.

क्रोएशियाचे पंतप्रधान आंद्रेज म्हणाले की, आम्ही भारतातील दहशतवादी हल्ल्याबद्दल चर्चा केली आणि दुःख व्यक्त केले. दहशतवादाविरुद्धच्या लढाईबद्दल पंतप्रधान मोदींचा संदेश आम्हाला चांगला समजला आहे. कारण तो जगासाठी सर्वात मोठा धोका आहे. यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्रोएशिया सरकारचे आभार मानले.

भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा आहे. येथे १७ हजारांहून अधिक भारतीय राहतात. क्रोएशियाला येण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी जी-७ शिखर परिषदेत पाहुणे राष्ट्र म्हणून सहभागी झाले होते. ◂(वृत्तसंस्था)


शिखर परिषदेला उपस्थित असलेले पंतप्रधान मोदी आणि क्रोएशियाचे पंतप्रधान आंद्रेज प्लेनकोविक

### मोदींच्या क्रोएशिया भेटीचे महत्त्व

क्रोएशिया हा युरोपियन युनियनचा सदस्य आहे आणि ही भेट युरोपियन देशांसोबत भागीदारी वाढवण्याच्या भारताच्या धोरणाचा एक भाग आहे. क्रोएशिया हा एक सागरी देश असल्याने भारत आणि क्रोएशिया सागरी आणि संरक्षण क्षेत्रातही सहकार्य करू शकतात. ही भेट अशा वेळी होत आहे जेव्हा भारत रशिया-युक्रेन युद्ध आणि पाश्चात्त्य देशांमध्ये संतुलन राखत आहे. अशा परिस्थितीत राजनैतिक दृष्टिकोनातून ही भेट महत्त्वाची आहे. ■

### मंत्रपठनाने मोदींचे स्वागत

भारतीय संस्कृतीला अनुलक्षून क्रोएशियामध्ये पंतप्रधान मोदींचे स्वागत अगदी पारंपरिक पद्धतीने करण्यात आले. राजधानी झाग्रेबमध्ये पंतप्रधान मोदींचे स्वागत करण्यासाठी मंत्रपठन करण्यात आले आणि भारतीय नृत्य सादर करण्यात आले. यानंतर पंतप्रधान मोदींनी भारतीय समुदायाच्या लोकांची भेट घेतली. या देशाला भेट देणारे ते पहिलेच भारतीय पंतप्रधान ठरले आहेत. ■

# अपघातग्रस्त विमानाचा ब्लॅक बॉक्स निकामी

## डेटा मिळवण्यासाठी अमेरिकेच्या प्रयोगशाळेत पाठविणार

◆ **अहमदाबाद, १९ जून**
एअर इंडियाच्या एआय-१७१ या बोईंग ७८७-८ ड्रीमलाईनर विमानाचा १२ जून रोजी अहमदाबादमधील मेघानीनगर भीषण अपघात झाला. या दुर्घटनेनंतर आता तपासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ब्लॅक बॉक्स बाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. अपघातानंतर २८ तासांनी ब्लॅक बॉक्स सापडला. सध्या यंत्रणेने प्राथमिक तपास सुरु केला असला तरी ब्लॅक बॉक्सला नुकसान झाल्यामुळे त्यातील डेटा बाहेर काढणे कठीण जात आहे. त्यामुळे हा ब्लॅक बॉक्स अमेरिकेतील नॅशनल ट्रान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्ड, वॉशिंग्टन येथे पाठवला जाऊ शकतो, अशी शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. जर ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवला गेला, तर भारतीय अधिकाऱ्यांची एक टीमही त्याच्यासोबत जाईल, जेणेकरून सर्व प्रोटोकॉलचे पालन सुनिश्चित करता येईल.




सीव्हीआरमार्फत पायलट्समधील शेवटचे संभाषण, चेतावण्या, अलार्म्स आणि इतर ध्वनी तपासले जातील. कॅप्टन सुमित सभरवाल आणि फर्स्ट ऑफिसर क्लाईव्ह कुंदर यांच्यातील संवाद, त्यांच्या प्रतिक्रिया आणि अलार्मला दिलेले प्रतिसाद यांची नोंद असण्याची शक्यता आहे. एफडीआर वापरून फ्लाइटचा सविस्तर प्रवास, वेग, उंची, तांत्रिक प्रतिक्रिया आणि इतर डेटा सादर केला जाईल. लंडनच्या गॅटविक विमानतळाच्या दिशेने निघालेल्या या विमानात २४२ प्रवासी होते. या दुर्घटनेत एकूण २७४ मृत्यू झाले आहेत. मात्र, अपघातात फक्त एकच प्रवासी बचावला. ◂(वृत्तसंस्था)

### काय आहे ब्लॅक बॉक्स?

ब्लॅक बॉक्स हा प्रत्यक्षात दोन यंत्रांचा समूह असतो कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर (सीव्हीआर) आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर (एफडीआर).

**सीव्हीआर** : पायलट्समधील संभाषण, कॉकपिटमधील इतर ध्वनी, एटीसीसोबतचे संवाद, तसेच यंत्रणांचे अलार्म्स इत्यादी २ तासांपर्यंत रेकॉर्ड करतो (एआय-१७१ विमान २०१४ मध्ये तयार झाले असल्याने त्यात २५ तासांची क्षमता नसल्याचे सांगितले जात आहे).

**एफडीआर** : उंची, वेग, दिशा, थ्रस्ट, विंग कंट्रोल, विमानाच्या हालचाली अशा हजारो तांत्रिक बाबींची माहिती रेकॉर्ड करतो. ■

# इराणमध्ये अडकलेले ११० विद्यार्थी परतले

**नवी दिल्ली, १९ जून**
इस्रायल-इराणमधील वाढत्या संघर्षाळे तेहरानमध्ये अडकलेल्या भारतीय समुहाला मायदेशी आणण्यासाठी ऑपरेश सिंधू सुरू करण्यात आले. भारतीय विद्यार्थांची पहिली तुकडी आर्मेनिया येथून विमानाने राजधानी दिल्ली येथील विमानतळावर पोहोचली. यात ११० विद्यार्थ्यांचा समावेश असून यातील ९० विद्यार्थी जम्मू-काश्मीरातील आहे. केंद्रीय राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी सांगितले की, युद्धग्रस्त इराणमध्ये अडकलेल्या ११० विद्यार्थ्यांना भारतीय दुतावासाने आर्मेनियाला सुरक्षित हवविले होते. त्यानंतर विमानाने गुरुवारी ते दिल्ली विमानतळावर पोहोचले. भारतीय समुहाला मायदेशी आणण्यासाठी आज पुन्हा एक विमान रवाना झाले आहे. आम्ही तुर्केमेनिस्तानला भारतीय नागरिकांना हलवण्यात येत आहे. इराणमध्ये सध्या ९ हजारपेक्षा अधिक भारतीय नागरिक राहत असून त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सुनिश्चित करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहे. भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी ऑपरेशन सिंध सुरू असून आवश्यकतेनुसार त्यांना आणण्यासाठी विमान पाठविले जाणार आहे. आम्ही तुर्कमेनिस्तान आणि आर्मेनियामधील सरकारांच्या पाठिंब्याबद्दल आभारी आहोत.

# कराराशिवाय गुंडाळली जी-७ परिषद

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या अनुपस्थितीने उद्दिष्टावर फेरले पाणी

टोरंटो, १९ जून
कॅनडात आयोजित दोन दिवसीय जी-७ शिखर परिषदेत विविध विषयांवर चर्चा झाली, पण मतभेदामुळे एकही संयुक्त करार झाला नसल्याने परिषदेच्या उद्दिष्टावर पाणी फेरले. करार न होण्यामागे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कारणीभूत ठरले. परिषदेत सहभागी होण्यासाठी आलेले ट्रम्प काही तासांतच महत्त्वाचे काम असल्याचे सांगत माघारी परतले. पर्यायाने जी-७ मधील महत्त्वाचा देश असलेला अमेरिकाच चर्चेत सहभागी न झाल्याने संयुक्त करार न होताच शिखर परिषदेची सांगता झाली आणि संघटनेतील सदस्य देशांचे मतभेद चव्हाट्यावर आले. मंगळवारी झालेल्या अंतिम सत्रांध्ये कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्यासह ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि जपानमधील त्यांच्या समकक्ष नेत्यांनी इराण-इस्रायल, रशिया-युक्रेन संघर्षासह प्रमुख मुद्यावर चर्चा केली. परंतु ट्रम्प यांच्या अनुपस्थितीमुळे प्रमुख मुद्यांवर करार करण्यात सदस्य देश अपयशी ठरले. यावेळी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्की आणि नाटोचे प्रमुख मार्क रुटे यांनी चर्चेत सहभाग घेतला. झेलेन्की यांनी आम्ही शांतता, बिनशर्त युद्धबंदीसाठी तयार असून रशियावर दबाव आणण्याची मागणी केली. यावर संघटनेच्या देशांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मात्र यासंदर्भात संयुक्त करार करण्यात ते अपयशी ठरले. अमेरिका वगळता सहा देशांच्या नेत्यांनी चीनने दुर्मिळ खनिजांवर लादलेल्या निर्यातबंदीवर चर्चा केली. जागतिक स्तरावर महत्त्वाच्या खनिजांच्या उपलब्धतेला धोका निर्माण करणाऱ्या धोरणांचा सामना करण्यासाठी वचनबद्ध असल्याचे स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# वनोपनिषदाचा विवेचक

नाती जोडणे कठीण असते असे म्हणतात. नाती टिकविणे तर महाकठीण! नवी नाती निर्माण करणे ही तर एक अशक्यप्राय गोष्ट असते. आजकाल अपार्टमेंट नावाच्या दरवाजाबंद खुराड्यात राहून त्यालाच आपले विश्व समजण्याची वृत्ती कदाचित नाईलाजाने असेल तरी वाढीस लागली. अशा काळात नाती जोडणे, नाती टिकविणे किंवा नवी नाती निर्माण करणे शक्य नाही. माणसाचे माणसाशी माणसासम वागणे हीदेखील एक बातमीच होऊ पाहात असून माणसाने तसे वागावे यासाठी ईश्वराकडे प्रार्थना करावी लागते. अशा परिस्थितीत माणसाने माणसाशी नाते जोडून माणसासम वागण्याची अपेक्षा तर धूसरच; पण मानवेतर सजीवांशी नाते जोडणे हा तर विचारही महाग होऊ पाहात आहे. मारुती चितमपल्ली नावाचा एक महान माणूस काळाच्या पडद्याआड जावा, हे मोठे नुकसानच म्हणावे लागेल. एकाच कुटुंबात जर तीन भावंडे असतील, तर तिघा भावंडांतील थोरल्या व धाकट्या भावांचे नाते दूरचे असते. कारण मधे एक भाऊ असतो. अशी आजकालच्या नातेसंबंधांची मानवी व्यवहारांतील स्थिती वर्णिली जात असते. त्यातील अतिशयोक्तीचा किंवा विनोदाचा भाग सोडला, तरी परस्परांसोबत असलेली नाती दुरावत चालल्याची एक खंत त्यामधून व्यक्त होत असते. माणसांचे माणसांशीच असलेले नाते अशारीतीने दुरावत चालले असेल, तर माणसाचे निसर्गाशी असलेले नाते पुन्हा जोडण्याचा गंभीर विचार केला तरी ते प्रत्यक्षात येणे फारसे सोपे नाही, असेच जाणवते. अशी खंत व्यक्त करणारी माणसे आसपास आहेत, पण विकासाचा मारा एवढा प्रबळ आहे की, त्याच्या लोंढ्यात वाहवत चालल्यावर असे विचार करण्यासही उसंत मिळत नाही आणि निसर्ग आणि माणूस यांच्यातील नाते जपण्याचा ध्यास असलेल्या काही मोजक्यांच्याच संख्येचा ऱ्हास होणे अधिकच क्लेशकारक ठरते. सध्या नेमकी हीच स्थिती असताना मारुती चितमपल्ली यांचे निधन व्हावे, हा समाजमनावरचा मोठा आघात ठरणार आहे.

मारुती चितमपल्ली यांनी निसर्गाशी नाते जोडले, ते टिकविले आणि अन्यांचेही नाते निसर्गाशी जडावे यासाठी आपले उभे आयुष्य अक्षरशः समर्पित केले. ते कार्य पूर्ण होण्याआधीच जगाचा निरोप घेताना त्यांच्या मनात याची खंत निश्चितच लागून राहिलेली असेल. हे काम सोपे नव्हते. त्यासाठी आधी अरण्याचे, जंगलांचे आणि वनांचे मन जाणून घेणे आवश्यक असते. त्यासाठी वनांचे वाचन करावे लागते, मारुती चितमपल्ली यांनी आयुष्यभर अरण्यवाचन केले आणि वनाचे मन माणसासमोर मोकळे केले पाहिजे या ध्यासाने विपुल लेखन करून माणूस व वने यांचे नाते जोडण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रामाणिक आणि सोज्वळ लेखनातून त्यांनी माणसाला जंगलांची, तिथल्या जीवनाची आणि निसर्गाच्या कहाणीची ओळख करून दिली, म्हणून आज त्यांच्या नसण्याची पोकळी प्रत्येकास जाणवते आहे हे खरे आहेच; पण ही पोकळी भरून काढणारा कुणी वारस सापडला नाही, तर त्यांची ती खंत कधीच संपणार नाही, याची जाणीव ठेवली तरच त्यांच्या कार्याला समाजाने, व्यवस्थेने आणि यंत्रणांनी मान्यता दिल्याचे स्पष्ट होईल. आपल्या उण्यापुऱ्या ९२ वर्षांच्या आयुष्यातील उमेदीचा संपूर्ण काळ त्यांनी अरण्यवाचनासाठी वाहून घेतला. या कामास त्यांनी एवढे समर्पित केले की, त्या काळातील त्यांची नोकरी हा त्यांच्या उपजीविकेच्या साधनापेक्षाही, निसर्गाशी नाते जोडण्याच्या त्यांच्या ध्यासाचे साधन ठरले होते. लौकिकार्थाने सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयातील पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची पावले अरण्य वाचनाच्या दिशेने चालू लागली. कोईम्बतूर, बंगळुरू, दिल्ली, कान्हा आदी ठिकाणी घेतलेल्या व्यावसायिक शिक्षणातून अरण्य वाचनाची लिपी जाणून घेतली. आत्मसात केलेल्या वनोपनिषदाचे विश्लेषण, विवेचन करण्यासाठी लेखन, भाषण आणि संवाद ही साधने महत्त्वाची मानून निसर्ग, वने, जंगल, वनातील जमाती आणि वन्यप्राण्यांच्या जीवनशैलीतून माणूस व निसर्ग यांच्या नात्याचे धागे शोधण्याचा एक अचंबित करणारा प्रयोग त्यांनी सुरू केला व मारुती चितमपल्ली आणि अरण्य हे एक अद्वैत होऊन गेले. भौतिक जीवनाशी एकरूप होताना, स्वार्थाव्यतिरिक्त अन्य सर्व भवतालाचा विसर पडण्याचा जमाना जोमात असताना, मारुती चितमपल्ली स्वतःसही विसरून गेले आणि अरण्याशी एकरूप झाले. गेल्या काही दशकांत विकासाचे वारे वेगवान होऊ लागले आहेत. त्यासाठी निसर्गावर करवती चालविल्या जात आहेत. जंगले नष्ट होत आहेत. हा विकास जेव्हापासून सुरू झाला, तेव्हाच वने आणि जंगले हाच ज्यांचा नैसर्गिक व हक्काचा अधिवास असतो, अशा वन्य प्राण्यांचा माणसावरील विश्वास कमी होत गेला असावा. अगोदरच माणसापासून दूर राहण्याची वृत्ती असलेल्या वन्य प्राण्यांचे माणसाशी वैर सुरू झाले. मानव व वन्यप्राण्यांच्या संघर्षाच्या कथा सुरू झाल्या आणि जंगलासोबतचे माणसाचे नाते तुटल्याच्या जाणिवा स्पष्ट होत गेल्या. जंगले जपणे गरजेचे आहे, असा कंठशोष सुरू झाला, पण त्यामागेही पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यास मानवी जीवन संकटग्रस्त होणार या भीतीचाच भाग मोठा होता. जंगलांच्या, अरण्यांच्या आश्रयाने हक्काने आपले अधिवास बनविणाऱ्या प्राण्यांच्या चिंतेस या भीतीमध्ये फारसा थारा नव्हता. अशा वेळी त्या जंगलांना, तेथील रहिवासी असलेल्या वन्यजिवांना, वनस्पतींना आणि तेथील पर्यावरणालाही माणसापर्यंत आपल्या व्यथा पोहोचविण्याची गरज वाटली असावी आणि मारुती चितमपल्ली यांच्या रूपाने आपल्याला अशा संवादाचे साधन सापडले या विचाराने निसर्ग, वने आणि अरण्येही सुखावली असावीत. अरण्य वाचनामुळे मन प्रगल्भ झालेल्या चितमपल्ली यांनी वनांची हीच वेदना जाणली; त्यासाठी रात्रंदिवस अरण्ये, जंगले, वनांमध्ये वणवण केली, तिथल्या आदिवासी कोरकू, गोंड, निहाल आणि अनेक जमातींची जीवनशैली, श्रद्धास्थाने, कथा, दंतकथाही जाणून घेतल्या आणि या सामग्रीतून सिद्ध झालेल्या साहित्यानिशी वनांच्या व्यथांची उपनिषदेच त्यांच्या लेखणीतून साकार झाली. वनदेवता, वृक्षदेवता, निसर्गदेवता या केवळ कल्पना नाहीत, तर तिथल्या जीवनशैलीचे ते एक वास्तव आहे. ते जाणून घेतले तर वृक्ष, वनस्पती आणि सृष्टीतील प्राणिमात्रांशी संवाद साधता येतो. याचे बीज आपल्या प्राचीन ग्रंथांतूनही आढळून येते, पण हेच ज्ञान आपल्याला पाश्चात्त्य अभ्यासकांनी दिल्यावर खरे वाटू लागते, ही त्यांची खंत होती. आपल्या लेखनातून हीच माहिती, ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचावे आणि वास्तवाचे भाव यावे यासाठी त्यांनी केलेले विपुल लेखन हा अद्भुत माहितीचा खजिना होता, असेच अनेकांस वाटले, पण तो केवळ करमणुकीसाठी किंवा निसर्गाच्या माहीत नसलेल्या असंख्य बाबींचा डांगोरा जनांसमोर पिटण्यापुरता मर्यादित नव्हता. या माहितीतून माणसाने निसर्गाशी तुटत चाललेले, दुरावत चाललेले नाते पुन्हा जोडावे, निसर्गाशी संवाद साधावा आणि विकासाच्या नावाने निसर्गाचा व नैसर्गिक पर्यावरणाचा ऱ्हास होऊन निसर्गावर जगणे निर्भर असलेल्या मानवेतरांचे जगणेही आश्वस्त करावे, ही त्यांची तळमळ होती. त्यासाठी त्यांनी आपली वाणी आणि लेखणी झिजविली, तरीही त्यांचे काम अपूर्णच राहिले. जल, वायू, वृक्ष, पक्षी आणि निसर्ग यांच्या जगण्याचे शास्त्र उलगडण्याचा त्यांचा संकल्प होता. शतकाच्या उंबरठ्यावरही, त्यासाठी ते झिजत राहिले, म्हणून ते 'अरण्यऋषी' ठरले. चितमपल्ली हे स्वर्गातील दिव्य वृक्षाला आलेल्या खास बहरातून उमललेले एक फूल होते. सुगंध उधळणाऱ्या वाऱ्यावर झुलत हे एकदा धरतीवर अवतरले आणि एकटेच रानात पडले; तिथेही ते निसर्गासोबत झुलत राहिले.

मन मोहवून टाकणारा सुगंध उधळत राहिले... ही वने, जंगले आणि अरण्ये हीच आपल्यासाठी प्रभूने निवडलेली रम्य उद्याने आहेत आणि तेच आपले आहे, अशा भावनेतून वनांशी नाते जोडणाऱ्या चितमपल्ली यांच्या तपश्चर्येतून तयार झालेले नव्या नात्यांचे धागे नव्याने जोडले जातील, तो खंतावलेल्या निसर्गाचा सुदिन ठरेल. केवळ कोणाच्या जाण्याने पोकळी निर्माण झाल्याच्या भावनेने उसासे सोडण्यापेक्षा, ती पोकळी भरून काढण्याची जबाबदारी पेलणारी मने निर्माण होणे ही चितमपल्ली यांच्याशी बोलणाऱ्या अरण्यांची अपेक्षा असेल. ती पूर्ण करण्यासाठी नाती जोडावी लागतील. माणसाने माणसाशी माणसासम वागावे, अशा अपेक्षेच्या काळात, माणसाने निसर्गाशी माणसासम वागावे, या अपेक्षेची भर पडली आहे. मारुती चितमपल्ली नावाच्या अरण्यऋषीने यासाठीच आयुष्य वेचले, म्हणून आपण त्यांचे ऋणी असायलाच हवे.

---

## जीवन जिज्ञासा

प्राचार्य प्र. श्री. डोरले

# महाभारत ते भारत (२१)

भारतीय साहित्यात 'महाभारत' या ग्रंथाचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. धर्म, नीती, व्यवहार, इतिहास, काव्य, समाजरचना, राजकारण, तत्त्वज्ञान या सर्व अंगांनी समृद्ध असलेला हा महान 'राष्ट्रीय ग्रंथ' आहे. आधुनिक परिस्थितीच्या संदर्भातही त्यात वर्णिलेली अनेक मौलिक शाश्वत सिद्धांतांची अनुभूती सहजपणे आपल्याला येते. मागील अनेक लेखांमधून आपण याचा पडताळा घेतला आहे. त्या संबंधात सन १९३३ साली महाभारत ग्रंथ संशोधन समिती स्थापन झाली होती. त्या समितीतील एक विद्वान, अभ्यासू आणि महाभारताचा सखोल अभ्यास असणारे दा. सा. यंदे हे आपले मत प्रकटन करताना म्हणतात, ''आपल्या सर्व आर्य ग्रंथात उपनिषद ग्रंथ तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने, श्रीमद् भागवत ग्रंथ भक्तिमार्गाच्या दृष्टीने जसे श्रेष्ठतर आहेत; त्याप्रमाणे व्यवहार, समाजकारण, राजकारण या तीनही दृष्टीने महाभारत ग्रंथ श्रेष्ठ आहे. भारतीय साहित्यात महाभारतासारखा दुसरा श्रेष्ठ ग्रंथ नाही, असे जे मत सद्यस्थितीत जगातील विद्वानांचे होऊन राहिले आहे, ते खरेच आहे. सांप्रतच्या आपत्तिकाळात मनाची शांती ठेवून कर्तव्य-जागृती करणारा महाभारतासारखा दुसरा ग्रंथ नाही. त्याचमुळे त्याचे अध्ययन, चिंतन आणि प्रसार करणे हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे.''

महाभारताचा, त्यातील नीतितत्त्वांचा परिस्थितिसापेक्ष विचार केला तर चक्रवती भरताच्या भारताचे आणि त्यात पुत्ररूपाने राहणाऱ्या, त्याचे वारसदार असलेल्या हिंदू समाजाची दुरवस्था, दैनावस्था कशामुळे झाली? याचे प्रत्यक्ष दर्शन घडते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्ता प्राप्त झालेल्या नवीन राज्यकर्त्यांनी महाभारतात वर्णिलेल्या शाश्वत सिद्धांतांशी फारकत घेऊन आधुनिक 'भारत' 'अ' न्यू नेशन इन मेकिंग'च्या भाडोत्री तत्त्वज्ञानाचा अंगीकार करून घडविण्याचा प्रयत्न केला. विचार दारिद्र्याने परिपूर्ण असलेल्या सामान्यजनांनी, भोळसटपणे विभूतिपूजेच्या आंधळ्या भक्तीने अनादिकाळापासून 'देवनिर्मितं देशं हिंदुस्थानं प्रचक्षते' अशी देवांनी निर्मित केलेली 'भूमी' अशा भारताच्या पारंपरिक निष्ठेचा त्याग करून महात्मा गांधी एका 'संतसादृश' विभूतीला 'राष्ट्राचा पिता' म्हणून स्वीकारले. तेथूनच भारताच्या दैवी अस्तित्वाला सूर्य आणि चंद्राला जसे ग्रहण लागते त्याप्रमाणे ग्रहणाचे वेध लागले. त्याचे 'खग्रास' ग्रहणात रूपांतर झाले, ज्यावेळी 'इंदिरा इज इंडिया' या दुर्दैवी घोषणेने भारतीय राजनीतीचे अंतरंग व्याप्त झाले. ग्रहणाचा मध्यान्ह काळ 'आय ॲम ऑक्सी- डेंटली बॉर्न ॲज हिंदू' (मुझे गधा कहो लेकिन हिंदू मत कहो) या वाक्यांनी आपला हिंदू धर्म, हिंदू संस्कृती, हिंदू परंपरा यांची उघड उघड नालस्ती, निंदा करणाऱ्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या कालखंडात व्यतीत झाला. त्यांच्या 'हिमालयीन ब्लंडर्स'मुळे झालेल्या चुकांची भीषण किंमत भरताच्या वारसदारांना अद्यापही चुकवावी लागते आहे. हे होणे स्वाभाविकच असते; त्याची कारणमीमांसा महाभारतात सहस्रावधी वर्षांपूर्वी महर्षी व्यासांनी केली आहे. त्याचे दर्शन त्यांनी विदूर आणि धृतराष्ट्र यांच्या संवादात घडविले आहे. ते असे- विदूर धृतराष्ट्राला म्हणतात- ''हे राजन! इंद्रियांवर ताबा नसलेले, उपभोगवादी, चंगळवादी, धर्माचा दुस्वास करणारे, अहंमन्य, चांगल्या लोकांचा चांगला सल्ला न मानणारे, दुसऱ्यांचा मोठेपणा, कर्तृत्व यांचा आदर न करणारे, आत्मलोब्ध म्हणजे स्वतःच्याच सुख-दुःखाला, कुटुंबाला महत्त्व देणारे, जपणारे, स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी राष्ट्राचाही अवमान करणारे असे लोक स्वतःच्या दूषित कर्मांनी बांधले जाऊन स्वतःबरोबर इतरांनाही संकटात, अडचणीत टाकतात. लक्षात ठेव की, वाळलेल्या काष्ठाशी मिसळल्यामुळे ओलेही जळते.''

**'शुष्केणार्द्र दहयते मिश्रभावात्**

या प्रकारच्या योग्यता नसलेल्या राजप्रमुखाभोवती मग स्वार्थी, हाजी हाजी करणाऱ्यांचा जमघट म्हणजे संच जमा होतो. ते स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी अशा राजप्रमुखाची खोटी नाही स्तुती करून त्याला खूश ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या खोट्या स्तुतिसुमनांची हुरळून गेलेला हा राजा, खूशमस्कऱ्यांचेच ऐकणारा होतो. त्याच्या मंत्रिमंडळातील अप्रिय पण हितकारक सल्ला देणाऱ्यांचे तो ऐकेनासा होतो. त्यांचा त्याग करतो. हे राजन! लक्षात ठेव की,

सुलभा : पुरुष राजन सततं प्रियवादिनः।
अप्रियस्य तु पंथ्यस्य वक्ता श्रोताः च दुर्लभः ॥१५॥

म्हणजे- 'हे राजन प्रिय बोलणारे नेहमी सुलभ म्हणजे पुष्कळ असतात, परंतु अप्रिय पण हितकर बोलणारा आणि ऐकणाराही दुर्मिळ असतो.' वरील स्पष्ट निर्देश देताना परखडपणे महात्मा विदुराच्या द्वारा महर्षी व्यासांनी एका दैवी गुणाने परिपूर्ण असलेला शाश्वत संदेश संपूर्ण भरताच्या वारसदारांसाठी दिला आहे; तो म्हणजे- बुद्धी कलुषित होऊन विनाश ओढवला असता अन्याय हाच न्यायासारखा दिसू लागून हृदयातून दूर जात नाही म्हणून बुद्धी कलुषित होऊ देऊ नये. कारण लक्षात घ्या, देव काही गुराख्याप्रमाणे हातात दंड घेऊन मनुष्याचे रक्षण करीत नाही तर ज्याचे रक्षण करण्याची त्यांची इच्छा असते त्याला ते चांगली बुद्धी देतात. त्याचसाठी श्रीसमर्थांनी त्यांच्या 'बुद्धि दे रघुनायका' काव्यरचनेत 'न लगे मजला कांही बुद्धि दे रघुनायका' असे म्हटले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महाभारताचा संदेश नूतन प्रस्थापित झालेले राज्यकर्ते विसरले. कलुषित झालेल्या बुद्धीने स्वार्थांध होऊन, मदांध होऊन राज्य कारभार करू लागले. देश, धर्म, संस्कृती, न्याय, नीती समाज रक्षण, स्त्रियांचे रक्षण, भूमीचे रक्षण, देशाच्या सरहद्दीचे रक्षण, प्रजेचे संरक्षण करण्याचा राजधर्म विसरले, धृतराष्ट्राप्रमाणे पुत्रमोहात, कन्या मोहात अडकले, अहिंसा परमोधर्माच्या नावाखाली, भंपक आणि भ्रांत असलेल्या हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या मृगजळामागे धावत सुटले. त्याचे दुष्परिणामाचे चटके सहन करीत भरताचे वंशज असलेल्या कोट्यवधी हिंदूंचेच अस्तित्व नष्ट होण्याच्या धोक्याच्या, विनाशाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले. पण भारताच्या संरक्षणाचा भार परमेश्वराने उचललेला आहे. त्यासाठी त्याने अनेक अवतार घेतले आहेत म्हणून स्वामी विवेकानंदांनी हिला 'देवभूमी' म्हटले आहे तर योगी अरविंदांनी भारताला 'गॉड चोझन लॅण्ड' म्हटले आहे. परमेश्वराच्या अस्तित्वाच्या काही रचना भारतीय तत्त्वज्ञानात मांडल्या आहेत. त्या म्हणजे व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी. यातील परमेश्वराचे 'समष्टी रूप' म्हणजे लोकशाही. तिचा आधार 'जनता.' म्हणूनच श्रीसमर्थांनी 'जन आणि जनार्दन यात नाही भिन्नपण' असे म्हटले आहे. भारतातील लोकशाहीच्या रूपाने अस्तित्वात असलेला परमेश्वर आणिबाणीनंतरच्या कालखंडात झालेल्या निवडणुकीच्या द्वारा प्रकट झाला. सत्तापिपासू इंदिरा गांधींची सत्ता निर्मूलन झाली, पण जनतेने 'कलुषित बुद्धी'ने वागण्यास प्रारंभ केला. त्यामुळे तिचेच अस्तित्व नष्ट होण्याचा प्रसंग आला. पण परमेश्वराने पुन्हा सद्बुद्धी दिली? देशात योग्य ते परिवर्तन घडवून आणले. त्या बुद्धिदात्या, आत्मस्थ परमेश्वराला साष्टांग प्रणिपात!.

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

---

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# 'राज' की बात...

राज्यात मुंबई, नागपूर, नाशिक महापालिकांसह अनेक महापालिकांच्या निवडणुका दिवाळीनंतर होण्याचे संकेत आहेत. या पाठोपाठ जिल्हा परिषद व नगर पालिकांच्याही निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांसाठी राजकीय तडजोडी आणि तोडफोड सुरू झाल्या आणि वादळं उठू लागली आहेत. निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आरोप करण्यास सुरुवात करून राजकीय रणधुमाळी सुरू केली आहे. सत्ताधारी आणि विरोधकांचे आरोप-प्रत्यारोप अपेक्षित आहेत. पण, या राजकीय वर्तुळात प्रत्येक निवडणुकांच्या तोंडावर एक व्यक्ती सत्तेत आणि विरोधात नसूनही कायम चर्चेत असते. प्रत्येक वेळी आपली भूमिका बदलवत गेल्याने त्यांना मतदार गंभीर घेत नसले, तरी निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे इंजिन पटरीवर आल्याशिवाय राहत नाही. मुंबई महानगरपालिका निवडणूक डोळ्यांपुढे ठेवत 'राज'कारणात पुन्हा 'टाळी'चा विषय सुरू झाला आहे. स्वतंत्रपणे स्वतःचा मुलगाही निवडून न आणू शकणारे राज ठाकरे मात्र निवडणुकांच्या तोंडावर भाव खाऊन जात आहेत. युवासेनेत होत असलेली घुमसट लक्षात घेता राज ठाकरे यांनी आपली वेगळी पार्टी उभी केली. तो धक्का बाळासाहेबांच्या जिव्हारी लागला. बाळासाहेबांनी शेवटचा श्वास घेतल्यानंतर अन्त्यसंस्कारापूर्वीच दोन्ही भावांनी एकत्र येण्यावर चर्चा सुरू झाल्या होत्या. त्या आजपर्यंत सुरू आहेत. एका राजकीय महत्त्वाकांक्षेने पछाडलेले दोघेही एकत्र कसे येतील, हा प्रश्नच आहे. तसे ढगं जमा होतात. पण, एकत्रीकरणाचा पाऊस पडत नाही. यात आपले महत्त्व कमी होईल अशी भीती काहींना सतावत असल्याने ती टाळी वाजत नाही अन् भावबंधकी तशीच चर्चेत राहते. मुंबई, ठाणे आणि नाशिक महानगर पालिकेच्या निवडणुकीनिमित्त पुन्हा ती चर्चा सुरू झाली. सुरुवातीला मुख्यमंत्री फडणवीस आणि राज ठाकरे यांची भेट चर्चेत असताना आता ठाकरे यांची शिवसेना शिंदे गटासोबत युतीची चर्चा सुरू झाली. शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त त्यावर बोलल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा नवे समीकरण तयार होण्याचे संकेत आहेत. मनसेचा मुंबई, ठाणे आणि नाशिकमध्ये बऱ्यापैकी प्रभाव होता. मात्र गेल्या काही वर्षांत पक्षाची गळती झाली, निवडणुकांतील कामगिरीही कमी झाली. उद्धव ठाकरे यांच्याशी मतभेद झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी बंड करून शिवसेनेने भाजपासोबत सत्ता स्थापन केली. त्यानंतर आता राज ठाकरे आणि शिंदे एकत्र आल्यास एक महत्त्वाचा राजकीय टप्पा ठरेल. ठाकरे आणि शिंदे दोघेही हिंदुत्ववादी भूमिका घेणारे आहेत. (उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी जी लाचारी केली ती अद्याप राज ठाकरे यांनी घेतली नाही.) शिंदे आणि मनसे एकत्र आल्यास मराठी मतांचे विभाजन थांबेल असा एक सूर आहे. विधानसभेत अवघा महाराष्ट्र काबू केल्यानंतर साहजिकच भारतीय जनता पार्टीला मुंबई महापालिकेवरून उद्धव ठाकरे यांना धोबीपछाड द्यायचे आहे. त्यामुळे हिंदुत्ववादी पक्षांची एकजूट हा त्यांच्यासाठी फायदेशीर पर्याय निवडल्या जाण्याचे शक्यता नाकारता येत नाही. मुंबई महानगर पालिका शिवसेनेचा गड आहे. पण, काँग्रेस आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाऊन उबाठा कमकुवत झाली आहे. उद्धव ठाकरे यांचा राजकीय आत्मविश्वास ढासळत चालला आहे. पुत्र कर्तव्य म्हणून आदित्यचीही फारशी हिंमत त्यांना नाही. संजय राऊत सध्या नरकातील स्वर्गातच गुंतून आहेत. आता त्यांना शिंदेंचे स्वप्न समजू लागले आहेत. आज सकाळी त्यांनी शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त झळकलेल्या जाहिरातीत बाळासाहेबांचा फोटो लावल्यावरून बाळासाहेबांचा तुमचा काय संबंध, असा प्रश्न विचारत तुम्ही मोदी आणि शाहांचे फोटो लावावे, असे शिंदेंना सुनावले.

याही पुढे जाऊन राऊत यांनी शिंदेंना शाह आणि पंतप्रधान मोदी यांचे स्वप्न पूर्ण करायचे असल्याचे सांगितले. स्वतःच्या पक्षापेक्षा त्यांना शिंदेच्या पक्षाची जास्त चिंता असल्याचे दिसते. एकनाथ शिंदे आणि राज ठाकरे एकत्र आल्यास त्याचा फटका पुन्हा उबाठाला बसल्याशिवाय राहणार नाही, हे सांगण्यासाठी आता कोण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. राज ठाकरे आणि शिंदे गटाची युती ही मराठी मतांचे विभाजन रोखण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. या युतीमुळे उद्धव ठाकरे यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण होणार. ही युती झाल्यास शरद पवार गट आणि काँग्रेसलासुद्धा जड जाणार आहे. राजकारणावर 'प्रभाव' आणि उद्धव ठाकरे यांचा 'अडकाव' करणारी ठरू शकते. शेवटी राजकारण म्हणजे बदल, समीकरण आणि सामंजस्याचा खेळ आहे. राज ठाकरे यांच्याकडे बाळासाहेबांसारखी वक्तृत्व शैली आणि कलात्मक ताकद आहे. पण, ते मतांमध्ये परिवर्तित करता आले नाही, हे वास्तव आहे. शेवटी 'एका'वर शून्य दहा होतातच ना... राज ठाकरेंचेही तसेच काहीसे समजा... निवडणुका आल्या की त्यांचे महत्त्व वाढते... अखेर, राज की बात है!


९८८१९०३७६५

---

## दखल

मोरेश्वर बडगे

# शरद पवारांचे आवडते आणि नावडते



'शरद पवार यांना समजायला शंभर वर्षे लागतील' असे उद्धव ठाकरे यांचे हनुमान खा. संजय राऊत यांचे एक प्रसिद्ध विधान आहे. काही बाबतीत हे विधान काहीसे खरे तर बहुतेक बाबतीत साफ खोटे आहे. शरद पवार म्हणजे निव्वळ संभ्रमावस्था आहे, भुलभुलय्या आहे. शरद पवार कोणाचेही नाहीत. असते तर त्यांनी आपल्या मुलीला किमान मुख्यमंत्री बनवले असते. मुलगी जाऊ द्या, पुतण्याला तरी मुख्यमंत्री केला असता. एकदा तर तशी संधी चालूनही आली होती. राष्ट्रवादी काँग्रेसला जास्त जागा मिळालेल्या असताना पवारांनी मुख्यमंत्रिपद काँग्रेसला दिले होते. त्यामुळे विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले होते. अजितदादांचा राग तेव्हापासून असणार. ही चर्चा करायचे कारण म्हणजे दोन राष्ट्रवादीच्या मनोमिलनाच्या चर्चा. गेल्या महिन्यात एका इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत शरद पवारांनी अजित पवारांबरोबर हातमिळवणी करण्यावरून पक्षात दोन मतप्रवाह असल्याचे मान्य केले होते. मात्र तो निर्णय पुतण्या अजितदादा आणि मुलगी सुप्रिया सुळे एकत्र बसून घेतील, असे सूचक विधानही त्यांनी केले होते. त्यावरून काका-पुतणे एकत्र येत असल्याच्या चर्चेचे गुऱ्हाळ गेले दीड-दोन महिने सुरू होते. चार दिवसांपूर्वी शरद पवारांची लहर फिरली. 'भाजपाबरोबर जाणाऱ्यांशी हातमिळवणी नाही' अशी स्पष्ट भूमिका त्यांनी पक्षाच्या मेळाव्यात मांडली. काका-पुतण्या यांच्या मनोमिलनाच्या चर्चांना यामुळे पूर्णविराम मिळाला.

''कोणाशीही संबंध ठेवा, पण भाजपाशी संबंध ठेवू नका. भाजपाशी संबंध ठेवणारा काँग्रेसच्या विचाराचा असू शकत नाही. आपल्याला संधिसाधूपणाच्या राजकारणाला प्रोत्साहित करायचे नाही'' असेही ते म्हणाले. ज्या शरद पवारांनी आयुष्यभर संधिसाधूपणाचेच राजकारण केले, ५०-५५ वर्षे महाराष्ट्राला संभ्रमावस्थेत ठेवले त्या पवारांनी विचारधारेच्या गोष्टी कराव्या यापेक्षा दुसरा कुठला विनोद असू शकतो? 'जिधर बम उधर हम' हीच ज्यांची विचारधारा राहिली ते शरद पवार आता शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेत आहेत. भाजपासोबत बसू नका असे आता म्हणता तर मग २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस सरकारला बाहेरून बिनशर्त पाठिंबा का दिला होता? उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेची ताकद कमी व्हावी, युतीमध्ये बेबनाव व्हावा म्हणून आपण हा डाव खेळला होता, असे स्पष्टीकरण नंतर त्यांनी दिले होते. उद्धव तेव्हाच सावध झाले नसते तर शिवसेना पवारांनी गुंडाळली असती. भाजपाचा विटाळ होता तर मग 'मध्यरात्रीचा शपथविधी' उरकायला याच काकाने आपल्या पुतण्याला का पाठवले होते? ही लबाडी कशापायी? १९७८ मध्ये काँग्रेसचेच आमदार फोडून वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर का खुपसला? १९९९ मध्ये काँग्रेसने पंतप्रधानकी दिली नाही म्हणून 'सोनिया गांधी विदेशी जन्माच्या आहेत' असे सांगत त्यांच्या विरोधात वेगळी काँग्रेस का काढली? तोच मुद्दा पुढे साडेचार वर्षांत गुंडाळून युपीए सरकारमध्ये कृषिमंत्री म्हणून का गेले? विचारधारा कशाशी खातात हे तरी पवारांना ठाऊक आहे का? दगाबाजीपलीकडे त्यांनी काय केले? पवारांसोबत राजकारण सुरू केलेले ममता बॅनर्जीसारखे अनेक नेते पुढे गेले. पवारांनी महाराष्ट्रात काड्या करण्यात स्वतःला धन्य मानले. पवारांना स्वतःच्या हिमतीवर कधीही ७१ पेक्षा जास्त आमदार आणि ९ पेक्षा जास्त खासदार निवडून आणता आले नाहीत. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकीत तर त्यांना जेमतेम १० आमदार आणि ८ खासदार निवडून आणता आले. शरद पवारांना आज भाजपा अस्पृश्य वाटतो. कारण त्यांच्या राजकारणाला तो सोयीचा नाही. गेल्या तीन निवडणुकांमध्ये महाराष्ट्र भाजपाच्या पाठीशी राहिला आहे. २०१९ च्या निवडणुकीत उद्धव ठाकरे या पवारांच्या नादी लागले नसते तर अडीच वर्षेही पवारांची सर्कस टिकली नसती. पवारांच्या संगतीत ठाकरे संपले. शरद पवार हे राजकीय समुद्रातला 'बर्म्युडा ट्रँगल' आहेत. त्यांच्याजवळ जे जे गेले ते संपले. हा इतिहास आहे. मात्र, हेच शरद पवार आज भाजपासोबत जाऊ नका म्हणत आहेत. कोण ऐकणार त्यांचे? पुतण्याने तीन वर्षांपूर्वीच काकाला सोडले. आज पुतण्या राज्याचा उपमुख्यमंत्री आहे, अर्थमंत्री आहे. बहुमतासाठी आमदार कमी पडतात म्हणून भाजपाने अजितदादांना जवळ घेतले अशातला भाग नाही. भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भविष्य आहे, याची खात्री पटल्याने लोक स्वतःहून भाजपाकडे आकृष्ट होत आहेत. पवार ज्यांच्या कुबड्या घेऊ पाहताहेत त्या काँग्रेसचे नेते भाजपामध्ये येत आहेत. काँग्रेसचे दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या नातसून जयश्री पाटील नुकत्याच भाजपामध्ये आल्या. आपले राजकारण केव्हाच संपले हे पवारांनाही कळते. पक्ष गुंडाळून त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात आले पाहिजे. मात्र, 'पडलो तरी टांग वर' असा त्यांचा खाक्या आहे. त्यामुळे आज वयाच्या ८४ व्या वर्षीही त्यांना धावपळ करावी लागतेय. पावसात भिजत सभा करावी लागतेय. तो त्यांचा नाईलाज आहे. फिरले नाहीत तर त्यांचा पक्ष भंगारात निघेल. आता तर पवार हे उद्धव सेनेच्याही फार उपयोगाचे उरलेले नाहीत. काँग्रेसही त्यांना दारात उभी करेल, अशी शक्यता कमीच आहे. महापालिका निवडणुकीत खरी लढाई मुंबई महापालिकेसाठी आहे. महाविकास आघाडीची पुंगी तिघांनी मागेच मोडून खाल्ली. वाजवायला आहे काय?

पवार एकटे पडत चालले आहेत. मुलीच्या हातात पक्ष देता येत नाही. कारण मुलीचं नेतृत्व कार्यकर्त्यांना मान्य नाही. सुप्रिया सुळे यांना पक्षात मिळत असलेले महत्त्व अजित पवारांना खुपत होते. त्यातून दोघांमध्ये सुप्त संघर्ष सुरू होता. अशा हवेत या भावा-बहिणीचे एकत्र येणे अशक्यच होते. तरीही पिता म्हणून शरद पवारांना आशा होती. पुतण्याला खेचून भाजपाच्या जवळ जाण्याचा पवारांचा गेम होता. इतकी वर्षे राजकारण करूनही आपण मुलीसाठी काही करू शकलो नाही, याचे एक बाप म्हणून पवारांना वैफल्य आले असणार. सुप्रियाचे करीअर लायनीवर लावून रिटायर व्हावे, असे त्यांच्या मनात असावे. पण नियतीला ते मंजूर नसावे. एकत्र यायचे तर पहिला फोन कोणी करायचा? बॉस कोण असेल? ठाकरे बंधूंच्या मनोमिलनातही हाच मोठा अडसर आहे. पहिला फोन कोणी करायचा? राज किंवा उद्धव यापैकी एकाने फोन केला तर दोन भावांच्या मनोमिलनाचा मार्ग प्रशस्त होऊ शकतो. पवारांच्या घरचे जे झाले थोडेफार तेच ठाकरे घराण्याचे होईल, असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे. पवार भाऊ-बहीण म्हणा किंवा ठाकरे बंधू म्हणा, भविष्याच्या शोधात आहेत. पण भाजपाशिवाय कोणाला भविष्य असेल? २०२९ च्या निवडणुकीत भाजपा स्वबळावर लोकांपुढे जाऊ शकतो. तसे झाले तर अजितदादा, सुप्रिया तसेच उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांचे काय हाल होतील, हे सांगायला कोण्या ज्योतिष्याची गरज नाही. चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागत आहेत. भविष्यातल्या निवडणुका निकालांचे ते ट्रेलर असेल.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वाचक पत्रे

### पर्यटनात अतिउत्साह नको

पुण्यात मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे पावसाळ्यात रोज अनेक पर्यटक भेट द्यायला येतात. येथील इंद्रायणी नदीवर एक पूल बांधलेला आहे. या नदीवरील पूल अचानक कोसळला अन् या अपघातात अनेक जणांनी आपला जीव गमावला. ज्या बातम्या वाचण्यात आल्या त्यानुसार हा पूल वाहतुकीसाठी योग्य नाही, अशी सूचना लावण्यात आली होती. आपण पाहतो आहे की, अलिकडे हौशी पर्यटकांची तसेच पर्यटकांची संख्या सर्वच पर्यटन स्थळी वाढली आहे. अनेक पर्यटकांना धबधब्याच्या, नदीच्या टोकावर जाऊन सेल्फी आणि फोटो काढण्याची हौस असते, तर काही जण धुक्यात नसते प्रयोग करतात. त्यांच्या या उत्साहामध्ये रस्ते चुकणे अथवा दरीत कोसळणे अशा अनेक घटना दरवर्षी घडतात. खरं तर पावसाळ्यातील पर्यटनात 'अतिउत्साह' दाखवू नये. सर्वच पर्यटनाच्या ठिकाणी पर्यटकांनी आपली वागणूक नियमानुसारच ठेवली पाहिजे. अनुचित घटना घडली की, सरकार तसेच स्थानिक प्रशासनाला दोष दिला जातो. पर्यटकांनी पावसाळी म्हणा की हिवाळी पर्यटकांनी निखळ आनंद मनसोक्त लुटावा; पण यात अतिरेक नसावा की ज्यामुळे निखळ आनंदाला गालबोट लागेल.

**अविनाश देशपांडे**/ ९२८४६७९६२३

● ● ● ●

### शहर स्वच्छतेकडे प्रशासनाने लक्ष द्यावे

'आपलं नागपूर! स्वच्छ नागपूर! सुंदर नागपूर!' असं लिहिलेली फलकं दर्शनी भागात दिसायची. आज ती दिसतात, पण त्यातली स्वच्छ आणि सुंदरता हरवलेली आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून पालिका प्रशासनाकडे मनपाचा कारभार सोपविला आहे. शासन बदलले तरी प्रशासनात असणारे कर्मचारी, अधिकारी तेच असतात. त्यांची मानसिकता काही केल्या बदलत नाही. गल्लोगल्ली कचऱ्यांची ढिगारं, रस्त्यांच्या कडेला बांधकाम साहित्य, अरुंद रस्त्यांवर विवाहाचे मंडप, बाजारपेठांच्या रस्त्यांवर फेरीवाल्यांची अतिक्रमणे या बाबी आता नित्याच्याच झाल्या आहेत. थातूरमातूर कारवाई केली की पालिका प्रशासनाची संपली जबाबदारी. आमच्या लहानपणी आम्ही रोज साफसफाई करणारे स्वच्छतादूत बघत होतो. आता ते दूत कुठे गेले? सफाई कर घेता मग रस्ते स्वच्छ का दिसत नाहीत?

**गजेंद्र डोळके**/नागपूर

● ● ● ●

### वेदना देणारे शब्द

भयंकर, भयानक, भीषण, थरार हे किती भीती निर्माण करणारे शब्द आहेत. ऐकून, वाचून वेदना होतात. तर ते त्या अनुभवातून जातात त्यांचे काय होत असेल या कल्पनेनेच अंग कापायला लागते. क्षणांत सर्व चित्र बदलते. मी स्वतः पावसाच्या थराराचा अनुभव घेतला आहे. एकदा रेल्वेत चार वर्षाच्या मुलीला घेऊन चार दिवस एकाच बोगीत, त्याच सीटवर, थांबलेली गाडी व तुफान पाऊस सुरू होता. रुळ काय प्लॅटफार्मच पाण्यात होते. चार दिवसांनी त्याच गाडीने नागपूरला सुखरूप घरी पोहोचले. पुन्हा वणीला नोकरी करत असताना पावसांमुळे अडकलो होतो.

खाजगी बसमध्ये जामच्या आधी चार दिवस बसमध्ये होतो. सतत जोरात पाऊस सुरूच होता. सोमवारी निघालेलो गुरुवारी रात्री ८ वाजता ८२ तासांनी वणीला पोहोचलो होतो. दोन्ही प्रवासात सोबत चांगली होती. हाल झाले नाही. पावसाळ्यात या दोन घटनांची नेहमीच आठवण येते. म्हणूनच कोणावर संकट आल्याचे समजले की, मला प्रवासातले सगळे अनुभव आठवतात.

**प्रा. अंजली पळणीटकर**/नागपूर

● ● ● ●

### सुसंस्कार घरातूनच मिळतात

'जे मुला-मुलींच्या जीवनाला देतात आकार त्यांना म्हणतात सुसंस्कार.' संस्कार आणि सुसंस्कार या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटत असल्या, तरी त्यात फरक आहे. संस्कार हे समाजाकडून, शाळेकडून, मित्रपरिवाराकडून मिळत असतात. मात्र, सुसंस्कार हे घरातील आई-बाबा तसेच आजी-आजोबा यांच्याकडूनच मिळतात. आई-बाबा हे सुसंस्काराचे जनक असतात. त्यांच्या प्रत्येक उपदेशात सुसंस्कार पेरलेले असतात.

मुला-मुलींसाठीच्या त्यांच्या प्रत्येक कृतीत विधायक, सकारात्मकता भरलेली असते. त्यांचे बोलणे, उपदेश, सल्ले, आदेश, सूचना या सुसंस्कारमयच असतात. मुला-मुलींना शिक्षण कोठूनही मिळू शकते. परंतु सुसंस्कार घरातून व विशेषतः आई-बाबा यांच्याकडूनच मिळतात. आईला सुसंस्कारांची जननी म्हणतात तर पिता हा सुसंस्कारांचा जनक व रचनाकार असतो. आई-बाबांपेक्षा सुसंस्कारांचा मोठा जनक या जगतात कोणीही नाही. म्हणून मुला-मुलींनी आपल्या जन्मदात्या आई-बाबाची आज्ञा, सूचना शिरोधार्य मानून त्यांनी दाखविलेल्या मार्गावरच चालावे व जीवनाला सत्यम्, शिवम्, सुंदरम आकार द्यावा.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

● ● ● ●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.



## मनपा आयुक्तांना भेटण्याच्या वेळेत बदल

**सोलापूर, दि.१९ जून-**
सोलापूर महापालिकेच्या वतीने बांधकाम परवानगी ही ऑनलाईन करण्यात आली आहे. नागरिकांना बीपीएमएसमधील प्रलंबित बांधकाम परवानगी बाबत तक्रार असल्यास आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना भेटण्यासाठी दर शुक्रवारी दुपारी ११ ते १२ वाजता वेळ देण्यात आली. शहरातील सर्व नागरिकांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.



## राष्ट्रीय खाद्य तेल बिया गोदामकरीता अर्ज करा

**सोलापूर, दि. १९ जून-**
राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया या नवीन अभियानाला मंजूरी दिली आहे. या अभियानांतर्गत सोयाबिन, करडई, सुर्यफुल या पिकांसाठी सोलापूर जिल्ह्याकरीता १ गोदाम बांधकाम ही बाब मंजूर आहे. अभियानांतर्गत २५० मे.टन क्षमतेचे गोदाम बांधकाम करण्यासाठी प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा रुपये १२.५० लाख यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील.अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर एसटीचे ब्रेक, वायफर अन् स्टिअरिंग तपास सुरू

## विभागात आणि आगारात एसटी महामंडळाच्या बसेस तपासणी मोहीमेला वेग

### सोलापूर विभागीय कार्यशाळेतून सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**
प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य घेऊन राज्यात परिवहन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी एस टी महामंडळाच्या वतीने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या खबरदारीच्या दृष्टिकोनातून बसेस तपासणीला सुरूवात झाली आहे. सोलापूर जिल्ह्यासह राज्यात पावसाचे आगमन झाले असून, पावसाचा जोर वाढण्या अगोदर ऐन पावसाळ्यात एसटीची कोणत्याही परिस्थितीत समस्या उद्भवू नये, त्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. त्यानिमित एसटी बसेसचे ब्रेक ऑईल, स्टिअरिंग, ब्रेक, विद्युत दिवे तपासले जात आहेत. सोलापूर जिल्ह्यातील गाव खेड्यांमध्ये मुसळधार पाऊस पडत असतो. त्यामुळे ठिकठिकाणच्या ओढे, नयांना पूर येत असतो. त्यामुळे प्रवास करत असलेल्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. तो टाळण्यासाठी एसटी म हामंडळातर्फे विभागीय कार्यशाळा तसेच विविध नऊ आगारांमध्ये तपासणी होत आहे. नैसर्गिक संकट येत नसले तरीही तेव्हा प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वाधिक पसंती दिली जाते. नदीला पूर आला असला, पुलावरुन पाणी वाहत असेल, तर सर्वप्रथम गाडी बाजूला घ्यावी. पूर ओसरल्यानंतर गाडी पुढे जाण्याच्या सूचना केल्या आहेत. त्याचप्रमाणे जास्त पावसाच्या भागात काचेवर दव साचल्याने समोरचे दिसत नाही. त्यामुळे एसटी सुरू करण्यापूर्वीच काचेवर पाणी टाकून कागदाने ती पुसून देखील घेतली जाते. त्यामुळे स्पष्ट दिसत असते. पण असे वारंवार करणे शक्य होत नाही.




### तपासणी नेहमीचीच; राज्य परिवहन

एसटी महामंडळाकडून वर्षभर बसेसची तपासणी मोहीम राबविली जाते. राज्यात सरासरी जूननंतर पाऊस सुरु होतो. त्याप्रमाणे ही मोहीम तीव्र केली जाते. सर्वच गाड्यांच्या वायपरची तपासणी केली जाते. त्यामध्ये किरकोळ विघाड असल्यास दुरुस्ती केली जातें. किंवा नवीनच वायपर बसविला जातो. कारण तो महत्वाचा घटक मानला जातो. त्याच प्रमाणे काही गाड्यांच्या छतावर असलेल्या पत्राच्या जोडावर पाणी आत येत असते. अशा गाड्यांमध्ये जोडावर विशिष्ट प्रकारच्या पट्ट्या ठोकल्या जातात. तसेच जिल्ह्यात निसरडे रस्ते होत असतात, त्यामुळे टायर जुना झालेला असल्याने नवीन टाकणे पसंत केले जाते.

**- शीतल बिराजदार,**
**यंत्र अभियंता, सोलापूर**

# योग दिनानिमित्त पर्यावरणीय उप्रकम राबविणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**
जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण -२ अंतर्गत शनिवार २१ जुन रोजी ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समित्या यांच्या सहकार्याने योग सत्रांबरोबरच वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम व समुदायाच्या पुढाकारातून पर्यावरणीय उपक्रम राबविण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनास येत्या शनिवारी २१ जून रोजी एक दशक पूर्ण होत आहे. यानिमित्त विविध कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली.



## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, देखभाल दुरुस्ती कक्ष जिल्हा परिषद सोलापूर

**निविदा सुचना सन २०२५-२६ क्र. ०१/२०२५-२०२६**

मा. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर हे मौजे भोसे व ३९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मंगळवेढाच्या पाणी उपसा केंद्र येथील ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करणेबाबत अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदारांकडून सन २०२५-२६ साठी नमुद केलेल्या कामाच्या सिलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागवित आहेत. कोऱ्या निविदा व अटी व शर्तीचा नमुना उपअभियंता (यांत्रिकी), देखभाल दुरुस्ती कक्ष, जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून दिनांक : २०/०६/२०२५ ते २६/०६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील व दिनांक : २७/०६/२०२५ रोजी दुपारी १४.०० पर्यंत स्विकारल्या जातील व शक्यतो त्याच दिवशी समोर हजर असणाऱ्या कंत्राटदारांसमोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मौजे भोसे व ३९ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना ता. मंगळवेढ्याच्या पाणी उपसा केंद्र येथील ट्रान्स्फॉर्मर दुरुस्त करणेबाबत | ८,३३,२१४/- | ८,५००/- | ५००/- | ३० दिवस |

१) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी, एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
२) कोऱ्या निविदा पोस्टाने मिळणार नाहीत.

**सही/-**
**उपअभियंता (यांत्रिकी)**
**देखभाल दुरुस्ती कक्ष**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

### नावात बदल

मी **ऋषिकेश शंकरराव देवधरे,** राहणार - शिवाजीनगर, बार्शी, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर मी माझे नावात **Rishikesh Shankarrao Devdhare** ऐवजी **Rushikesh Shankarrao Deodhare** असा बदल केलेला आहे. तसेच माझा मुलगा याच्या नावामध्ये **Gourav Rushikesh Devdhare** ऐवजी **Gaurav Rushikesh Deodhare** असा बदल केलेला आहे. सदरचा बदल हा मी नोटरीएट क्रमांक **597/2025** दि. **19/06/2025** अन्वये केलेला आहे.

### दाखला हरवला आहे

माझा श्री शिवाजी महाविद्यालय या कॉलेजचा इयत्ता १२ वी चा दाखला बार्शी ते धाराशिव प्रवासादरम्यान दि. २१ मे २०२५ रोजी हरवला आहे. ज्या कोणास सापडला असेल त्यांनी खालील ठिकाणी संपर्क करावा.
**संपर्क**
**प्रथमेश विजयकुमार गवारे,**
**रा. उपळाई रोड, गोंदिल प्लॉट,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९५२९७३१३७१**

### CHANGE IN NAME

I have change my old Name from **ASHOK KUMAR SANWAL RAM** to New Name as **ASHOK KUMAR SAVALARAM PATEL**. Hence for this declaration in future Old Name- **ASHOK KUMAR SANWAL RAM**, New Narne **ASHOK KUMAR SAVALARAM PATEL** Address- Maruti Agency, Gandhi Chauk, Akluj Post-Akluj, Taluka-Malshiras, Dist-Solapur Maharashtra- 413101, India, Mob.7387449092
**Affidavit No. 1272**
**Date 16/6/2025**

### नावात बदल

मी माझे जुने नाव **अशोक कुमार संवल राम** वरुन **अशोक कुमार सावळाराम पटेल** असे बदलले आहे म्हणून भविष्यात या घोषणेसाठी जुने नाव **अशोक कुमार संवल राम**, नवीन नाव **अशोक कुमार सावळाराम पटेल**. पत्ता- मारुती एजन्सी, गांधी चौक, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर, महाराष्ट्र, भारत.
पिन कोड नं.४१३१०१
मो.नं.७३८७४४९०९२
**प्रतिज्ञापत्र नं. १२७२**
**दि. १६/०६/२०२५**

### CHANGE IN NAME

I HAVE HEREBY DECLARED THAT MY OLD NAME SACHINKUMAR BHERULAL KOTHARI HAS BEEN CHANGED TO **SACHIN BHERULAL KOTHARI** RESIDING AT NEAR BANK OF INDIA, 28/1/A, BUDHWAR PETH, SOLAPUR, MAHARASHTRA-413002. KINDLY NOTE THE SAME.

## उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर यांचे कार्यालय

सिटी सर्वे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर - ४१३००३
Email - dysitysolapur@gmail.com

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम १०१ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ८६(ब) अन्वये

**जाहीर नोटीस**

**श्री. सिध्दारुढ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर --- वादी**
**विरुध्द**
**खालील तपशिलातील नमुद केलेले पतसंस्थेचे थकबाकीदार सभासद --- प्रतिवादी**

| अ.क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | १५३/२०२४ | रु. ७६,०६६/- | कर्जदार व जामिनदार | **सिध्दाराम मलकप्पा मडकी,** (रा. भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) **१) विश्वनाथ विरपाक्षप्पा झुजा,** (रा. भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) **२) सिध्दारुढ गगप्पा सातलगाव,** (रा. भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) |
| २. | १०५/२०२४ | रु. ३३,४०६/- | कर्जदार व जामिनदार | **१) धानम्मा संतोष पाताळे,** (रा.३४० भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) **२) महानदा शिवानंद पटणे,** (पत्ता-भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) **३) भौरम्मा बसवराज बळुरगी,** (पत्ता-भारतरत्न इंदिरा नगर, शरणमठाजवळ, सोलापुर-६.) |
| ३. | १०४/२०२४ | रु. ४०,९२१/- | जामिनदार | **१) श्रीमती गंगुबाई बाबुराव रुकारे** (पत्ता-१८३ संजय नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| ४. | १५३/२०२४ | रु. १५,४७१/- | कर्जदार व जामिनदार | **श्री. बसवराज शिवशरण मानसुनगी,** (रा. ६७३, भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर-६) **१) श्री. सिध्दाराम गुरुनाथ अष्टगी,** (रा. १०२, भारतरत्न इंदिरानगर, शरणमठाजवळ, सोलापुर) |
| ५. | १०२/२०२४ | रु. ३९,१३०/- | कर्जदार | **१) श्री. कपील राम ढब्बे,** (पत्ता - ८ नागेंद्र नगर, सुरभी शाळेजवळ, स्वागत नगर रोड, सोलापूर) |
| ६. | १५५/२०२४ | रु. ५४,९५३/- | कर्जदार व जामिनदार | **श्री. चौडप्पा चनबसप्पा सातलगांव,** (रा. ५७३, भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर-६) **१) श्री. महेश मल्लप्पा मणुरे,** (रा. भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर-६) |
| ७. | १५२/२०२४ | रु. ६०,६४५/- | कर्जदार | **१) अविनास कल्याणी मडके,** (रा. ५०९, आशा नगर, एमआयडीसी जवळ, सोलापूर) |
| ८. | १५४/२०२४ | रु. ४८,५८०/- | कर्जदार | **१) गुरुनाथ ईरसिध्दप्पा सिंदगी,** (रा. ५३८, आशा नगर, एमआयडीसी जवळ, सोलापूर) **२) रेवणसिध्द महालिंगप्पा कंचे, (मयत) वारसदार-कस्तुरबाई रेवणसिध्द कंचे** (रा. ७२, भारतरत्न इंदिरा नगर, सोलापूर) |

यात वादी पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या दाव्यातील वर नमुद केलेल्या प्रतिवादी यांचे राहते पत्यावर सुनावणी नोटीस पाठवली असता त्या व्यक्ती सदर पत्यावर राहत नसल्याने / पत्ता चुकीचा / घर बंद असल्याचे असता त्या व्यक्ती सदर पत्यावर राहत नसल्याने / पत्ता चुकीचा / घर बंद असल्याचे नमुद करुन नोटीस परत आली आहे. तरी सदर जाहीर नोटीशीद्वारे आपणास कळविण्यात येते की, उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वत: अथवा वकिलामार्फत मंगळवार दिनांक ०१/०७/२०२५ रोजी दुपारी ठिक १२.३० वाजता कागदपत्रांसह उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, सिटी सर्वे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर - ४१३००३ येथे हजर रहावे. या नोटीशीद्वारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/०६/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर नोटीस दिले असे.

**सही -**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज नं. ६२/२०२५
पुढील नेमलेली दि. १५/०७/२०२५
निशाणी नं. ६

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**
**मा. श्रीमती रेवती प्र. बागडे**
**५ वे सह दिवाणी न्यायाधिश क - स्तर, बार्शी**

१) **ओंकार संतोष धंगेकर,** वय २२ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **यश संतोष धंगेकर,** वय - १९ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **भाग्यश्री दशरथ धंगेकर,** वय - २० वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** **- सा.वाला**

ज्याअर्थी, सदर प्रकरणातील अर्जदार हे वर नमूद ठिकाणी कायमस्वरुपी राहण्यास असून यातील अर्जदार नं. १ ते २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून यातील अर्जदार नं. ३ हि त्यांची चुलत बहिण आहे. यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत पद्मीनी नामदेव धंगेकर यांचा मयत मुलगा संतोष नामदेव धंगेकर व यांचे मुले आहेत व अर्जदार नं. ३ ही मयत दशरथ नामदेव धंगेकर यांची मुलगी आहे.. तसेच यातील पद्मीनी नामदेव धंगेकर हे दि. ०१/०२/२०२५ रोजी मयत झालेले असून यातील पद्मीनी नामदेव धंगेकर यांची मुले नामे संतोष नामदेव धंगेकर, व दशरथ नामदेव धंगेकर हे असून ते दोघेही मयत असून त्यांना अर्जदाराशिवाय अन्य कोणीही वारस नाही. शासकीय कामासाठी अर्जदार यांना वरील मयत व्यक्ती पद्मीन नामदेव धंगेकर यांचे कायदेशीर वारस असले संदर्भात न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत पद्मीन नामदेव धंगेकर यांचे पश्चात इतर कोणाचा वारसा हक्क हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. १५/०७/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रसिध्दीकरण कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. १८/०६/२०२५

**यही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर बार्शी**

## नगर परिषद कार्यालय, नळदुर्ग

ता. तुळजापूर जि. धाराशिव

जावक क्र./४१७/नपन/बांध-३/२०२५ दि.१९/०६/२०२५

**- जाहिर निविदा -**

नळदुर्ग नगरपरिषदे मार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत नळदुर्ग ता. तुळजापूर येथे कै. वसंतराव नाईक उद्यान विकसीत करणे, अंदाजपत्रकीय किंमत (६३७९७६४) या कामासाठी ई निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक मान्यता प्राप्त व नोंदणीकृत कंत्राटदार यांनी आपली ई-निविदा दिनांक २०/०६/२०२५ ते २७/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विहीत मुदतीत सादर करावी. सदर निविदा शक्य झाल्यास दिनांक ३०/०६/२०२५ रोजी उघडण्यात येईल. निविदा विक्री व स्विकृतीची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व १८००३०७०२२३२ या टोल फ्री नंबरवर संपर्क साधावा. एखादी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवलेला आहे.

**स्वाक्षरीत/-**
**नगर अभियंता**
**नगर परिषद नळदुर्ग**

**स्वाक्षरीत/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद नळदुर्ग**

**स्वाक्षरीत/-**
**प्रशासक**
**नगर परिषद नळदुर्ग**

## जाहीर नोटीस

दि.१९/०६/२०२५

आगळगांव नं.१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. आगळगांव, ता. बार्शी जि. सोलापुर या सहकारी संस्थेच्या सभासदांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळामध्ये सर्वसाधारण मतदार संघ व अनुसुचीत जाती/जमाती या प्रवर्गातील रिक्त झालेल्या दोन जागा भरण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून सौ. एस.के. मुंढे, सहकारी अधिकारी श्रेणी-२. अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी यांचे अध्यक्षतेखाली दिनांक : २७/०६/२०२५ रोजी सकाळी ठीक ११:३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व संचालकांना संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

**सही/-**
**(सौ. एस.के. मुंढे)**
**अध्यासी अधिकारी तथा सहकारी श्रेणी-२ अधिन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बार्शी**

आगळगांव नं.१ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. आगळगांव, ता. बार्शी जि. सोलापूर

## जाहिर नोटीस

तमाम लॉकास विशेषतः मौजे कोरफळे, व परिसरातील लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे कोरफळे येथील गट नं. २२५/३ त्याचे क्षेत्र हे. ०१-४१ आर, आकार रु. ०१-६७ पैसे यापैकी श्री. संदीपान रामभाऊ सराफ यांच्या मालकीची मिळकत हे. ०१-१२ आर, आकार रु. ०१-३३ पैसे, या वर्णनाची संपूर्ण मिळकत ही संदीपान रामभाऊ सराफ यांच्या मालकीची असून सदर जमीन ही नवीन अविभाज्य शर्तीवर मा. शेतजमीन अधिकारी बार्शी यांचेकडून सिलींग कायदयाप्रमाणे सन १९८४ रोजी मिळालेली आहे. व तशी फेरफार क्रं. ७८६ ने ७/१२ उताऱ्यावर नोंद झालेली आहे. सन १९८४ पासून वर नमूद मिळकत ही संदीपान रामभाऊ सराफ हे मालकी हक्काने प्रत्यक्ष वहिवाटीत होते व आहेत. वर नमूद मिळकत ही संदीपान रामभाऊ सराफ यांनी आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरविले असून तसा व्यवहार ठरलेला आहे. तरी वर नमूद मिळकतीच्या संदर्भाने जर कोणाचा काही हितसंबंध निर्माण होत असेल अथवा वर नमूद मिळकतीचा संदर्भाने जर कोणाचा साठेखत, खरेदीखत, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, गहाणखत, साडी, चोळी, पोटगी, कर्ज रोखी, लिज, पेन्डंसी बैंक कर्ज ई. किंवा त्रयस्थाचे हितसंबंध निर्माण होतील. अशा स्वरुपाचा दस्त किंवा व्यवहार असेल तर ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी मुदतीत जर कोणाची काही हरकत आली नसेल तर आमचे अशिल सदर मिळकत निजोखीम खरेदी करतील. खरेदीखतानंतर कोणत्याही नक्रारीची आमचे अशिल दखल घेणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून अशी बोटीस दिली असे दि. १९/०६/२०२५

**सही/-**
**ॲड. पद्माकरे बिभीषण काटमोरे**
**बी.ए.(ऑनर्स), एलएल.बी.,**
**अति. जिल्हा व सत्र जिल्हा व सत्र न्यायालय**
**बार्शी, मो. नं. ९८२२७४३८३४**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सर्व लोकांना व विशेषतः बार्शी तालुका व बार्शी शहर म्यु.पल हद्दीतील सर्वांना या जाहीर नोटीसीने खालील सही करणार यांजकडून कळविण्यात येते की,

श्री. रमाकांत अंबऋषी पिंगळे, रा. बार्शी यांनी त्यांचे मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटस असलेली खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत आमचे आशिलांना खुषखरेदी देण्याचा करार केला आहे. मिळकत मालकाने इसारती दाखल रक्कमही स्विकारलेली आहे. याशिवाय सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत सदर वरील मिळकत मालक यांनी आमचे आशिलांना खात्री दिलेली आहे. तथापी, याही उपर सदर मिळकतीवर कोणाचा कसलाही बोजा, चार्ज, पोटगी, दावा अगर अन्य हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी खाली नमुद केले पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत आपल्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अशी कोणाचीही तक्रार न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, त्यावर अन्य कोणाचा हक्क, हितसंबंध नाही, अगर असल्यास तो सोडून दिला आहे, असे समजून आमचे आशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ठ :-** मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीमधील खुला प्लॉट तपशील :- याचा गट नं. ६३१/२ यामधील प्लॉट नं. ६३ याचे क्षेत्रफळ चौ.मी. १५०.०० आहे. याची मोजमापे पूर्व-पश्चिम मी. १५.००, दक्षिण-उत्तर मी. १०.०० आहे. यांसी चतुःसिमा पूर्वेस - ९ मी. रुंदीचा रस्ता, दक्षिणेस - सदर गट नं. पैकी प्लॉट नं. ६२, पश्चिमेस - सदर गट नं. पैकी जमीन व उत्तरेस - सदर गट नं. पैकी प्लॉट नं. ६४ आहे. सदर प्लॉटचे पाणी व वागणूक पूर्व बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक प्लॉट आतील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तूसह. ही जाहिर नोटीस दिली असे. ता. १९/०६/२०२५

**सही/-**
**खरेदीदारतर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. कैलास सुहास बडवे**
**३७६, भगवंत मंदिरामागे, बार्शी**
**मो. ७३५०६६८४३०**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.: ६६/२०२५
निशाणी नं. ४

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात**

१) **चि. ओमराजे शिवानंद क्षिरसागर,** वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. चिखर्डे, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **शिवानंद आण्णासाहेब क्षिरसागर** वय ४८ वर्षे, धंदा - शेती, रा. चिखर्डे, ता. बार्शी, जि. सोलापूर (अर्जदार नं. २ स्वतःसाठी व अर्जदार नं. १ चे अ.पा.क. म्हणून)
— **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन** **- सा.वाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर, सब डि व ता. बार्शी पैकी मौजे चिखर्डे हद्दीतील शेतजमीन याचा गट नं. १८८/१ याचे क्षेत्र ०१-२१ आर, आकार रु. ०२-१० पैसे. यासी चतुःसिमा - संपूर्ण गट असल्याने चतुःसिमा दिलेल्या नाही. येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमिन आतील सर्व झाडझुडुप दगड, माती, ताली वगैरे तदंगभुत वस्तुसह

वर नमूद मिळकत ओमराजे शिवानंद क्षिरसागर याचे नावे आहे. यातील अर्जदारतर्फे अ.पा.क. म्हणून त्यांचे वडिल शिवानंद आण्णासाहेब क्षिरसागर, हे आहेत. सदर अज्ञानाचे शैक्षणिक गरजेपोटी व अर्जदार नं. १ याचा ४०% डोळा काम देत नाही. त्यामुळे अर्जदार नं. १ याचे तात्काळ हैद्राबाद येथे जाऊन मोठी डोळ्याची शस्त्रक्रिया करायची आहे. त्यास बराच खर्च होणार आहे. तसेच अर्जदार नं. १ यास पुढील शिक्षण घेण्यासाठीही बराच खर्च येणार आहे. त्यामुळे अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख २४/०७/२०२५ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल' लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल, हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. ता. १७/०६/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**हुकुमावरून**
**अक्षीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं.: ८७/२०२४
निशाणी नं. ५

**बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो. यांचे न्यायालयात**

**ब्रम्हदेव नारायण काकडे (अज्ञान)** वय ०८ वर्षे, धंदा - शिक्षण, करीता अ.पा.क.
**नारायण प्रल्हाद काकडे** वय ४२, धंदा - शेती, रा. भांडेगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन** **- सामनेवाला**

ज्याअर्थी डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे कासारी, येथील शेतजमीन याचा गट नं. २०४/१/अ पैकी क्षेत्र हे. ०२-०२ आर, आकार रु. ०१-२० पैसे यासी चतुःसिमाः- पुर्वेस - सुभाष शेळके यांची जमीन, पश्चिमेस - सारोळा कासार गावची शिव, दक्षिणेस - तुकाराम कदम यांची जमीन, उत्तरेस - देवस्थानची जमीन, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची जमिन आतील सर्व तदंगभुत वस्तुसह.

वर नमूद मिळकत अज्ञान ब्रम्हदेव नारायण काकडे याचे नावे आहे. यातील अर्जदारतर्फे अ.पा.क. म्हणून त्यांचे वडिल नारायण प्रल्हाद काकडे, हे आहेत. सदर अज्ञानाचे शैक्षणिक गरजेपोटी व उर्वरीत मिळकत सुधारण्यासाठी अज्ञानाचे नावे असलेली वर नमूद मिळकत विक्री करणेस परवानगी मिळणेकामी यातील अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाहीत अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील तर या जाहिर प्रसिध्दीकरणाचे तारखेपासून १ महिन्याचे आत किंवा पुढील नेमलेली तारीख २९/०७/२०२५ रोजीपर्यंत त्याने या कोर्टात स्वतः किंवा आपल्या विधिज्ञामार्फत हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न नोंदविल्यास, तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १९/०६/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**हुकुमावरून**
**अक्षीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

## हदगाव नगरपरिषद, हदगाव

**ता. हदगाव, जि. नांदेड ०२४६८, ऑफिस २२२४०८ Mail ID : cohadgaon@gmail.com**
**न.प.जा.क्र./बा.वि./२०८४/२०२५**

**ई-निविदा प्रसिध्दीकरण सूचना**
**(वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान ठोक तरतूद योजना)**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हि द्वी लिफाफा पध्दतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदाराचा वर्ग | कामाचा कालावधी | ई-निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषद हदगाव अंतर्गत प्रभाग क्र. ०४ मधील संभाजी नगर अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम करणे. (मनुलकर यांचे घर ते हामने सर ते बेलखेडे आणि साहेबराव खंदारे ते चव्हाण आणि देवकर ते भूसेवाड आणि दमणे ते मिरासे यांच्या घरापर्यंत) | ६७,९३,७००/- | ६७,९३७/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ५ व त्यावरील | १८० दिवस | ५,०००/- |
| २ | नगर परिषद हदगाव अंतर्गत कदम नगर अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम करणे. (अभय शिंदे यांचे घर ते दिलीप चव्हाण ते आत्माराम जाधव यांच्या घरापर्यंत) | ६०,८३,९००/- | ६०,८३९/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ५ व त्यावरील | १८० दिवस | ५,०००/- |
| ३ | नगर परिषद हदगाव अंतर्गत देवराव सोनुले ते दत्त कॉलेजपर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे | ९९,९६,०००/- | ९९,९६०/- | करार करते वेळी १% बिलातून ८% | वर्ग ५ व त्यावरील | १८० दिवस | ५,०००/- |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २०/०६/२०२५ ते २७/०६/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. २७/०६/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**न.प. हदगाव**

**सही/-**
**मा. प्रशासक**
**न.प. हदगाव**

## महत्त्वाचे

### दिव्याचे पंतप्रधानांकडून कौतुक. उपमुख्यमंत्र्यांकडूनही अभिनंदन



नागपूर : नागपूर येथील १९ वर्षीय दिव्या देशमुखने सोमवारी जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाची बुद्धिबळपटू हौ यिफानचा पराभव केला. ज्युनियर गटात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या दिव्याने चीनच्या हौ यिफानचा पराभव केला आणि जागतिक टीम रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत ३ पदके जिंकली. यामध्ये रॅपिड बुद्धिबळात रौप्य आणि ब्लिट्झमध्ये कांस्यपदकांचा समावेश आहे. दिव्याच्या या कामगिरीबद्दल तिचे कौतुक होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिचे अभिनंदन करत कौतुक केले आहे, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिव्याचे यश नवीन बुद्धिबळपटूंना प्रेरणादायी असल्याचे म्हणत तिचे अभिनंदन केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्याचे या कामगिरीबद्दल अभिनंदन केले आहे. पंतप्रधान मोदींनी एक्स या समाज माध्यमावर लिहिले आहे की, लंडनमधील जागतिक ब्लिट्झ स्पर्धेत प्रथम विश्वमानांकित हौ यिफानला हरवल्याबद्दल दिव्या देशमुखचे अभिनंदन. तिचे यश तिच्या संयम आणि दृढनिश्चयाचे प्रतिबिंब आहे. हे अनेक उदयोन्मुख बुद्धिबळ खेळाडूंना देखील प्रेरणा देते. तिच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही तिचे कौतुक केले आहे. अजित पवार पोस्टमध्ये म्हणाले की, लंडन येथे पार पडलेल्या जागतिक टीम ब्लिट्झ अजिंक्यपद स्पर्धेत नागपूरची कन्या बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने जगातील अव्वल बुद्धिबळपटू हौ यिफन हिच्यावर मात केली. याबद्दल दिव्याचे मनःपूर्वक अभिनंदन!

### पाथुम निसंकाचे शतक तरीही, श्रीलंका १२७ धावांनी पिछाडीवर



गॅले : येथे सुरु असलेल्या बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात बांगलादेशच्या ४९५ धावांना प्रत्युत्तर देताना श्रीलंकेने चिवट झुंज देत तिसऱ्या दिवस अखेर पहिल्या डावात ४ बाद ३६८ धावांपर्यंत मजल मारली. यजमान संघ अजून १२७ धावांनी पिछाडीवर आहे. खेळ थांबला तेव्हा कामिंदु मेंडिस ३७ धावांवर, तर कर्णधार धनंजय डीसिल्व्हा १७ धावांवर खेळत होते. बांगलादेशने ९ बाद ४८४ धावांवरून खेळ सुरु केल्यानंतर त्यांचा पहिला डाव १५३.४ षटकांत ४९५ धावांवर आटोपला. प्रत्युत्तर देताना श्रीलंकेचा सलामीवीर पाथुम निसंकाने बांगलादेशच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत २५६ चेंडूंत १८७ धावांची खेळी केली, यात त्याने २३ चौकार व एक षटकार खेचला. पाथुमने लाहिरी उडारा (२९), दिनेश चंडीमल (५४) व अँजेलो मॅथ्यूज (३९) यांच्यासोबत छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. चंडीमलने १११ चेंडूंत ४ चौकारांसह ५४ धावांचे योगदान दिले. बांगलादेशच्या हसन महमूद, तैजुल इस्लाम, नईम हसन व मोमीनुल हकने प्रत्येकी एक-एक बळी टिपण्यात यश मिळविले. श्रीलंकेकडे अजून ६ गडी शिल्लक आहे व सामन्याचे दोन दिवस शिल्लक आहे. सामन्याची सद्यःस्थिती बघता हा पहिला कसोटी सामना अनिर्णीतावस्थेकडे झुकेल असे चित्र दिसत आहे.

### बिली जीन किंग चषक प्लेऑफ सामने बंगळूरूमध्ये

बंगळूरू : आगामी १४ ते १६ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या बिली जीन किंग चषक जागिक गट प्ले-ऑफ महिला टेनिस स्पर्धेसाठी भारताला नेदरलँड्स आणि स्लोव्हेनियासह संघात स्थान देण्यात आले आहे. भारताला बंगळूरूमधील एस.एम. कृष्णा टेनिस स्टेडियमच्या आउटडोअर हार्ड कोर्टवर या स्पर्धेचे यजमानपदही मिळाले आहे. बिली जीन किंग कप प्लेऑफ भारतीय भूमीवर पहिल्यांदाच होणार आहे. तीनही संघ राऊंड-रॉबिन लीग स्वरूपात खेळतील आणि अव्वल संघ पुढील वर्षीच्या पात्रता फेरीत प्रवेश करेल. पूर्वीच्या प्रादेशिक स्पर्धेप्रमाणे, सामने दोन एकेरी आणि एक दुहेरी असतील. सर्व सामने बेस्ट ऑफ थ्री टाय-ब्रेक सेटवर खेळले जातील. एस.एम. कृष्णा टेनिस स्टेडियमवर प्रतिष्ठित बीजेके चषक प्लेऑफचे आयोजन करणे हा केएसएलटीएसाठी आमच्यासाठी एक ऐतिहासिक क्षण असेल. यामुळे जागतिक महिला टेनिसमध्ये भारताचे स्थान उंचावेल, असे केएसएलटीएचे वरिष्ठ उपाध्यक्ष प्रियांक खरगे म्हणाले. तरुण टेनिसपटूंनी असाधारणपणे चांगली कामगिरी करताना खूप आशा आहेत आणि घरच्या मैदानावर प्लेऑफ सामना खेळाच्या वाढीस चालना देण्यासाठी आणि संभाव्य प्रतिभेला प्रेरणा देण्यासाठी मोठी भर घालू शकतो, असे स्पर्धेचे संचालक सुनील यजमान म्हणाले.

# गिल नेतृत्व करण्यास सज्ज

### इंग्लंडमध्ये नवीन सुरुवात





लीड्स, १९ जून

शुक्रवारपासून पतौडी (अँडरसन-तेंडुलकर) चषकासाठी पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारत आणि इंग्लंड यांच्यादरम्यान पहिला कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. या कठीण संक्रमणकाळात शुभमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करण्यास सज्ज झाला आहे. इंग्लंडमध्ये तो आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या नवीन चक्राची सुरुवात करणार आहे.

पुढील ४५ दिवसांत आकर्षक इतिहास घडवण्यासाठी एक नवीन कर्णधार, एक आक्रमक प्रशिक्षक, काही जुने खेळाडू आणि काही नवीन चेहरे दृढनिश्चयी असतील.

गत नऊ दशकांत केवळ तीन भारतीय संघांनी - अजित वाडेकरची १९७१ ची तुकडी, १९८६ मधील कपिलदेवची डेव्हिल्स आणि २००७ मधील राहुल द्रविडची संघ- इंग्लंडमध्ये कसोटी मालिका जिंकली आहे.

२५ वर्षीय शुभमन गिलसाठी इंग्लंड संघाविरुद्धची मालिका जळत्या निखाऱ्यावरून चालण्यासारखी असेल. ब्रेंडन मॅक्युलमच्या प्रशिक्षणाखाली व बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखाली इंग्लंडच्या कसोटी फलंदाजीच्या परंपरा बदलल्या आहेत.

भारताच्या ३७ व्या कसोटी कर्णधाराकडून शुभमन गिलकडून खूप काही अपेक्षा आहे. त्याने पारंपारिक स्वरूपात फलंदाज व नेता म्हणून काय केले आहे यावर त्याची निवड अवलंबून होती. आता त्याला बरेच काही सिद्ध करायचे आहे. असामान्यपणे उबदार लीड्स आणि हेडिंग्ले येथे २ मिमी गवताने भरलेले २२ यार्ड पृष्ठभाग हे इंग्लंडच्या बॅझबॉलर्ससाठी स्वर्ग नाही, परंतु ही मालिका दबावाखाली कोणती फलंदाजी प्रथम डोळे मिचकावते याबद्दल असेल.

इंग्लंडचा फलंदाज जो रूट याने ३६ शतकांसह १३,००० पेक्षा जास्त कसोटी धावा केल्या आहेत. कागदावर भारताच्या तुलनेत तो सर्वोत्तम दिसतो, कारण भारतीय संघाचा सर्वात अनुभवी फलंदाज के. एल. राहुल (५८ कसोटी, ३२५७ धावा) आहे.

पण भारतीय गोलंदाजीत अतुलनीय जसप्रीत बुमराहची उपस्थिती पाहुण्या संघाला समान स्थितीत आणते. वेगवान गोलंदाज केवळ तीन कसोटी सामन्यांसाठी उपलब्ध असण्याची शक्यता आहे. त्यामुळे इंग्लंडच्या गोलंदाजीवर दबाव आणण्याची ही भारताला सर्वोत्तम संधी असू शकते.

ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोश टंग आणि शोएब बशीर आणि कर्णधार स्टोक्स यांचा समावेश असलेला आक्रमक प्रतिस्पर्धी संघात भीती निर्माण करत नाही.

भारत-इंग्लंड कसोटी ही मालिका मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या रणनीतिक कौशल्याची पहिली खरी परीक्षा असेल. सरावादरम्यान करुण नायरचे पुनरागमन निश्चित असल्याचे दिसते.

**बी. साई सुदर्शनचे पदार्पण**

गंभीर अतिरिक्त फलंदाज खेळवेल व प्रतिभावान बी. साई सुदर्शनला त्याची पहिली कसोटी कॅप देईल का? की तो अतिरिक्त तज्ज्ञ फलंदाजाची कमतरता भरून काढण्यासाठी नितीश रेड्डी आणि शार्दुल ठाकूरला संधी देईल, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

कुलदीप यादवला खेळवण्याची शक्यता आहे, कारण तो कोणत्याही खेळपट्टीवर चेंडू वळवू शकतो. रवींद्र जडेजा अजूनही ७ व्या क्रमांकाचा एक मजबूत फलंदाज आहे. अर्शदीप सिंगला तिसरा वेगवान गोलंदाज म्हणून खेळवायचे की प्रसिध कृष्णाला संधी द्यायची, यावरही चर्चा होण्याची शक्यता आहे. आकाश दीप सुद्धा या परिस्थितीत बुमराह व मोहम्मद सिराजसाठी मदत करणारा ठरू शकतो.

**भारत-इंग्लंड पहिला कसोटी सामना**

**स्थळ** : हेडिंग्ले क्रिकेट स्टेडियम, लीड्स
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून (भारतीय वेळेनुसार)
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

**इंग्लंड (अंतिम एकादश)** : झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रूट, हॅरी ब्रूक, बेन स्टोक्स (कर्णधार), जेमी स्मिथ (यष्टिरक्षक), ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोश टंग आणि शोएब बशीर.

**भारत** : शुभमन गिल (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार), यशस्वी जयस्वाल, के.एल. राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यू ईश्वरन, करुण नायर, नितीश कुमार रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, जसप्रीत बी. सिराज, प्रसीद कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, हर्षित राणा. (वृत्तसंस्था)

# तिरंदाज अंतिम फेरीत

### आशिया चषक तिरंदाजी दुसरे चरण



लक्ष्य साधताना कुशल दलाल

सिंगापूर, १९ जून

भारतीय कनिष्ठ रिकर्व्ह तिरंदाजांनी गुरुवारी येथे झालेल्या आशिया चषक तिरंदाजी दुसऱ्या चरणाच्या स्पर्धेत तीन संघांच्या अंतिम फेरीत धडक मारत आपले वर्चस्व गाजवले. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या भारतीय पुरुष रिकर्व्ह संघाने एकतर्फी उपांत्य फेरीत पाचव्या क्रमांकाच्या बांगलादेशचा ५-१ असा पराभव केला. आता भारतीय संघ तिसऱ्या क्रमांकाच्या जपानशी अंतिम सामना खेळेल. विष्णू चौधरी, पारस हुडा व जुएल सरकार या त्रिकुटाने बांगलादेशविरुद्ध सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवित पहिला सेट ५५-४८ असा जिंकला. दुसरा सेट ५५-५५ अशी बरोबरी झाली. तिसऱ्या सेटमध्ये ५९-५६ असा विजय मिळवला.

# पुणेरी बाप्पा वि. ईगल नाशिक टायटन्स सामना रंगणार

### महाराष्ट्र प्रिमियर लीग क्रिकेट : एलिमिनेटर लढतीत रायगड रॉयल्ससमोर पीबीजी कोल्हापूर टस्कर्सचे आव्हान

पुणे, दि. १९ जून-

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महाराष्ट्र प्रिमियर लीग (एमपीएल) स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून यामध्येकालिफायर १ लढतीत४एस पुणेरी बाप्पा विरुद्ध ईगल नाशिक टायटन्स यांच्यात दुपारी २वाजताचुरशीचा सामना रंगणार आहे. तर, सायंकाळी ७ वाजताएलिमिनेटर लढतीत रायगड रॉयल्ससमोर पीबीजी कोल्हापूर टस्कर्सचे आव्हान असणार आहे.कालिफायर १ सामना गुणतालिकेत अव्वल दोन संघांमध्ये होणार आहे. ईगल नाशिक टायटन्स संघाने १० सामन्यातून १३ गुण आहेत तर ४ एस पुणेरी बाप्पा १२ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. या सामन्यातील विजयी संघ एम पीएलच्या अंतिम सामन्याला थेट पात्र ठरणार असून तर पराभूत संघाला कालिफायर २च्या माध्यमातून अंतिम फेरी गाठण्याची अजून एक संधी मिळणार आहे.

याचबरोबर तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर असलेल्या रायगड रॉयल्स व पीबीजी कोल्हापूर टस्कर्स यांच्यात सायं ७ वाजता एलिमिनेटर सामना होईल. यातील विजेता संघ कालिफायर १ मधील पराभूत संघाशी अंतिम फेरीतील स्थानासाठी लढणार आहे.

कालिफायर १ मध्ये सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या ईगल नाशिक टायटन्स संघासमोर ४एस पुणेरी बाप्पाचे कडवे आव्हान असणार आहे. याआधीच्या साखळी फेरीच्या लढतीत रोहन दामलेच्या एकहाती खेळीच्या जोरावर नाशिकने पुण्यावर पाच गडी राखून विजय मिळवला होता. तर दुसरा साखळी सामना पावसामुळे रद्द करावा लागला होता. त्यामुळे ४पुणेरी बाप्पा संघ आपल्या पराभवाची परत फेड करण्यासाठी उत्सुक असणार असून दुसऱ्या बाजूला ईगल नाशिक टायटन्स संघ पुणेरी बाप्पा विरुद्ध आपली विजयी मालिका कायम राखण्यासाठी उत्सुक असणार आहे.





गोलंदाज सोहन जमाले व रोहन खरात यांच्या समोर असणार आहे.

नाशिकच्या संघात यष्टीरक्षक-फलंदाज मंदार भंडारी, अष्टपैलू अर्शिन कुलकर्णी, साहिल पारेख, रोहन दामले, अथर्व काळे अशी फलंदाजांची तगडी फळी आहे. त्या फळीला रोखण्याचे आव्हान पुण्याच्या निकित धुमाळ, सचिन भोसले, रामकृष्ण घोष ह्या वेगवान गोलंदाजांसमोर असणार आहे. त्यांच्या जोडीला डावखुरा लेगस्पिनर रोशन वाघसरे व डावखुरे फिरकी गोलंदाज नाशिकच्या गोलंदाजीच्या ताफ्यात चेन्नई सुपर किंग्जकडून खेळणारा डावखुरा वेगवान गोलंदाज मुकेश चौधरी आहे. त्याच्या जोडीला मनोज इंगळे व आरशी कुलकर्णी आहेत तर फिरकीची मदारसध्या सर्वाधिक विकेट घेणाऱ्या यादीत दुसऱ्या स्थानी असलेल्याकर्णधार प्रशांत सोळंकी व अक्षय वाईकरवर असेल. या गोलंदाजांसमोर पुण्याच्या फॉर्ममध्ये असलेल्या यश नाहर व मुर्तुझा ट्रंकवाला या सलामीच्या जोडीचं आव्हान असेल. त्याच बरोबर मधल्या फळीत येऊन कर्णधार यश क्षीरसागर, अद्वैय शिंधये, रामकृष्ण घोष व सुरज शिंदे यांनी चमकदार कामगिरी केली आहे.

एलिमिनेटरच्या सामन्यात रायगडच्या संघासमोर कोल्हापूरचे आव्हान असेल. पहिल्या साखळी सामन्यात कोल्हापूरने रायगडवर दोन गडी राखून निसटता विजय मिळवला होता तर दुसरा सामना पावसामुळे रद्द झाला होता. एलिमिनेटरमध्ये विजय मिळवून पहिल्या सामन्यातील पराभवाचं उट्टे काढायची रायगडला संधी आहे. रायगडचा सलामीवीर सिद्धेश वीर जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. गेल्या काही सामन्यात त्याने सातत्याने धावा करून रायगडला प्लेऑफ मध्ये स्थान मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. गेल्या काही सामन्यात विकी ओस्तवालने सलामीला येऊन रायगडला चांगली सुरवात करून दिली आहे. कर्णधार रिषभ राठोडला अजून फलंदाजीत हवा तसा सूर गवसला नाहीये पण त्याने कर्णधार म्हणून चांगली कामगिरी केली आहे. दुसऱ्या हाताला, कोल्हापूरच्या संघाने गेल्या काही सामन्यात जबरदस्त कामगिरी केली आहे. सचिन धसने सलामीला येऊन संघाला आक्रमक सुरवात करून दिली आहे व त्याला कर्णधार राहुल त्रिपाठीने चौथ्या क्रमांकावर येऊन चांगली जोड दिली आहे. रायगड विरुद्धच्या सामन्यात ह्या दोघांच्या फलंदाजीनेच कोल्हापूरने विजय मिळवला होता. त्यामुळे कोल्हापूरला आशा असेल कि त्या कामगिरीची ते पुनरावृत्ती करतील.

# उत्कृष्टतेसाठी पतौडी पदक देणार

### सचिन तेंडुलकरला आनंद

नवी दिल्ली, १९ जून

भारत- इंग्लंडदरम्यानच्या कसोटी मालिकेत नव्याने स्थापित केलेला पतौडी पदक उत्कृष्टतेसाठी देण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे पतौडी यांचे नाव मालिकेशी जोडले जाईल. या निर्णयामुळे मी आनंदित आहे, असे सचिन तेंडुलकर म्हणाला.

सचिनने बीसीसीआयचे माजी सचिव आणि आयसीसीचे विद्यमान अध्यक्ष जय शाह तसेच ईसीबीच्या मोठ्या नेत्यांशी या विषयावर अनेक चर्चा केल्यानंतर हे घडले.

भारत-इंग्लंड कसोटी मालिकेच्या ट्रॉफीचे नाव बदलले जात आहे, हे कळताच मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने दिवंगत मन्सूर अली खान पतौडी यांच्या कुटुंबाशी संपर्क साधला आणि या सामन्याशी माजी कर्णधाराचा संबंध अबाधित राहावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन, असे तेंडुलकरने पतौडी कुटुंबाला गुरुवारी सांगितले.



भारतीय महान फलंदाज आणि इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन यांच्या सन्मानार्थ पतौडी चषकाची जागा अँडरसन-तेंडुलकर चषकाने घेतली आहे. पतौडी चषक निवृत्त करण्याचा निर्णय इंग्लंड अँण्ड वेल्स क्रिकेट मंडळ व बीसीसीआयने संयुक्तपणे घेतला होता.

मला माहिती आहे की काही महिन्यांपूर्वी बीसीसीआय आणि ईसीबीने पतौडी चषक निवृत्त केले होते, पण जेव्हा मला कळले की चषक माझ्या व जेम्स अँण्डरसनच्या नावावर ठेवण्यात आले आहे, तेव्हा माझा पहिला फोन पतौडी कुटुंबाला होता, असे मुंबईच्या महान खेळाडूंनी वृत्तसंस्थेला सांगितले.

टायगर पतौडी यांनी अनेक पिढ्यांना प्रेरणा देण्यात मोठी भूमिका बजावली आणि ती कधीही विसरता कामा नये, असे ५२ वर्षीय खेळाडू म्हणाला. (वृत्तसंस्था)

# रायडर्स, लॉयन अंतिम फेरीत

### निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी आंतर क्लब क्रिकेट स्पर्धा : आदित्य सुरवसे, नारायण डोके सामनावीर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जून-

निलेश गायकवाड क्रिकेट अँकॅडमी आंतर क्लब क्रिकेट स्पर्धेत एनजीसीए रायडर्स व लॉयन संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला.

डोणगाव रोडवरील पुष्प जिमखान्याच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत गुरुवारी झालेल्या १२ वर्षाखालील गटातील उपांत्य सामन्यात रायडर्सने वॉरियर्सवर ८४ धावांनी विजय मिळविला.

९ धावांत ३ बळी टिपणारा आदित्य सुरवसे सामन्याचा मानकरी ठरला. १६ वर्षाखालील गटातील उपांत्य सामन्यात लॉयनने टायटन्सवर ७ गडी राखून विजय मिळविला. नाबाद शतक झळकाविणारा नारायण डोके (११७) सामनावीर ठरला.





**संक्षिप्त धावफलक :**

**रायडर्स** : २५ षटकात ४ बाद १४६ (व्यंकटेश गाडगे २४, पुरणचंद्र १८, आदित्य सुरवसे १०, हारुण शेख १-४५) वि. वि. **वॉरियर्स** : २५ षटकात सर्वबाद ६२ (सुजल गायकवाड १८, धेनेश्वरी धोंगडे १६, प्रतीक पाटील ११, अनिश बिरुळी १०, आदित्य सुरवसे ३-९, अनिश बिरोळी १-७).

**टायटन्स** : ३० षटकात ९ बाद १९७ (अभिजीत सरवदे ६६, विराज वर्मा ६५, सुजल गायकवाड १५, नारायण डोके २-२३, गणेश पवार २-४३, सामील मिश्रा ३-४२) पराभूत विरुद्ध **लॉयन्स** :२३ षटकात ३ बाद १९९(नारायण डोके नाबाद ११७, साहिल मिश्रा नाबाद ५४, अभिजीत सरवदे व अनुज वाल्मिकी प्रत्येकी एक बळी)

**अंतिम सामने :**

१२ वर्षाखालील : रायडर्स विरुद्ध पँथर्स
१६ वर्षाखालील : लॉयन विरुद्ध ईगल्स

# योगाच्या शास्त्रीय माहितीसाठी मल्टीमिडीया चित्र प्रदर्शन उपयुक्त

### पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे प्रतिपादन

### आंतरराष्ट्रीय योग दिनी केंद्रीय संचार ब्यूरोचा विशेष उपक्रम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर दि. १९ जून-

आनंदी आणि आरोग्यमय जिवनासाठी नियमित योगासने करणे आवश्यक आहे. आरोग्य हीच आपली धनसंपदा आहे. आंतरराष्ट्रीय योग दिवस हा आरोग्याची काळजी घेणेचे स्मरण करुन देतो. योगाच्या शास्त्रीय माहितीसाठी केंद्रीय संचार ब्युरोचे मल्टीमिडिया प्रदर्शन अत्यंत उपयुक्त आहे, असे प्रतिपादन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी केले.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, योग दिवस सम न्वय समिती, हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आणि जिल्हा व पोलिस प्रशासन यांच्यावतीने ह.दे. प्रशालेच्या मुळे सभागृहात आयोजित दोन दिवसीय मल्टीमिडिया चित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मंचावर क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, मुख्याध्यापिका दीपा फाटक, पोलीस निरीक्षक अजित लकडे, पर्यवेक्षक भानुदास वनसोडे, मनमोहन भुतडा, रोहिणी उपळाईकर, बाळासाहेब पाटील, सतीश घोडके, उद्योजक विरेश नसले, प्रभा कोडगे, अक्षय गवळी, सारिका अनपट आदी उपस्थित होते.





**ह.दे.च्या मुळे सभागृहात विनामूल्य प्रदर्शन**

सामान्य लोकांना योगाबद्दल माहिती व्हावी यासाठी मल्टीमिडियाच्या माध्यमातून प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. शहरातील शालेय विद्यार्थी महाविद्यलयीन युवक व ज्येष्ठ नागरिक यांनी प्रदर्शनाला भेट दयावी. हे प्रदर्शन भारतीय प्राचीन योगाची माहिती देणारे आहे. योगाचे प्रार्थना, पूरक हालचाली मानेच्या, योगासने उभी, बैठक, पाटीवरील, पोटावरील, प्राणायाम, ध्यान आदीबाबत माहिती मिळणार आहे. हे प्रदर्शन शुक्रवारी सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहील. याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन अंबादास यादव यांनी प्रास्ताविकेतून केले. सूत्रसंचालन प्रमोद चुंगे यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाकडून विविध माध्यमाद्वारे योग विषयक प्रचार-प्रसार होत असल्यामुळे योगाची माहिती प्रत्येक घराघरात पोहचत आहे. केंद्रीय संचार ब्युरोने मल्टीमिडिया चित्रप्रदर्शनाच्या माध्यमातून लोकांना आरोग्याबाबत दक्ष केले आहे. त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन सुनिल सोनटक्के यांनी केले.

# शांभवी चषक क्रिकेट स्पर्धा २५ जूनपासून

### ज्येष्ठ क्रीडा पत्रकार जे. टी. कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जून-

क्रिकेटचे ज्येष्ठ संघटक व ज्येष्ठ क्रीडा पत्रकार जे.टी. कुलकर्णी यांच्या स्म रणार्थ सोलापूर जिल्हा डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने शांभवी कन्स्ट्रक्शन यांच्या सहकार्याने १४ वर्षाखालील मुलांच्या जिल्हा क्रिकेट स्पर्धा बुधवार २५ जून पासून सुरू होणार आहे. या स्पर्धा ४० षटकांच्या तसेच या स्पर्धा बाद पध्दतीने खेळवण्यात येतील. या स्पर्धे साठी १ सप्टेंबर २०११ नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. या सामन्यासाठी संघातील खेळाडू जिल्हा क्रिकेट संघटनेकडे नोंदणी केलेला व सोलापूर जिल्ह्यातलाच असला पाहिजे. इच्छुक संघांनी २२ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राजू रंगम (मो. क्र. ९४२१०२७७४) अथवा शिवा अकलूजकर (मो.क्र. ९८८१७६५५७८) यांच्याशी नोंदणीसाठी संपर्क करावा.



## महत्वाचे...



## पंढरपुरात 'उबाठा' शिवसेनेचा ५९ वा वर्धापन दिन उत्साहात

**पंढरपूर, दि.१९ जून -**

शिवसेना उध्दव ठाकरे गटाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ५९ वा वर्धापन दिन गुरुवारी (ता.१९) मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी विविध कार्यक्रमांचे देखील झाल्याची माहिती पंढरपूर शहर प्रमुख युवराज गोमेवाडीकर यांनी दिली. मराठी माणसाच्या न्याय हक्कांसाठी आणि मराठी माणसाला स्वाभिमानानं जगण्यासाठी हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची स्थापना केली. आज ५९ वर्ष पूर्ण होत आहेत. गुरुवारी पंढरपुरातही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडून वर्धापन दिनानिमित्त येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात छत्रपतींच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे शहर आणि तालुक्यातील सर्व निष्ठावंत शिवसैनिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कमलापूरचे अशोक आदलिंगे यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**सांगोला, दि.१९ जून-**

कमलापूर, (ता.सांगोला) येथील सुपुत्र व सध्या पुणे येथे स्थायिक असलेले अशोक आदलिंगे यांना सुपर प्रीमियम एप्लीकेटर ह्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने प्रमुख मान्यवरांचे उपस्थितीमध्ये सन्मानित करण्यात आले. स्पेन, इटली, बरसोलंना देशामध्ये बांधकाम व्यवसायामध्ये विशेषतः वॉटरप्रूफिंगच्या कामामध्ये भरीव काम केल्याबद्दल अशोका वॉटरप्रूफिंग कंपनीचे अध्यक्ष अशोक आदलिंगे यांना सुपर प्रीमियम एप्लीकेटर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कमलापूरच्या सुपुत्राने सातासमुद्रपार गरुड झेप घेतल्याबद्दल कमलापूर पंचक्रोशीमध्ये त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पिलीव येथील सविता गलांडे हिचे एमएससी परीक्षेत यश



**पिलीव, दि १९ जून-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सविता रामचंद्र गलांडे हिने एम एससी पदवी परीक्षेत ८४.५५ टक्के गुण मिळवित श्रीराम शिक्षण संस्था पानीव यामध्ये एम एससी परीक्षेत प्रथम क्रमांक संपादन केला .तिला प्राचार्य विनोद बाबर सर व अहील्या कोळेकर मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले .सविता हिच्या हया यशाबददल पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडुन तिचे हया यशाबददल अभिनंदन व कौतुक होत आहे.



## रोटरी क्लबतर्फे ग्रामीण रूग्णालयास ११ सिमेंट बाक

**मंगळवेढा, दि.१९ जून-**

रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी यांचे वतीने ग्रामीण रुग्णालयास ११ सिमेंट बाक प्रदान करण्यात आले. त्याचा लोकार्पण सोहळा ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे पार पडला. प्रेसिडेंट अमोल रत्नपारखी यांच्याकडून ५, रोटरी क्लब मंगळवेढा यांच्याकडून ५ तर पुनम देवदास यांचे कडून १ असे ११ सिमेंट बाक ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात बसण्यात आले. ग्रामीण रुग्णालयाची बाह्यरुग्ण संख्या तसेच प्रसुतीचे प्रमाण वाढले आहे. २०२३ -२४ मध्ये ४६६ एवढ्या प्रसूती तर २०२४- २५ मध्ये ८७० एवढ्या प्रसूती झाल्या आहेत. या लोकार्पण सोहळ्यास ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक स्त्रीरोगतज्ञ डॉ. सुलोचना जानकर, डॉ. दत्तात्रय घोडके,डॉ. अरुण कुमार, डॉ. विजय नडगेरी डॉ. निखिल जोशी व ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त रुग्णांना फळे वाटप

**बार्शी दि.१९ जून-**

शिवसेना बार्शी तालुका व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे वतीने शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय, बार्शी व साई संजीवनी हॉस्पिटल येथे रुग्णांस फळे वाटप करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी शीतल बोपलकर, ज्येष्ठ शिवसैनिक डॉ. प्रशांत मांजरे, तालुका समन्वयक शिवसेना शहरप्रमुख विजय माने, विशाल गाढवे, निलेश भंगुरे आदी उपस्थित होते.

# अकलूज बस स्थानकात सापडला बॉम्ब





### पोलीसांकडून बसस्थानकात मॉकड्रील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१९ जून -**

वेळ दुपारी सव्वा बाराची. अकलूज बस स्थानकावर दोन संशयित इसम उभे होते. लांब केस वाढवलेले. तोंडाला रुमाल बांधलेला. त्यांचा इरादा काही ठीक दिसत नव्हता. त्यांची संशयास्पद हालचाल पाहून कोणीतरी अकलूज पोलिसांना खबर दिली. अचानक अकलूज बस स्थानकावर एका मागोमाग एक पोलिसांच्या गाड्या येऊन दाखल झाल्या. खाड खाड बुटांचे आवाज करत पोलीस गाड्यांतून उतरले. बस स्थानकाचा कब्जा पोलिसांनी घेतला. सर्व प्रवाशांना सुरक्षित अंतरावर उभे करण्यात आले. वेगवेगळ्या पोशाखातील पोलीस, त्यांच्याकडील अत्याधुनिक बंदूका, श्वान पथक पाहून प्रवाशी घाबरले.

अकलूज बस स्थानकात काहीतरी मोठे घडल्याची खबर क्षणात शहरांत पसरली. लोक मोठया संख्येने बस स्थानकाकडे धावू लागले. तेवढ्यात पोलिसांनी दोन आरोपीच्या मुसक्या आवळल्या. शस्त्रधारी पोलिसांनी आरोपीना ताब्यात घेतले. श्वानाने बॉम्ब ठेवलेली बॅग शोधून काढली. बॉम्ब डिफ्युज करणारे पथक लगेच सक्रिय झाले. आणि त्यांनी तो बॉम्ब डिफ्युज केला. आरोपीना घेऊन काही पोलीस निघून गेले. बस स्थानकातील प्रवाशी घाबरून गेले होते. बघ्यांची प्रचंड गर्दी वाढली होती. आणि तेवढ्यात पोलिसांनी अनाऊसमेंट केली. घाबरून जाऊ नका. आरोपी पकडण्याची, बॉम्ब नष्ट करण्याची ही एक रंगीत तालीम, मॉक ड्रिल, प्रॅक्टिस होती. कोणीही घाबरू नका. असे म्हटल्यावर सगळ्यांच्या जीवात जीव आला. आषाढी वारीच्या अनुषंगाने अकलूज पोलीस ठाण्याच्या वतीने घेण्यात आलेल्या या रंगीत तालमीमध्ये श्वॉन पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, क्यु.आर.टी. पथक, आर.सी.सी. पथक, फायर ब्रिगेड, ॲम्ब्युलन्स, सुरक्षाशाखा, वाहतुक शाखा, स.पो.नि. विक्रम साळुंखे, स.पो.नि. योगेश लंगुटे, पोसई हणुमंत जरे, महिला पोसई करिश्मा वणवे, अकलूज पोलीस स्टाफ यांच्या सुमारे शंभर पोलिसांनी सहभाग घेतला होता.

> संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा त्याचबरोबर अनेक संतांच्या पालख्या माळशिरस तालुक्यातून पंढरपूरकडे मध्ये मार्गस्थ होत असतात त्यानिमित्ताने सुरक्षेच्या दृष्टीने कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत म्हणून आम्ही एक अकलूज बस स्थानकावर डेमो घेतला होता तसेच वारीमध्ये कोणतेही गैरप्रकार घडू नयेत म्हणून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आमची सर्व पोलीस यंत्रणा सज्ज आहे दिंडीमध्ये साध्या वेशतील पोलीस वॉच ठेवून असणार आहेत पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे
>
> **- विक्रम साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक.**



# बार्शीतील ब्रिटीश कालीन पुलाला निधी मिळावा

### शिरीष ताटे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१९ जून-**

बार्शी-कुडूवाडी रोड हा पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याला जोडणारा मुख्य रोड असल्याने, अतिशय वाहतुकीचा व वर्दळीचा आहे. तसेच या पुलावरुन दररोज हजारो नागरिक प्रवास करतात. या रोडवर अलीपूर हद्दीतील तिरकस पूल, रामेश्वर मंदिराजवळील दोन्ही पूल हे ब्रिटीश कालीन आहेत. सदरील पूल अतिशय कुमकुवत झाले असून, त्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. या पुलावर आत्तापर्यंत अनेक अपघात होऊन, बरेच प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. या प्रवाशांसाठी हे पूल मृत्यूचा सापळा असून, अतिशय धोकादायक झालेले आहेत. तरी प्रवाशांचा धोका टाळण्यासाठी वरील पूलांच्या निर्मितीसाठी तात्काळ निधी मिळावा, यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव शिरीष ताटे यांनी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. राज्यमंत्री नाईक यांनीही मागितलेल्या निधीसाठी सरकार सकारात्मक आहे व लवकरात लवकर निधी मंजूर करु असे आश्वासन दिले आहे.



## वरळेगाव शाळेचा प्रवेशोत्सव आनंदमय वातावरणात संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १९ जून-**

वरळेगाव.(ता.द.सोलापूर) दि- १६जून २०२५ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ शाळेच्या पहिल्या दिवशी वरळेगाव तांडा शाळेत इयत्ता १ली च्या नवागतांचे स्वागत करण्यात आले .यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, गावचे उपसरपंच, व गावातील बरेच पालक उपस्थित होते.

उपस्थित्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्याक श्री.अजित खरात यांनी केले. या प्रसंगी दक्षिण सोलापूर पंचायत समिती शिक्षण विभागाचे विषय तज्ञ श्री. सिद्रामय्या स्वामी यांनी शासकीय विविध योजनांची माहिती दिली. तसेच शालेय परिसरात वृक्षरोपण करण्यात आले. एकंदरीत शैक्षणिक वर्षाची सुरूवात अतिशय आनंदी व उत्साही वातावरणात पार पडले. कार्यकमाचे सूत्रसंचालन व आभार राजेंद्र डांगे यांनी मानले.

## चैतन्य हास्य योग मंडळातर्फे योगदिनी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ जून-**

दि.२१ जून हा दिवस जागतिक योग दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर सांगोल्यात गेली २२ वर्षे अखंड कार्यरत असलेल्या चैतन्य हास्ययोग मंडळाचे अध्यक्ष डी. डी. जगताप यांनी शनिवार दि. २१ जून रोजी योग दिन साजरा करण्यासाठी सांगोला शहरातील चिंचोली रोड येथील हुतात्मा बागेत स. ६ वा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्यासाठी आबालवृद्धांनी सतरंजी व पाणी बाटली घेवून उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

तसेच सांगोला विद्यामंदिर प्रशालेत स.७.३० वा. विद्यार्थ्यां समोर योगदिन साजरा करण्यात येणार आहे.

# सात दिवसांत खड्डे बुजवा, अन्यथा पोलिसांत तक्रार; जनहित याचिकेचा ठोस पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जून -**

शहरातील रस्त्यांवरील वाढते खड्डे आणि प्रशासनाची दुर्लक्ष वृत्ती यावर आता थेट न्यायालयाने हस्तक्षेप करत सात दिवसांत खड्डे बुजवण्याचे आदेश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रुपेश जयस्वाल विरुद्ध महाराष्ट्र राज्य या जनहित याचिकेच्या सुनावणीत हा निर्णय दिला असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने पावले उचलावी, असे स्पष्ट आदेशात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी पत्रकार परिषदेत रस्त्यांच्या स्थितीविषयी नागरिकांनी तक्रार कराव्यात यासाठी विशेष व्हॉट्सॲप क्रमांक सुरु करण्याची घोषणा केली होती. मात्र, प्रत्यक्षात हा उपक्रम अंमलातच आला नसल्याची टीका होत आहे.

मानवाधिकार कार्यकर्ते मनीष देशपांडे यांनी या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण आणि बार्शी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार सादर केली असून, न्यायालयाच्या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

देशपांडे यांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यांवरील खड्डे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करत असून, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ - सन्मानाने जगण्याचा हक्क - तसेच मानवाधिकार कायद्याचाही भंग होत आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, शहरातील रस्ते दुरुस्त करणे ही प्राथमिक गरज असून, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे अपघातांची संख्या वाढते आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षकांनी नगरपरिषदेला या संदर्भात न्यायालयाच्या आदेशानुसार पत्र पाठवावे आणि खड्डे बुजवण्याची तातडीने कार्यवाही व्हावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

# जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त जनजागृती

### मंगळवेढ्यात महिनाभर विविध उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१९ जून-**

येथील ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त १७ मे ते १६ जून हा रक्तदाब जनजागृती महिना विविध रक्तदाब जनजागृती पर कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रीकांत कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महिनाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सजग नागरिक संघातील ५ जणांची रक्तदाब व आरोग्य तपासणी करण्यात आली. मंगळवेढा पोलीस स्टेशन येथील ३५ अधिकारी कर्मचारी, मंगळवेढा बस स्टॅन्ड येथील ६६ कर्मचारी, करुणा मूकबधिर व मतिमंद मुलांची शाळा येथील २९ कर्मचारी, पाटकळ रोड येथील वीट भट्टीवर काम करणारे ३६ कामगार, महेनीबुवा मंदिर येथील ४० भजनी मंडळ, ग्रामीण रुग्णालयातील २८० गरोदर माता अशा विविध ठिकाणी रक्तदाब तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. मॅरेथॉन स्पर्धा, रक्तदाबावर घोषवाक्य लिहिण्याची स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सायकल रॅली, पोस्टर्स स्पर्धा, रक्तदाब जनजागृतीसाठी रक्त दाबावर रील, नाटक, लघु चित्रपट तयार करून त्याद्वारे रक्तदाब नियंत्रणाविषयी जनजागृती करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश रोंगे, डॉ.प्रणव कदम, डॉ. सुरज साठे ,राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे डॉ. प्रवीण माने, डॉ. अनिल चौगुले, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. स्नेहा गंदगे, डॉ. ऋतुजा गायकवाड, डॉ. धनश्री केंदुळे, आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल जोशी, डॉ. रेवता स्वामी, अधिपरिचारिका सुवर्णा सरताळे, फूलन आगलावे, वैशाली शिंदे, तेजश्री मेटकरी, स्वरांजली काशीद, रूपाली कुलकर्णी, सोनाली शंकर, सुरेखा खरात, सुनिता सातालोलू, सारिका कोळेकर, काजोल धायगुडे, पूजा फोले, पूजा वागदरकर, औषध निर्माण अधिकारी पांडुरंग कोरे, अविनाश पट्टणशेट्टी, रेश्मा सरडे, विवेकानंद कसबे, प्रयोग शाळा वैज्ञानिक अधिकारी निकिता वल्लाळ, सीमा मुलगे, स्वाती शिंदे, आबासो नागणे, सिद्धाराम चनशेट्टी, शाहीन तांबोळी, माधुरी वाकडे, प्रियंका डोरले आदि अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## माढ्याचे नूतन तहसीलदार संजय भोसले यांचा भाजपाकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१९ जून-**

माढ्याचे नुतन तहसीलदार संजय भोसले यांनी नुकताच पदभार स्वीकारला. भारतीय जनता पार्टी माढा तालुक्याच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

या सन्मान सोहळ्यावेळी भारतीय जनता पार्टीचे माढा तालुका अध्यक्ष योगेश पाटील, तालुका सरचिटणीस राहुल केदार, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष नंदकुमार मोरे, युवती अध्यक्षा संध्या कुंभेजकर, किसान मोर्चा उपाध्यक्ष पांडुरंग राऊत, किसान मोर्चा सरचिटणीस विवेक कुंभेजकर, पडसाळी तंटामुक्ती समिती अध्यक्ष महेश पाटील तसेच इतर पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. तहसीलदार संजय भोसले यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा देत माढा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी भक्कम सहकार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.


# तीर्थक्षेत्र अरण येथे एसटी बस थांबा मंजूर

### भाविकांची बहुप्रतीक्षित मागणी पूर्णत्वास

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१९ जून-**

संत शिरोमणी सावता महाराज यांच्या संजीवन समाधी स्थळ असलेल्या तीर्थक्षेत्र अरण (ता. माढा) येथे अखेर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस थांब्याची मंजुरी मिळाली असून, यामुळे गेल्या अनेक वर्षांपासूनची भाविकांची प्रतीक्षा संपली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा बस थांबा तीर्थक्षेत्र अरण येथे करण्याचे आदेश राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभाग नियंत्रक यांनी बुधवार (दि १८)रोजी सर्वआगार व्यवस्थापकांना दिले .आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर अरण साठी झालेल्या या निर्णयाचे संत सावता महाराज भक्तांकडून मोठे स्वागत करण्यात येत आहे. या निर्णयामागे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक विरेंद्र कदम तसेच ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे प्रशासकीय अधिकारी नारायण गोरे यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्यामुळे हा बस थांबा एकाच दिवसात कार्यान्वित झाला असल्याचे संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्चे अध्यक्ष तथा संत शिरोमणी सावता महाराजांचे वंशज सावता महाराज वसेकर आणि सचिव हभप प्रभू महाराज माळी यांनी सांगितले.



संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष आणि विश्वस्त मंडळाच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, संपूर्ण महाराष्ट्रातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी ही सुविधा अत्यंत आवश्यक होती.अरण हे पुणे-सोलापूर महामार्गालगत असलेले एक प्रमुख तीर्थक्षेत्र असून येथे संत सावता महाराजांची संजीवन समाधी आहे. १२व्या शतकातील थोर संत, कवी आणि वारकरी संप्रदायाचे महानायक असलेल्या संत शिरोमणी सावता महाराजांच्या दर्शनासाठी हजारो भाविक दरवर्षी येथे येत असतात. नुकतेच राज्य शासनाने या तीर्थस्थळाला 'तीर्थक्षेत्र अ वर्ग' दर्जा बहाल केला आहे. त्यामुळे भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता बस थांब्याची नितांत गरज होती.

आतापर्यंत शेटफळ व मोडनिंब येथेच बस थांबे होते; परंतु अरण गाव या सुविधेपासून वंचित होते. त्यामुळे आता थांबा मिळाल्यामुळे प्रवाशातून समाधान व्यक्त होत आहे.हा निर्णय केवळ एका बस थांब्यापुरता मर्यादित नसून, अरणच्या सर्वांगीण विकासाची सुरुवात मानली जात आहे.

तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, कॅबिनेट मंत्री छगनराव भुजबळ, मंत्री अतुल सावे यांनी विशेष प्रयत्न सुरू ठेवले.शासन आणि प्रशासन हे या भागाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार या निमित्ताने झाला असल्याचे संत शिरोमणी सावता महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले.

## महत्वाचे...

### पत्ते खेळण्यासाठी पैसे दे म्हणून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. १९ जून -**
पत्ते खेळण्यासाठी पैसे दे म्हणून तरूणास हातातील कड्याने मारहाण करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षय उमाकांत डोलारे (वय २६, रा. मनोहर नगर झोपडपट्टी, मुरारजी पेठ, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन महेश विष्णु खुर्द (रा. मनोहर नगर झोपडपट्टी, मुरारजी पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ जून रोजी दीडच्या सुमारास मनोहर नगर झोपडपट्टी येथे अक्षय डोलारे हा थांबला होता. त्यावेळी डोलारे यास पत्ते खेळण्यासाठी पैसे दे म्हणून महेश खुर्द याने शिवीगाळ करीत हाताने मारहाण केली. यावेळी अक्षय याचे वडील उमाकांत यांनी माझ्या मुलाला का मारहाण करतोस असे विचारले असता महेश खुर्द याने तुला व तुझ्या मुलाला आज सोडणार नाही अशी धमकी देत त्याच्या हातातील कडा उजव्या मुठीत धरून उमाकांत यांच्या डोळ्यावर जोरात मारून जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### कुमठा तांडा येथे महिलेसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. १९ जून-**
दुकानातील माल घेतल्यानंतर पैशाच्या कारणावरून झालेल्या वादानंतर तीन महिलेसह तिघांना मारहाण करण्यात आली. ही मारहाण उत्तर सोलापूर तालुक्यातील कुमठे तांडा येथे बुधवारी रात्री ८.३० च्या सुमारास झाली. दिपा तुळशीराम पवार (वय ३०), अर्पिता तुळशीराम पवार (वय १५) व अस्मिता तुळशीराम पवार (वय १६, रा. कुमठे तांडा, ता. उ. सोलापूर) अशी मारहाण झालेल्या तिघांची नावे आहेत. कुमठे तांडा येथील दुकानात दिपा आणि अर्पिता या दोघी बुधवारी रात्री आठच्या सुमारास माल घेण्यासाठी गेल्या होत्या. माल घेतल्यानंतर पैसे देण्यावरून दुकानदार आणि जखमी यांच्यात वाद झाला. या वादानंतर मोहन पवार, साहिल पवार, सुरज पवार या तिघांनी लाकडाने तसेच लाथाबुक्यांनी दिपा आणि अर्पिता हिला मारहाण केली. यात तिघींना सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री दहाच्या सुमार त्या स्वत; शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### अज्ञात कारणातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. १९ जून-**
मुरारजी पेठेतील महात्मा फुले झोपडपट्टीत गुरुवारी सकाळी १०.४५ वाजता अज्ञात कारणातून तीन जणांनी विटा, फळीने मारहाण केली. आकाश दत्ता जाधव (वय २९) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी सकाळी १०.४५ च्या सुमारास आकाश हा त्याच्या राहत्या घराजवळ थांबला होता. त्यावेळी महादेव सौदागर जाधव व इतर दोघांनी त्याला काही कारण नसताना विटा, खुर्ची तसेच फळीने मारहाण केली. यात त्याच्या कपाळास जखम झाली तर सर्वांगास मकामार लागल्याने सकाळी ११.४० वाजता स्वत: उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### वीट भट्टीवर बांधून ठेवलेले गाढव पळवले; अज्ञात चोरट्यावर गुन्हा

**सोलापूर, दि. १९ जून-**
बळकोटे नगर येथे वीट भट्टीवर बांधून ठेवलेले गाळवे अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेल्याची घटना १६ जून रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सिद्धलिंग चंद्रप्पा म्हेत्रे (वय-३८,रा.प्रकाश बापूजी हौसिंग,लष्कर, सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे,पुढील तपास पोलीस हवालदार भांगे हे करीत आहेत.

# विविध क्षेत्रफळांच्या फ्लॅटना सारखेच देखभाल शुल्क

## सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी नियमावलीचा मसुदा जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ जून -**

- ऑनलाईन बैठकांना कायदेशीर दर्जा मिळेल
- सोसायटी नोंदणीचे शुल्क अडीच हजार वरून पाच हजार रुपये करण्यात येईल.
- खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी वारस आणि नामनिर्देशनाच्या नियमांचे सुलभीकरण करण्यात येणार आहे.
- पुनर्विकासासाठी सोसायटी जमिनीच्या दहा पट कर्ज काढू शकेल.
- हरकती आणि सूचना दाखल करण्याची मुदत १५ मेपर्यंत होती. या काळात ३०० हून अधिक सूचना आणि हरकती गृहनिर्माण सोसायटी आणि सदस्यांकडून प्राप्त झाल्या. या सूचनांचा विचार करून नियमावलीला अंतिम स्वरूप दिले जाईल आणि त्या विधी आणि न्याय खात्याकडे मंजुरीसाठी पाठवल्या जातील.
- हाऊसिंग फेडरेशनने या नियम बदलांचे स्वागत केले असून, न्यायिक वाद आणि अस्पष्टता दूर होईल.

सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये असणाऱ्या विविध क्षेत्रफळांच्या सदनिकांसाठी एकसारखे देखभाल शुल्क आकारण्याची तरतूद नव्या नियमावलीमध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधून गृहनिर्माण संस्थांशी संबंधित प्रकरण वेगळे काढल्यानंतर ५ वर्षांनी त्याबाबतच्या नियमांचा मसुदा जाहीर करण्यात आला आहे.



नव्या नियमांमध्ये एखाद्या गृहनिर्माण संस्थेतील विविध क्षेत्रफळांच्या सदनिकांसाठी एकसारख्या देखभाल शुल्काची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सोसायटी नोंदणी शुल्क २ हजार ५०० रुपयांवरून ५ हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. गृहनिर्माण संस्थेतील एखाद्या सभासदाने देखभाल शुल्क थकवल्यास त्यावर कमाल २१ टक्क्यांपर्यंत व्याज आकारता येते. काही गृहनिर्माण संस्था चक्रव्याढ पद्धतीनेही व्याज आकारतात. अशा प्रकरणांसाठी सरळव्याज या घटकाची व्याख्या करण्याविषयीची सूचना द मुंबई डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेडने केली आहे.

मूळ कायद्यातून गृहनिर्माण संस्थांबाबतचे सुधारित प्रकरण २३ जुलै २०१९ रोजी वेगळे करण्यात आले. त्यानंतर नियम तयार करण्याची प्रक्रिया रखडल्याने गृहनिर्माण संस्थांबाबत अनेक गोष्टी अस्पष्ट होत्या. ५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आलेल्या नियमांमुळे अनेक गोष्टींबाबत स्पष्टता येऊ शकेल. गृहनिर्माण संस्थांतील खुले पार्किंग, पोडियम पार्किंग, मेकॅनिकल पार्किंग, इत्यादींची व्याख्या स्पष्ट करण्याविषयी फेडरेशनने सुचवले आहे. मूळ सभासदाच्या निधनानंतर त्याच्या पश्चात नेमण्यात आलेल्या वारसाला तात्पुरता सभासद म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

# सरकारी डॉक्टरांना मारहाण, आरोपीची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. १९ जून-**
येथील भोजप्पा तांडा कवठे ता. उत्तर सोलापूर येथील रहिवासी राहुल रतन राठोड (वय ३४), रतन गोविंद राठोड (वय ६३) या दोघांची प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरास शिवीगाळ व मारहाण केल्याप्रकारणीच्या खटल्यात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.



यात हकीकत अशी की, ६ जून २०20 रोजी दुपारी तिरे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. गोडसे, डॉ.कुलकर्णी हे इतर स्टाफसह कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांच्या नातेवाईकांची कॉन्टॅक्ट ट्रेसिंग साठी भोजप्पा तांडा येथे गेले होते. त्यावेळी वरील दोघांनी त्यांच्या अंगावर जाऊन शिवीगाळ करून त्यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. अशा आशयाची फिर्याद डॉ. गोडसे यांनी सलगर वस्ती पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती. सदर प्रकरणाची सुनावणी सत्र न्यायाधीश यांचे समोर झाली. सदरकामी सरकार पक्षातर्फे एकूण सहा साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये आरोपीच्या वकिलांनी आरोपीची बाजू मांडताना बरीचशी महत्वाची कागदपत्रे कोर्टात दाखल केली. त्यामध्ये युक्तिवाद करताना कोर्टाच्या निदर्शनास आणून दिले की, डॉ. विरोधात बऱ्याचशा तक्रारी होत्या त्या तक्रारी करण्यामागे आरोपीच आहेत असा गैरसमज डॉक्टरांना होता त्या रागातून डॉक्टरांनी आरोपीविरुद्ध खोटी केस केलेली आहे. सरकार पक्ष गुन्हा शाबित करू शकले नाहीत या सर्व मुद्द्याचा विचार घेऊन आरोपीची निर्दोष मुक्तता करावी असा युक्तिवाद आरोपीतर्फे अॅड.शशी कुलकर्णी यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून मे कोर्टाने आरोपीची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीतर्फे अॅड.शशी कुलकर्णी अॅड.गुरुदत्त बोरगावकर, अॅड. प्रसाद अग्निहोत्री, अॅड. आदित्य अदोने यांनी काम पाहिले तर सरकार पक्षातर्फे अॅड. आनंद कुर्डूकर यांनी काम पाहिले.

# रमाई घरकुल योजना सोलापूर शहरात प्रभावीपणे राबवावी

- राष्ट्रवादीचे आनंद चंदनशिवे यांचे समाज कल्याण प्रधान सचिव कांबळे यांना निवेदन

**मुंबई, दि. १९ जून-**
सोलापूर शहरातील रमाई आवास योजना प्रभावीपणे राबवण्यात यावे या मागणीचे निवेदन मुंबई मंत्रालय येथे समाज कल्याणचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दिले.

या भेटीवेळी आनंद चंदनशिवे यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील अर्जदार लाभापासून वंचित राहत आहेत. सोलापूर महानगरपालिका व सहाय्यक समाज कल्याण विभाग सोलापूर यांच्या दिरंगाईमुळे लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याबाबतची यावेळी तक्रार केली. सोलापूर शहरातील रमाई घरकुल योजना प्रभावीपणे राबवण्याबाबत आदेश करावेत अशी विनंती



महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांना केली. याप्रसंगी प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचे पत्र संबंधित विभागांना पाठविण्याचे आदेश दिले. या प्रसंगी माजी नगरसेवक गणेश पुजारी, प्रा. अविनाश शिंदे उपस्थित होते.

# महापालिकेतील ६६ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**
महापालिकेतील सुमारे दीडशे कर्मचाऱ्यांना १० - २० - ३० या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तर ६६ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली असून सात अनुकंपा आणि ६३ जणांना लाड- पागे अंतर्गत नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. दरम्यान, महापालिका सामान्य प्रशासन विभागाच्या चांगल्या कामाचे कौतुक महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे रुजू झाल्यानंतर आतापर्यंतच्या कार्यकाळात कर्मचाऱ्यांच्या हिताचे निर्णय झाले. नुकतेच सुमारे १५० कर्मचाऱ्यांना १० - २० - ३० या आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आला आहे. तर ६६ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली असून सात अनुकंपा आणि ६३ जणांना लाड पागे अंतर्गत नियुक्त्या देण्यात आल्यास आहेत. आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळाल्याने तसेच इतर पदोन्नत्या दिल्याने महापालिकेतील कर्मचारी अधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या चांगल्या कामाबद्दल अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्यासह या विभागाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे कौतुक आणि गौरव महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी बैठकीत केला.

### गॅस सिलेंडरचा भडका उडून तरुणी जखमी

**सोलापूर** - गॅस सिलेंडरवर पाणी तापवत असताना अचानक सिलेंडर टाकीतून आगीचा भडका उडाल्याने तरुणी भाजून जखमी झाली. हा प्रकार गुरुवारी सकाळी ९ वाजता घडला.कृष्णवेणी शिवकुमार चौडम (वय २२, रा. जुना विडी घरकुल, सोलापूर) असे भाजलेल्या तरुणीचे नाव आहे. गुरुवारी सकाळी ९ च्या सुमारास कृष्णवेणी ही घरातील गॅस सिलेंडर पेटवून त्यावर पाणी तापवत होती. त्यावेळी अचानक सिलेंडरमधून आगीचा भडका उडाला. यामध्ये नाकाला आणि पोटाला भाजल्याने सकाळी ९.५० वाजता भाऊ अंबादास रंगम याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# फ्रान्स येथील जागतिक युएनओ परिषदेत प्रा. चन्ना यांचे मार्गदर्शन

- महासागरी ऊर्जेच्या असीम ताकदीकडे वेधले जगाचे लक्ष



**सोलापूर, दि. १९ जून-**
संयुक्त राष्ट्र महासागर परिषदेत जागतिक पर्यावरण परिषदेचे भारताकडील अध्यक्ष या नात्याने मार्गदर्शन करण्याची मला संधी मिळाली. यामध्ये महासागरी ऊर्जेच्या असीम ताकदीकडे जगाचे लक्ष वेधले. सागरी जैवविविधतेचे रक्षण करण्यासाठी प्रादेशिक आणि उपप्रादेशिक सहकार्याची गरज आहे असे विचार त्या परिषदेत मांडले असल्याची माहिती सोलापूरचे प्रा. गणेश चन्ना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

फ्रान्स येथील जागतिक युएनओ परिषदेत झालेल्या विचार मंथनासंदर्भात प्रा. चन्ना यांनी यावेळी माहिती दिली. स्थानिक समुदाय हे भागधारकांपेक्षा जास्त असले पाहिजेत. ते सहव्यवस्थापक असले पाहिजेत. संयुक्त राष्ट्र आणि सरकारांना संवर्धन आणि शाश्वत वापराशी सुसंगत असलेल्या सह डिझाईन केलेल्या एमपीए धोरणांना पाठिंबा देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. जे शिल्लक आहे ते जतन करू नये. जे गमावले आहे ते पुनरसंचयित करू आणि जे अजूनही जतन केले जाऊ शकते ते पुनर्जीवित करण्यात यावे यावर भाष्य करण्यात आले असल्याचेही प्रा. चन्ना यांनी सांगितले.

## सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवाना घोटाळा

# दोन अभियंत्यासह लिपिकास जामीन मंजूर

**सोलापूर, दि. १९ जून-**
सोलापूर महानगरपालिका बोगस बांधकाम परवाना घोटाळा प्रकरणी अभियंता झेड. ए. नाईकवाडी (वय ५८ वर्षे), श्रीकांत खानापुरे (वय ५८) व लिपिक आनंद क्षीरसागर (वय ५२, सर्व राहणार सोलापूर) यांना जिल्हा व सत्र न्यायाधीश जे. जे. मोहिते यांनी जामीन मंजूर केली.

यात हकीकत अशी की जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत एकूण ९६ प्रकरणे सोलापूर महानगरपालिका बांधकाम परवाना विभागातील अभियंते झेड ए नाईकवाडी, श्रीकांत खानापुरे, लिपिक आनंद क्षीरसागर व इतरांनी संगणमत करून बांधकामाचे नकाशे मंजूर करण्याचे अधिकार हे त्यांना नाहीत हे माहीत असून देखील ते त्यांनी मंजूर केले. तसेच खोटे व बनावट बांधकाम परवाने त्यांनी दिले. तसेच सदर बांधकाम परवाने मंजूर केले बाबतचे आवक रजिस्टर, तसेच दिलेले ९६ परवाने हे जाणीवपूर्वक नाश करून अथवा कोठेतरी विल्हेवाट लावून महापालिकेचे सुमारे २ कोटी दहा लाख तीस हजार चारशे त्रेचाळीस रुपये रुपयांचे आर्थिक नुकसान केले, असे दोषारोप पत्रकात नमूद करण्यात आले होते. सदर घटने बाबतची फिर्याद दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी उपअभियंता बांधकाम परवाना विभाग सोलापूर महानगरपालिका नीलकंठ शिवानंद मठपती यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात दिली होती. जामीन मिळावा म्हणून या आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर येथे जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीच्या वेळेस अॅडव्होकेट मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तिवादात सदरचा गुन्हा हा कागदोपत्री पुराव्यावर अवलंबून असून गुन्ह्याचा तपास पूर्णता संपलेला आहे. त्यामुळे जामीनावर सोडल्यास सरकारी पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही, असा युक्तिवाद मांडला तो ग्राह्य धरून न्यायाधीशांनी १ लाख रुपयाच्या जात मुचुलक्यावर जामीन मंजूर केला. यात आरोपींतर्फे अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. शशी कुलकर्णी, अॅड. विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे अॅड. दत्ता पवार यांनी काम पाहिले.










**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# उड्डाणपुलासाठी अगोदर ४९ शासकीय जागा ताब्यात घ्या

## नंतरच खाजगी जागेचे अधिग्रहण करा : केतन शहा

**सोलापूर, दि. १९ जून-**

शहरातील उड्डाणपुलासाठी अगोदर ४९ शासकीय जागा ताब्यात घ्या त्यानंतरच खाजगी जागेचे अधिग्रहण करा अशी मागणी महाराष्ट्र चेम्बर ऑफ कॉमर्स गव्हरनिंग कॉन्सिल सदस्य केतन शहा यांनी केली आहे.

२००८ साला पासून बोरामणी येथील १५०० एकर जागा खासगी शेतकऱ्यांच्या कडून विमानतळासाठी काढून घेतली. आज २०२५ साल उजाडले फक्त एक शासकीय वनविभागा कडून जागा आपणास ताब्यात घेता आली नाही. हीच परिस्थिती उड्डाणपुलाची आहे. १० वर्षापासून नुसत्या घोषणाच व वायदेच होत आहेत. ४९ सरकारी जागा आहेत. बोरामणी विमानतळासाठी एक सरकारी जागा ताब्यात घेण्यास १७ वर्षे गेली तरी ताब्यात मिळाली नाही. इथे ४९ जागा कधी ताब्यात घेणार असा प्रश्न उपस्थित केला आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्राचार्यपदी डॉ. अरुण मित्रगोत्री

**सोलापूर, दि. १९ जून-**



येथील मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्रभारी प्राचार्यपदी डॉ. अरुण मित्रगोत्री यांची निवड करण्यात आली आहे. प्रा डॉ. मित्रगोत्री १९८९ पासून छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजमध्ये इंग्रजी विषयाचे विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांची महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी निवड केली आहे. या निवडीबद्दल संस्थेचे सरचिटणीस प्रा. महेश माने यांच्यासह सर्व संचालक मंडळ तसेच माजी प्राचार्य डॉ मधुकर पवार प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, प्रा. संध्या परांजपे, सोलापूर कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

### पंचांगकर्ते ओंकार दाते यांचे आज व्याख्यान

**सोलापूर, दि. १९ जून-**



रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांनी पंचांगाचे आपल्या जीवनातील स्थान या विषयावर श्री ओंकार दाते यांचे व्याख्यान आयोजित केले आहे हे व्याख्यान आज शुक्रवार २० जून रोजी हेच फ्री मेसॉन हॉल रंगभवन चौक येथे संध्याकाळी ६.३० वाजता आयोजित केले आहे ओंकार दाते हे पंचांगकर्ते असून प्रख्यात पंचांगकार श्री अनंत (मोहन) दाते यांचे चिरंजीव आहेत टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून संस्कृत विशारद व वेद विषयामध्ये पारंगत पदव्या प्राप्त केल्या आहेत पंचांग धर्मशास्त्र आणि मुहूर्त विषयक अध्ययन केले आहे गेली १८ वर्ष वडिलांना दाते पंचांगाच्या कार्यात मदद करत आहे हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष रोटे सीए सुनील माहेश्वरी यांनी केले आहे.

### कासेगांव येथे आज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**पंढरपूर दि.१९ जून-**

सामान्य नागरिकांना महसूल विभागाचे विविध दाखले ग्रामस्तरावर उपलब्ध व्हावेत यासाठी कासेगांव मंडलस्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्ग समाधान शिबीराचे आयोजन यल्लमा देवी मंदीर सभागृह कासेगाव येथे शुक्रवारी (ता.२० जून) करण्यात आले असून, कासेगांव मंडलातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडल अधिकारी पंकज राठोड यांनी केले आहे या शिबीरात कासेगाव मंडळातील कासेगाव, गोपाळपूर, अनवली, एकलासपूर, शिरगांव, तरटगाव (का) या गांवातील नागरिकांसाठी महसूल विभागाचे विविध दाखले एकाच ठिकाणी देण्यात येणार आहेत.

### नळबझार चौकात तरूणास कोयत्याने मारहाण

**सोलापूर दि.१९ जून-**

नळ बझार चौकात तरूणास कोयत्याने मारहाण केल्याप्रकरणी तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला



आहे. याबाबत गणेश किसन बोधीवाले (वय २७, रा. बेडर पूल, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन भोला जमादार, गण्या राम जमादार, सचिन गायकवाड (रा. नळ बझार चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जून रोजी सायंकाळी गणेश बोधीवाले हा नळ बझार चौक येथे भाजी घेण्यास जात होता. त्यावेळी भोला जमादार याचा सासरा दारू पिऊन बोधीवाले याच्या अंगावर आला. त्यामुळे बोधीवाले याने जमादार याच्या सासऱ्यास हाताने धरले असता जमादार याने बोधीवाले यास तु माझ्या सासऱ्याला का ढकलला असे म्हणून त्याच्या हातातील लाकडी बांबूने तसेच इतरांनी बोधीवाले याच्या पाठीवर, डाव्या पायावर, मांडीवर तसेच सचिन गायकवाड याने कोयत्याने बोधीवाले याच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक अहिवळे पुढील तपास करीत आहेत.

# पद्मश्री मारुती चितमपल्ली अनंतात विलीन; शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

- पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वाहिली श्रद्धांजली
- रूपाभवानी येथील हिंदू स्मशानभूमीत शेकडोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार
- आज सायंकाळी सहा वाजता हि.ने. वाचनालय येथे शोक सभेचे आयोजन
- रविवारी रंगभवन येथे शोकसभा होणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

वन्य जीवाचे अभ्यासक, लेखक ,साहित्यिक व वन अधिकारी अन् सोलापूरचे सुपुत्र अरण्यऋषी पद्मश्री मारुती भुजंगराव चितमपल्ली यांच्या पार्थिवावर गुरुवारी साडेतीन वाजता शासकीय इतमामात रूपाभवानी येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सोलापूर शहर पोलिसांनी बंदुकीच्या हवेत तीन फैरी झाडून चितमपल्ली यांना मानवंदना दिली. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे अंत्यदर्शन घेतले.

रविवारी २२ जून रोजी शहरातील रंग भवन येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतिले यांनी दिली. तर शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले असल्याचे श्रीकांत येळेगावकर यांनी सांगितले.

चितमपल्ली यांच्या पार्थिवावर अक्कलकोट रस्त्यावरील निवासस्थानी तिरंगा ध्वज ठेवण्यात आला होता. अक्कलकोट रोड येथील निवासस्थानी संस्था संघटनेचे पदाधिकारी व राजकीय क्षेत्रातसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अंतदर्शन घेतले.

सोलापूर शहर पोलिसांच्या वतीने त्यांच्या पार्थिवास राहत्या घरीही मानवंदना देण्यात आली होती. दुपारी साडेबारा वाजता त्यांची अंत्ययात्रा राहत्या घरापासून निघाली होती. सदरची अंतयात्रा तीन वाजता स्मशानभूमी मध्ये पोहोचली.

अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, जिल्हाधिकारी कुमाराशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार, ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सामाजिक वनीकरणचे अजित शिंदे, मनीषा पाटील, यांनी पुष्पचक्र अर्पण केले.

यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, हिराचंद नेमचंद वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.



श्रीकांत येळेगावकर, ज्येष्ठ साहित्यिक सुहास पुजारी, कवी मारुती कटकधोंड, नरेंद्र गंभीरे, डॉ. राजशेखर शिंदे, डॉ.श्रीकांत कामतकर, वैज्ञानिक व्यंकटेश गंभीरे,निनाद शहा, सुरेश अलमारी, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, यांच्यासह अन्य मान्यवर तसेच त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, साहित्यिक यांच्यासह त्यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन वीरपत्नींचा श्रीकाशीमहापीठाचे खेणी मातृशक्ती राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

- रविवारी लातुरात पुरस्कार वितरण

**सोलापूर, दि. १९ जून-**

जगद्गुरू विश्वाराध्य ज्ञानसिंहासन, जंगमवाडी मठ, वाराणसी यांच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. रविवार दि. २२ जून रोजी सकाळी ११ वाजता हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती डॉ. अनिल सर्जे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



माधुरी वनंजे



दीपाली गायकर

लातूर येथील ओम हामणे पॅराडाईज येथे हा कार्यक्रम होणार आहे. श्रीकाशीजगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजीयांच्या अमृतहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. श्री ष.ब्र. १०८ डॉ. शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज हिरेमठ संस्थान औसा व सद्गुरू ह. भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर नाथ संस्थान औसा यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर हे राहणार आहेत. भारत फोर्ज कंपनी लिमिटेड पुणेचे अध्यक्ष बाबासाहेब कल्याणी व त्यांच्या सुविद्य पत्नी सुनीता बाबासाहेब कल्याणी तसेच लातूरचे खा. डॉ. शिवाजी काळगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. मालती महारुद्रप्पा खेणी मातृशक्ती राष्ट्रीय पुरस्कार दोन वीरपत्नींना देण्यात येणार आहे. वीरपत्नी माधुरी सचिन वनंजे (नांदेड) व दिपाली संदीप गायकर (अहिल्यानगर) यांना एक लाख रुपये रोख, गौरवपत्र, शाल, श्रीफळ, रोप, व रुद्राक्ष माळ देऊन गौरवविण्यात येणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आठ मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. दहा हजार रुपये रोख रक्कम, गौरवपत्र, रुद्राक्ष माळ, शाल, श्रीफळ व रोप असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पत्रकार परिषदेस वेदमूर्ती बसवराज शास्त्री, सिद्धया स्वामी हिरेमठ, बाबुराव मैंदर्गीकर , रेवणसिद्ध वाडकर, प्राचार्य विद्यानंद स्वामी, सिद्रामय्या हिरेमठ, चिदानंद मुस्तारे, सचिन विभुते, राजेंद्र बलसुरे आदी उपस्थित होते.

# अनुसूचित जाती जमातींचा निधी पळविला

- युवानेते सुजात आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली वंचितचा सोमवारी जनआक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

अनुसूचित जाती जमातीचा निधी पळविल्याच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने युवा नेते सुजात आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली सोलापुरात सोमवार २३ जून रोजी सकाळी ११ वाजता जन आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ. नितीन ढेपे यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून या मोर्चाचा प्रारंभ होणार आहे. पुढे जिल्हा परिषद कार्यालया समोर या मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर होणार आहे. यावेळी युवा नेते सुजात आंबेडकर, डॉ. ढेपे, उपाध्यक्ष सोमनाथ साळुंखे, जिल्हा निरीक्षक अरुण जाधव, युवा राज्य कार्यकारणी सदस्य अमोल लांडगे यांचे मार्गदर्शन होणार आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आश्चर्यकारक ७६ लाख मतदान आले कुठून याचा निवडणूक आयोगाने डेटा द्यावा. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात. अनुसूचित जाती जमातीचा निधी इतरत्र वळवला जाऊ नये यासाठी कायदा करावा. अनुसूचित जाती जमातीच्या निधी संदर्भात महाराष्ट्र शासनाने श्वेतपत्रिका काढावी आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात येणार आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ.ढेपे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे , शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, विक्रांत गायकवाड, अनिरुद्ध वाघमारे, विजयानंद उघडे , शाहिद शेख , रवी थोरात, विनोद इंगळे, पल्लवी सुरवसे, श्रीनिवास संगेपांग आदी उपस्थित होते.

# शहरातील उखडलेल्या रस्त्यांवर अपघाताला मिळते आमंत्रण

- रस्त्यावर विखुरली सर्वत्र खडी; प्रशासन अनभिज्ञ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जून-**

सोलापूर शहरातील विविध रस्त्यांची अवस्था दयनीय बनत आहे. पावसाळ्यामध्ये रस्त्यांचे खरे रूप आता वाहनधारकांसमोर येत आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांची चाळण झाली असून उकडलेले रस्त्यांवर अपघाताला आमंत्रण मिळत आहे. सर्वत्र खडी विखुरल्याने वाहतधारकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. मात्र याकडे महापालिका प्रशासनाचे वारंवार दुर्लक्ष होताना दिसत आहे.

शहराच्या प्रमुख रामलाल चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. विखुरलेली खडी वाहनधारकांसाठी त्रासदायक ठरत आहे. या रस्त्यांवरून शाळकरी मुले व्यावसायिक तसेच रिक्षा यांची सारखी वर्दळ असते. वर्दळीच्या रस्त्यांवरच खड्ड्यांचे साम्राज्य पडल्याने वाहनधारकांना वाहन चालवताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. खड्डा चुकवण्यासाठी ब्रेक मारला असता खडीवरून दुचाकी स्लिप होण्याची शक्यता आहे. वेगाने वाहन चालवल्यास अपघाताचा धोका बळावत आहे. अशा दुहेरी समस्येत वाहनधारक अडकल्या असून पालिका प्रशासन मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करताना दिसत आहे. रस्त्याच्या बाजूलाच मुरूमचा ढिगारा ठेवण्यात आला आहे. परंतु सदरचे रस्ता दुरुस्त करण्याचे काम अद्यापही हाती घेण्यात आले नाही.

दरम्यान, शहरात पावसाचा जोर वाढण्या अगोदर शहरातील सर्व रस्ते दुरुस्त किंवा दुबार डांबरीकरण करणे गरजेचे आहे. याच उखडलेल्या रस्त्यांवर अपघाताचे प्रमाण वाढत आहे. याकडे संबंधित झोन अधिकारी तसेच महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे बनले आहे. शाळा सुरू झाल्यानंतर येथे सायकलवरून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देखील लक्षणीय आहे. अशा अवस्थेत रस्त्यातील खाचगळगे विद्यार्थ्यांसाठी जीव घेणे ठरू शकतात. त्यामुळे महापालिका प्रशासनाने अशा रस्त्यांची तात्काळ डागडूजी करणे आवश्यक आहे.

# तिसऱ्या दिवशी मोहिमेत उचलली १५ टन माती; आजोरा

- महापालिकेची शहरात विशेष स्वच्छता मोहीम ४.०
- विविध आठ रस्त्यांची केली स्वच्छता



**सोलापूर दि.१९ जून-**

सोलापूर महापालिकेच्या विशेष स्वच्छता मोहिमेअंतर्गत आज गुरुवारी तिसऱ्या दिवशी शहरातील विविध आठ मुख्य रस्त्यांची स्वच्छता करण्यात आली. यामध्ये १५ टन कचऱ्यासह माती, आजोरा उचलण्यात आला.

सोलापूर महानगरपालिकेचे वतीने आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या नियंत्रणाखाली दिनांक १७ ते २७ जून पर्यंत रोज सकाळी ७ ते ११ या वेळेत शहरातील मुख्य रस्त्यांची स्वच्छता मोहीम राबविली जात आहे. त्या त्या विभागातील नियंत्रण अधिकारी यांच्या अधिपत्याखाली विशेष स्वच्छता मोहीम ४.० राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील एकूण ७८ रस्ते चकाचक होणार आहेत. सोलापूर शहरातील मुख्य रस्त्याची स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली आहे. विभागीय कार्यलय एक ते आठ मध्ये सुरु असून या मोहिमेमध्ये गुरुवारी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते रेल्वे स्टेशन, धरम काटा चौक ते दयानंद कॉलेज, रूपा भवानी चौक ते धरम काटा चौक, बनशंकरी चौक ते विजयनगर बस स्टॉप, एचएसआर पाणी टाकी ते बनशंकरी चौक, विजापूर नाका ते पनाश अपार्टमट, पत्रकार भवन ते सात रस्ता, डीआरएम ऑफिस ते डफरीन चौक आदी आठ रस्त्यांवर मोहीम राबविण्यात आली.

महापालिकेचे सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी सुरु असलेल्या मोहिमेची पाहणी केली. यावेळी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या सह अधिकारी,आरोग्य निरीक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

### महापालिकेतील विविध विभागांचा सहभाग : अतिरिक्त आयुक्त पवार

या मोहिमेत महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, विभागीय अधिकारी कार्यालय, उद्यान विभाग, संगणक विभाग, अतिक्रमण प्रतिबंधक विभाग आदी पाच विभाग कार्यरत आहेत. रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत याची दक्षता घेणे, रस्त्यावरील अनधिकृत खोके आणि इतर अतिक्रमण काढणे, रस्त्यावरील धूळ काढणे,लाईट पोल वरील बोर्ड, स्टिकर काढणे, वाढलेले गवत काढणे, रस्त्यावरील आजोरा काढणे झाडांच्या फांद्या छाटणी दोन्ही बाजूंवरील फुटपाथ वरील स्वच्छता करणे , कचरा काढणे अशी कामे करण्यात येत आहेत, अशी माहिती महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी दिली.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११५२

**हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं ।**
**तरी तेचि गा आतां परियेसीं । विवंचना ।।**

अर्जुनाने श्रीकृष्णाला वेगवेगळे प्रश्न विचारण्याचे काम चालुच ठेवले आहे. ज्ञान, विज्ञान, अज्ञान यावर चर्चा करता करता माया म्हणजे काय ? या विषयावर चर्चा करण्यास श्रीकृष्णाला अर्जुनाने प्रारंभ करण्यास भाग पाडले आहे. आपल्या शरीराची छाया जशी असते, त्या प्रमाणे महतत्व हे जिचे पहिले कार्य असते. अशी ही पृथ्वीपर्यन्त परिणामाला प्राप्त झालेली माया होय. या मायेला, प्रकृत्ती असे समजले जाते. या मायेमुळे हे त्रैलोक्य उत्पन्न होते. ही माया कशी असते हे सांगतांना भगवंत म्हणाले, हे अष्टधा भिन्न कैसी । ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं । तरी तेचि गा आतां परियेसीं । विवंचना । अर्थात माया ही आठ प्रकारांनी भिन्न असते. ही भिन्नता कशी आहे, याचे स्पष्टीकरण भगवंत करीत आहेत. पाणी, अग्नी, आकाश, पृथ्वी, वारा, मन, बुध्दी आणि अहंकार असे वेगवेगळे आठ भाग या मायेचे असतात. या आठ भागांची सारखेपणाची स्थिती म्हणजेच ब्रम्ह किंवा परमतत्व होय. या ठिकाणी सारखेपणाची स्थिती हा अत्यंत महत्वाचा भाग आहे हे लक्षात ठेवावे लागेल. या आठ भागांच्या रचनेस जीव म्हटले जाते. ही माया या जीवाला सज्ञान करते. मनाकडून शोक उत्पन्न करुन मोह मानावयास माया माणसाला भाग पाडते. बुध्दीचे जे जाणतेपण असते तेही या मायेच्या सहवासाचेच फळ असते. या एकाच मायेतून निर्माण होणारे जीव वेगवेगळे दिसु लागतात. प्रत्यक्षात ते सर्व मुळात एकच असतात. या जिवांकडून कर्म-अकर्माचा व्यवहार घडला जातो. जगाच्या उत्पत्तीला ,वाढीला व अंताला ही मायाच म्हणजे एकत्रित परमतत्वच कारणीभुत असते.



मृगजळाचे मुळ शोधण्यास गेल्यास किरणाच्या मागे मुळात सुर्यच असल्याचे दिसते. अगदी या प्रमाणे म्हणजेच मृगजळाप्रमाणे दिसणारे वेगवेगळे जग कोठून आले त्याचा शोध घेत असता जीवरुपी किरणाच्या मागे गेल्यास एकच ब्रम्ह दिसेल. सोन्याचे मणी करुन ते सोन्याच्या सुतात/साखळीत ओवले तर मणी आणि साखळी वेगळी नसून ते मुळात सर्व सोनेच असल्याचे लक्षात येते. त्याप्रमाणे जीव भिन्न-भिन्न दिसत असले तरीही सर्व एकाच निसर्गाची निर्मीती आहे हे लक्षात घ्यावे. हा लहान-मोठा, गरीब-श्रीमंत असा वेगवेगवळा भेद करण्याचे कारणच नाही. वेगवेगळया शरीराने, रंगरुप आकाराने हे जग नटले असले तरीही मुळात ते सर्व एकच असल्याने आपण त्यांच्या कडे साम्यावस्थेने पाहावे. समतेचा दृष्टीकोन अंगीकारला तर जगाची खरी ओळख पटते. अर्थात, काम, दु:ख , मोह, स्वार्थ अशा वेगवेगळया कारणाने माणूस वेगवेगळा वागत असला तरीही तो भिन्न नाही. मुळात सर्व एकाच निसर्गाची , ब्रम्हाची ती निर्मीती आहे. वेगवेगळया कारणाने आपण वेगळे वागतो, जगतो, हे जरी सत्य असले तरी त्यांच्यात भिन्नता पाहू नये. प्रत्येक प्राणीमात्र हा एकाच ईश्वराचा अंश असल्याने त्यांच्यात भिन्नता असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. या नाशिवंत देहाला कारण नसतांना आपण मी मी म्हणतो म्हणून ईतरांना आपण आपल्यापेक्षा वेगळे समजतो. आपल्यातला मी जर आपण काढुन टाकला तर तो आपणाला सर्वत्र दिसेल. तो म्हणजे ज्याचा शोध घेण्यात आपण आपले आयुष्य घालवित आहोत. आपल्यातला मी काढण्यात आपण यशस्वी झालो तर ख-या अर्थाने आपणाला आपला स्वत:चा परिचय होईल आणि आपल्या जीवनात आनंदलहरी वाढतील.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - |
| दि. २० जून २०२५ | चांगला दिवस |
| विक्रम संवत् २०८१ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. अष्टमी (११.५५) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - उ.भाद्रपदा (२३.१६) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (२६.४५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (२२.५५) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्या मुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षम तेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल. समाजात आपली पत वाढेल.

# राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धेत वालचंद, ऑर्किडचे यश



**ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने आयोजन**

**देशातील विविध महाविद्यालयांमधून ७० पेक्षा अधीक संघांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

विजापूर रोडवरील ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीयस्तरावरील १.० या हॅकाथॉन स्पर्धेत वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक येथील ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय व तृतीय पुणे महाविद्यालयातील संघाने संपादिले.

या स्पर्धेत देशातील विविध महाविद्यालयांमधून ७० हून अधिक संघानी भाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने एआयआयओटी, सायबर सुरक्षा, कृषी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर नाविन्यपूर्ण डिजिटल सोल्यूशन्स सादर केली गेली. ही स्पर्धा दोन टप्प्यात घेण्यात आली. दुसऱ्या फेरीसाठी ७० मधून ३० संघांची निवड करण्यात आली. विजेत्या संघांना रोख पारितोषिके, ट्रॉफी व सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. निवडक प्रोजेक्ट्सना पुढील स्टार्टअप व इन्क्युबेशनसाठी निवडण्यात येणार आहे. तत्पूर्वी याचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन एस. ए. पाटील यांनी केले. यावेळी ट्रस्टी एस. एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही.व्ही. पोतदार आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन संगणक विभागातील कोड क्लब अंतर्गत करण्यात आले होते. मुख्य समन्वयक प्रा. एस. व्ही. कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. एम. एन. देशमुख व प्रा. ए. बी. हन्नूरे यांनी कोऑर्डिनेटर म्हणून काम पाहिले. स्पर्धेचे परीक्षण विकास बिनगे व डॉ. उदय बळगार यांनी केले.

# समाजकल्याण अधिकारी कवले यांच्या कामांची उपायुक्तांच्या पथकाकडून चौकशी

**दोन दिवस होणार चौकशी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

जिल्हा परिषदेचे तत्कालीन जिल्हा समाजकल्याण अधिकारी सचिन कवले यांनी केलेल्या कामांची चौकशी करण्यासाठी पुणे येथील समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त कार्यालयातील तीन जणांचे पथक दाखल झाले आहे.

तत्कालीन जिल्हा समाज कल्याण अधिकारी कवले यांच्या कालावधीत विविध कामात गैरप्रकार झाले असून त्याची चौकशी करण्याची मागणी दिव्यांग शिक्षक भारतीचे जिल्हाध्यक्ष दीपक मुठाळ यांनी दिव्यांग आयुक्तांकडे केली होती. त्यानुसार पुणे येथे समाजकल्याण उपायुक्त कार्यालयातील कार्यालय अधीक्षक राजशेखर कणसे, सहायक लेखाधिकारी ननवरे, लेखाधिकारी कुलकर्णी हे कवले यांनी केलेल्या कामांची तपासणी करत आहे. गुरुवारीं ही तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त यांना अहवाल सादर केला जाणार आहे. चौकशी समितीने तक्रारदारांकडे पुरावे मागितला आहे.

याबाबत समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांच्याकडे विचारणा केली असता पथकाकडून चौकशी सुरू असल्याचे सांगितले.



# श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने केले शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

श्री सिद्धेश्वर फाउंडेशनने शाळेच्या पहिल्याच दिवशी शहरातील पाच जिल्हा परिषद शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

शासनाकडून गणवेश, पुस्तके, बूट मिळतात. अनेक विद्यार्थ्यांना वहीसह इतर शैक्षणिक साहित्य घेणे कठीणच असते. म्हणून वह्यांचे नियोजन श्री सिद्धेश्वर फाउंडेशन केले. मजरेवाडी, लोकमान्य नगर, कुमठे, कल्याणनगर आणि टिकेकरवाडी या शाळांमधील ३५० विद्यार्थ्यांना १२२१ वह्या तसेच इतर शैक्षणिक साहित्यांचे वाटप शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी गुरुवर्य अरुण उपाध्ये होते. फाउंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थअण्णा सर्जे यांनी प्रास्ताविक केले. मजरेवाडी शाळेचे मुख्याध्यापक शिवानंद भीमणवरू, टिकेकरवाडीचे मुख्याध्यापक सिद्धराया कोळी, लोकमान्य नगरचे मुख्याध्यापक लक्ष्मण सरवदे, कल्याण नगरचे मुख्याध्यापक अमरिश गोसावी, कुमठ्याचे मुख्याध्यापक श्रीमती सुतार यांनी सहकार्य केले. या वेळी पोलिस निरीक्षक दादासाहेब गायकवाड, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेली, यशवंत हिरापुरे, ममता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# प्रणय कांबळे यांचे एलएलएम परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

सोलापुरातील प्रणय यशवंत कांबळे यांनी एल.एल.एम. परीक्षेमध्ये ६१ टक्के गुण घेऊन घवघवीत यश मिळविले आहे. त्याचे शालेय शिक्षण मॉडर्न हायस्कूल येथे तर महाविद्यालीयन शिक्षण दयानंद येथे झाले आहे. सोलापूर जिल्हा भूमिअभिलेख विभागातील दक्षिण सोलापूर भूमी अभिलेख उपअधीक्षक यशवंत कांबळे यांचा प्रणय हा मुलगा आहे. या यशाबद्दल प्रणय यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# पालकांच्या कष्टाने मुलांचे भवितव्य उज्वल ठरते : उद्योजक उडता

**श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमतर्फे जागतिक पालक दिनानिमित्त कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

मातृ देवो भव:, पितृ देवो भव: आणि आचार्य देवो भव: असे आपल्या भारतीय संस्कृतीत म्हटले जाते. मुलांचे जडणघडण होण्याकामी पालकांची भूमिका फार मोलाची असते. पालकांनी आज घेतलेल्या कष्टामुळे मुलांचे भवितव्य उज्वल ठरण्यास मदत होते, असे प्रतिपादन उद्योजक विजयकुमार उडता यांनी केले.

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन व पद्मशाली सखी संघमच्यावतीने जागतिक पालक दिनानिमित्त कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.पूर्व भागातील श्रीराम मंदिरात झालेल्या या कार्यक्रमात रामचंद्र गाडी, रामुलू इंजामुरी व विष्णू सकीनाल या ज्येष्ठ पालकांचा सपत्निक सन्मानपत्र, गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कट्टा टेक्सटाइलतर्फे टर्किश टॉवेल तर संयोजकांच्या वतीने पेढे देण्यात आले. यावेळी शिक्षिका उमा कोटा, कला चन्नापट्टण, लता येमूल, सी. ए. चंद्रकांत इंजामुरी व मुंबईत कार्यरत असलेल्या पी.एस.आय. वरलक्ष्मी सकीनाल यांचाही सत्कार करण्यात आले.

प्रारंभी पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांनी मान्यवरांचे स्वागत केले. समन्वयिका कला चन्नापट्टण प्रास्ताविक करुन सूत्रसंचालन केले. उमा कोटा यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. आभार सल्लागार ममता मुदगंडी यांनी मानले. यावेळी व्यासपीठावर सत्कारमूर्ती, मान्यवरांसह श्रीराम मंदिराचे विश्वस्त व फाउंडेशनचे सल्लागार दयानंद कोंडाबत्तीनी सह फाउंडेशनचे, सखी संघमचे पदाधिकारी उपस्थित होते. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा यांचे संकल्पना व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.



# नदी, नाल्यांच्या आरोग्याकडे लक्ष देत परिसर पाणीदार बनवा

**सोलापूर, दि. १९ जून-**

आज सर्वत्र प्रदूषण वाढले आहे. प्लास्टिकचा वापरही वाढला आहे. त्यामुळे नदी, नाले, समुद्र प्रदूषित बनले आहेत. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी नद्यांचे आरोग्य बिघडवले आहे. वेळीच खबरदारी घेऊन नदी, नाल्यांच्या आरोग्याकडे लक्ष देत आपला परिसर पाणीदार बनवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन प्रख्यात जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्र सिंह यांनी केले पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पीएम उषा योजनेअंतर्गत चला जाणूया नदीला या विषयावर आयोजित एनएसएस कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या कार्यशाळेत डॉ. सिंह बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, जल बिरादरीचे अध्यक्ष नरेंद्र चूघ, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, एनएसएसचे जिल्हा समन्वयक डॉ. विरभद्र दंडे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. ममता बोल्ली यांनी केले

# साकव कट्ट्यावर जमली कवींची मैफिल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**



साकव फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. जगदीश पाटील यांच्या घरी काव्य मैफिलीचे आयोजन केले होते. या मैफिलीत सोलापूरमधील अनेक कवींनी त्यांच्या कवितांचे बहारदार सादरीकरण केले.

या मैफिलीत सोलापूरचे कवी माधव पवार यांनी कविता व कवितेच्या निर्मिती प्रक्रियेवरील सुंदर असे मार्गदर्शन करत त्यांच्या दोन कवितांचे सादरीकरण केले आणि वातावरण भारावून टाकले. गझलकार बदिउज्जमा बिराजदार यांनी पितृ दिनाचे औचित्य साधून वडिलांवरील कवितेचे सादरीकरण करून सर्वांना अंतर्मुख केले. ग्रामीण साहित्यिक अरुण नवले यांनी निसर्गावरील कविता सादर केली. कवियत्री राजश्री जाधव यांनी मोबाईल या विषयावरील कविता सादर करून आजच्या पिढीची अवस्था व्यक्त केली. नरेंद्र गुंडेली यांनी विघ्नहर्ता ही गणरायाच्या आगमनाची कविता सादर करून भक्तिमय वातावरण तयार केले. कवी राम माने,शैलेश उकरंडे व इंगळे यांनी वडीलावरील कविता सादर करून सर्वांच्या हृदयाला हात घातला. राहुल बिराजदार यांनी महिलांच्या मासिक पाळीवरील कविता सादर करून वेगळ्या विषयाला हात घातला जावेद शेख यांनी श्रोते आणि कवी यांच्यातील धाग्यांवर भाष्य करत सुंदर कविता सादर केली सोबतच मयुरेश कुलकर्णी, योजनगंधा जोशी,डॉक्टर अपर्णा जगताप,श्रीधर खेडगीकर आणि जमालोद्दीन या कवींनी आपापल्या कविता सादर करून रसिकांना खिळवून ठेवले. या काव्य मैफिलीस माधव देशपांडे, अश्विनी तडवळकर, सोमशेखर चिनवार, बसवराज जमखंडी, गणेश पवार यांच्यासह मान्यवर रसिक व साकवचे सदस्य उपस्थित होते. या मैफिलीचे प्रास्ताविक जमादार यांनी केले. सूत्रसंचालन जावेद शेख यांनी केले. डॉ. जगदीश पाटील यांनी आभार मानले



# उबाठाचा ५९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जून-**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सोलापूर वतीने शिवसेना वर्धापन दिनानिमित्त सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिर येथे महाआरती करण्यात आली.

शिवसेना उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर प्रताप चव्हाण दत्ता माने शरणंराज केगनाळकर महेश धाराशिवकर नाना मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाआरती करण्यात आले. यावेळी शिवसेना जिंदाबाद शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे उध्दव ठाकरे झिंदाबाद सिध्देश्वर महाराज कि जय अशा घोषणा देऊन सदरचा भाग दणाणून गेला होता. यावेळी समस्या शिवसेना पदाधिकारी भगव्या टोप्या व शाल देऊन एकमेकांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सुरेश जगताप अनिल जाधव लहुजी गायकवाड शशीकांत बिराजदार अजय खांडेकर रवी म्हेत्रे संताजी भोळे चंद्रकांत मानवी धनराज जानकर विजय पुकाळे उज्वल दिक्षित सुशील उपलप संदीप बेळमकर सुधीर संगेपान कृष्णा सुरवसे जगदीश कलकेरी दत्ता खलाटे जगरिश मुल्ला लक्षात वाकसे दत्तात्रय रुचनभैरे रवि नाईक योगेश धनेवाल अदि शिवसेना पदाधिकारी उपशहरप्रमुख विभाग प्रमुख शाखाप्रमुख शिवसैनिक शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# जिल्हाधिकारी अशोक काकडेंच्या संवेदनशीलतेने विट्याच्या रेयांशला जीवनदान

**राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेतूनही मिळाले एक लाख पंच्याहत्तर हजार**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली, दि. १९ जून-**

रेयांश अवधूत पवार हा विटा येथील सहा वर्षांचा चिमुरडा.. इतक्या लहान वयात त्यानं जगण्यासाठी संघर्ष केलाय. एकदा नाही दोनदा हृदयाशी संबंधित जन्म जात दोषावर मात करण्यासाठी रेयांशची हृदयाला भिडणारी ही कहाणी योग्य वेळी योग्य लोकांची साथ मिळाली, तर कुठलीही लढाई जिंकता येते, हे सांगणारी समाजात अजूनही संवेदनशीलता जागृत आहे, याची उमेद जागवणारी होय. रेयांशचे वडील एका कापड दुकानात काम करतात तर आई गृहिणी. जन्मताच त्याला हृदयाला छिद्र असल्याचे समजले. अवघा दीड महिन्यांचा असताना त्याच्यावर



शस्त्रक्रिया करण्यात आली. सगळे काही ठीक चालले होते. आता तो शाळेतही जावू लागला.

जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या उपस्थितीत फेब्रुवारी महिन्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत इको शिबिर घेण्यात आले. या तपासणीत रेयांशच्या हृदयाची झडप छोटी असल्याचे आढळले. मात्र, त्याची तब्येत पाहता चार-पाच तज्ज्ञ डॉक्टरांनी संभाव्य जोखमीमुळे हात मागे घेतले. कारण स्पष्ट होते. बालकाच्या जीवाला धोका होता. लहानग्या वयात एवढी जोखमीची शस्त्रक्रिया करण्याची चिंता होतीच. शिवाय सगळ्यात मोठा अडथळा होता तो आर्थिक निधीचा, कारण शस्त्रक्रियेचा खर्च दहा लाख रुपये होता. पवार कुटुंबासाठी ही रक्कम उभारणे पूर्णपणे अशक्य होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांनी राष्ट्रीय बालस्वास्थ्य योजनेतून एक लाख पंच्याहत्तर हजारांची मदत तत्काळ मंजूर केली. पण उर्वरित आठ लाख पंचवीस हजाराचे काय? असा प्रश्न होता.

आमदार सुहास बाबर यांनी आरोग्य यंत्रणेशी संपर्क करून सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या. या टप्प्यावर जिल्हाधिकारी काकडे यांनी स्वतः पुढाकार घेतला. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेतून शस्त्रक्रिया होऊ घातलेल्या एम.आर.आर हॉस्पिटल ठाणेशी संपर्क साधून शक्य त्या सर्व मार्गाने उपचाराची रक्कम उभारण्याचे आवाहन रूग्णालय व्यवस्थापनाला केले. या आवाहनाला एम.आर.आर.रूग्णालय व्यवस्थापक योगेश खाचणे यांनी प्रतिसाद दिला. त्यांनी केलेल्या यशस्वी समन्वयातून उद्योजक, व्यावसायिक आणि समाजातील दात्यांकडून आठ लाख पंचवीस हजार रूपयांचा निधी जमा करण्यात आला. रेयांशच्या उपचारासाठी लागणारा पूर्ण खर्च उभारण्यात यश आले - विशेष म्हणजे, कुटुंबाला शस्त्रक्रियेसाठी एकही रुपया खर्च करावा लागला नाही. एम आरआर रुग्णालयातील बालहृदयतज्ज्ञ डॉ. सारंग गायकवाड, डॉ. निलेश बच्छाव यांनीही पालकांचे समुपदेशन केले आणि यशस्वी उपचाराची दिशा दाखवली. सांगलीतून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ प्रमोद चौधरी, कार्यक्रम सहाय्यक अनिता हसबनीस यांनी उमेद जागवली. महिनाभरापूर्वी रेयांशवर गुंतागुंतीची, जोखमीची शस्त्रक्रिया करण्यात आली. सकाळी आठ वाजता सुरू झालेली रेयांशची शस्त्रक्रिया रात्री साडेनऊ वाजेपर्यंत, म्हणजे तब्बल १३ तास चालली. डॉक्टरी कौशल्यामुळे शस्त्रक्रिया यशस्वी झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आणीबाणीतील स्वातंत्र्यसैनिकांच्या मानधनात १० हजाराची वाढ

## आता मिळणार दरमहा २० हजार रूपये मानधन; कै.विष्णुपंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली केला होता सत्याग्रह

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिव नगर, दि.१९ जून**

आणीबाणीच्या काळामध्ये संघर्ष करीत कै. विष्णुपंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस शहरातील अकरा जणांनी सरकारच्या धोरणांना विरोध करीत सत्याग्रह केला होता. यावेळी या अकरा जणांना ३० दिवस कारावास भोगावा लागला होता. या कारावास भोगलेल्यांना स्वातंत्र्य सैनिकाचा दर्जा देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली व त्यांना प्रथम पाच हजार व नंतर दहा हजाराचे मानधन देण्यात येत आहे. आता पुन्हा भाजप सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मानधनात दहा हजाराची वाढ करत आता महिन्याला वीस हजाराचे मानधन मिळणार आहे. तसेच जे स्वातंत्र्य सैनिक मयत झाले आहेत त्यांच्या वारसांना दहा हजाराचे मानधन मिळणार आहे. त्यामुळे या स्वातंत्र्यसैनिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



२५ जून १९७५ ला देशाच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी जाहीर केली .देशातील वृत्तपत्रे ,चळवळी,सभा ,बैठका घेणे यावर निर्बंध घालण्यात आले .देशामध्ये आणीबाणीला विरोध करणारे समाजवादी व संघाच्या विचारसरणीच्या नेते मंडळीना अटक करण्यात आली व तुरुंगात धाडण्यात आले. यावेळी माळशिरसचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कै विष्णुपंत विठ्ठलराव कुलकर्णी यांनी अनिल रुपचंद दोशी, विलास नामदेव पोरे, कै. विठ्ठल सखाराम शिंदे, बाळासाहेब रामचंद्र राऊत, सुधीर भगवान पंचवाघ, दत्तात्रय प्रभाकर पंचवाघ, बलभीम म हादेव पिसे, संभाजी भगवान आदट, संभाजी यशवंत यादव, दत्तात्रय हनमंत म स्के यांनी सरकार विरोधात घोषणाबाजी करीत शहराच्या मुख्य पेठेतून मोर्चा काढला होता. यावेळी त्यांना अटक करून ३० दिवस कारागृहात ठेवण्यात आले होते.

या अकरा जणांपैकी विष्णुपंत कुलकर्णी, विठ्ठल शिंदे, बलभीम पिसे, सुधीर पंचवाघ, दत्तात्रय पंचवाघ हयात नाहीत. ज्यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्यांच्यामुळे आम्ही हा सत्याग्रह केला ते कै विष्णुपंत कुलकर्णी व आमचे चार सहकारी आमच्यात नाहीत याची खंत सत्याग्रह केलेल्या सहा जणांनी व्यक्त केली.

# अक्कलकोटच्या विद्यार्थ्याचे पुनर्मुल्यांकनात वाढले गुण

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १९ जून -**

इंडियन मॉडेल स्कूलचा विद्यार्थी यथार्थ अप्पासाहेब पाटील याने मार्च २०२५ मध्ये दहावीची परिक्षा दिली होती. त्यामध्ये त्यास ९७.४० टक्के गुण मिळाले होते. परंतू त्याला गुण कमी मिळाल्याचे लक्षात आल्याने यथार्थ व त्याचे वडील आप्पासाहेब पाटील यांनी पुणे बोर्डाकडे पुनर्मुल्यांकनासाठी अर्ज केला. त्यानुसार उत्तरपत्रिका गुणांची बेरीज तपासणी व पुनर्मूल्यांकन करून तीन विषयात तब्बल अकरा गुणांची वाढ झाली आहे. त्यामुळे त्याची एकूण टक्केवारी ९९.८० टक्के इतकी झाली अन त्याचा राज्यात द्वितीय क्रमांक आला. विशेष म्हणजे ९९.८० टक्के गुण मिळवून शाळेचा नावलौकिकही वाढला.

यथार्थचे वडील आप्पासाहेब व आई ज्योती पाटील हे मैंदर्गी येथील श्री शिवचलेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत सहशिक्षक आहेत. इयत्ता दहावीचा निकाल १३ मे रोजी ऑनलाईन पद्धतीने जाहीर झाला होता. त्याला मिळालेले ९७. ४० टक्के गुण कमी असल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने सदरचा विद्यार्थी व पालकांनी निकालावर शंका व्यक्त करत बोर्डाकडे अर्ज केला. त्यांनी थेट ऑनलाईन पद्धतीने उत्तरपत्रिकेच्या गुणांची बेरीजसाठी व तीन विषयातील गुण वाढण्याच्या शक्यतेच्या आत्मविश्वासावर फोटोकॉपीची मागणी केली होती. बोर्डाकडून एक जून रोजी गणित विषयात मिळालेल्या ९८ गुणांची रितसर बेरीज तपासणी केल्यानंतर १०० पैकी १०० गुण असल्याचे आढळून आले. दोन विषयांच्या उत्तर पत्रिका फोटो कॉपी मागून त्याचे पुनर्मूल्यांकनासाठी पाठवण्यात आल्या. त्यामध्ये सुद्धा गुण वाढवून मिळाले. विज्ञानामध्ये ३ गुण, भूगोलामध्ये १ गुण आणि क्रीडामध्ये ५ गुण असे एकूण ११ गुण वाढल्याने एकूण ९७.६० टक्के ऐवजी ९९.८० टक्के झाल्याने तो बोर्डात द्वितीय आल्याची नोंद झाली आहे. गुण वाढीनंतर मूळ गुणपत्रिका संबंधित विद्यार्थ्याला मंगळवारी सकाळी मि ळाल्याने शाळा परिसरासह शहर व तालुक्यात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. पेढे वाटून अभिनंदन करण्यात आले.

> यथार्थ याने कोणत्याही प्रकारचा क्लास न लावता ९९.८० टक्के गुण मिळवले आहेत. आपल्या यशाबद्दल तो म्हणाला, 'नियमित अभ्यास आणि शेवटचे तीन महिने विशेष अभ्यास केला. पुढे विज्ञान शाखेत अकरावी करणार आहे. आयआयटी मधून इंजिनिअरींग करण्याचा मानस आहे. घरी आई-वडिलांसह आजी, आत्या मामा, मावशीबरोबरच शाळेतील शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन मोलाचे ठरले.



# वाशिंबेत कृषीदूत करणार कृषि जागरुकता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१९ जून-**

मिरजगाव येथील सद्गुरू कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी ग्रामीण कृषि जागरुकता व कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत वाशिंबे गावात दाखल झाले असून ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

कृषिदूत प्रविण लोंढे, गणेश गिड्डे, धनंजय ढाकणे, अभिषेक वाघ, अविनाश डोंगरे, प्रकाश यादव, प्रसाद गवळी यांचा समावेश असून ते शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. यावेळी डॉ.शंकरराव नेवसे, अध्यक्षा कल्यानीताई नेवसे, सचिव राजेंद्र गोरे, प्रशासकीय अधिकारी सखाराम राजळे, प्राचार्य डॉ.रामदास बिटे, समन्वयक प्रा. चांगदेव माने व प्रा.सचिन अढाव व इतर विषय तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. याप्रसंगी सरपंच तानाजी झोळ, उपसरपंच धोंडीराम कळसाईत, सागर होळकर, प्रदीप राऊत, प्रताप झोळ, प्रशांत वाळुंजकर उपस्थित होते.

# पुष्पा दडस यांना अहिल्यारत्न आदर्श माता पुरस्कार प्रदान



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १९ जून-**

अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट कराड व ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या वतीने भांबुर्डी (ता. माळशिरस) येथील पुष्पा सतीश दडस यांना राज्यस्तरीय अहिल्यारत्न आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कराड येथील यशवंतराव चव्हाण स्मृति सदन येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी आमदार रामहरी रुपनवर, ऑल इंडिया धनगर समाज दिल्ली महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण काकडे, सद्गुरु श्री श्री साखर कारखाना राजेवाडीचे चेअरमन बाळासाहेब कर्णवर, प्राथमिक शिक्षण संघाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष बळवंत पाटील, शाहुवाडीचे योगीराज गायकवाड, आरटीओ इन्स्पेक्टर सौरभ दडस आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमि त्त यावेळी आदर्श माता तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय, उद्योजक, आरोग्य सेवा, शिक्षण, प्रशासन अशा विविध क्षेत्रांम ध्ये कामगिरी करणाऱ्या १४६ कृतृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. श्रीमती पुष्पा दडस यांनी संयमाच्या बळावर कुटुंबाचे उत्कृष्ट पालन पोषण केले मुलांना उच्चशिक्षण संस्कार व चारित्र्याचे भान देऊन त्यांच्या जीवनाला योग्य दिशा दिली. त्यांची तीनही मुले उच्चशिक्षित असून ज्येष्ठ कन्या शैला मदने बारामती मध्ये शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे, द्वितीय कन्या सायली वाघमोडे अमेरिकेमध्ये स्थायिक आहे तसेच मुलगा सौरभ दडस एमपीएससी मध्ये यश मि ळवून सांगली येथे आरटीओ इन्स्पेक्टर म्हणून कार्यरत आहे. त्या अनुषंगाने श्रीमती पुष्पा दडस यांना आदर्श माता या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी बाळासाहेब खरात, उत्तमराव गलांडे, अशोकराव शेंडगे, विजय वाटेगावकर, हनुमंतराव दुधाळ, शंकर विरकर, आबासाहेब गावडे, संभाजी काकडे, एम.डी. दडस आदी उपस्थित होते

# माचणूर येथे बेकायदा वाळू उपसा; जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१९ जून-**

माचणूर येथील भीमा नदी पात्रातून अवैधरित्या मोठया प्रमाणात वाळू उपसा सुरू असून नदीपात्रात मोठे खड्डे पडल्याचे विदारक चित्र आहे. या वाळू उपशाकडे महसूल प्रशासनाची डोळेझाक होत असल्याने शासनाच्या मालमत्तेवर वाळू तस्करांचा दिवसाढवळया दरोडा पडत असल्याने सुज्ञ नागरिकातून महसूलच्या कारभाराविषयी संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तात्काळ लक्ष घालून शासनाच्या मालमत्तेची होणारी चोरी तात्काळ थांबवावी अशी मागणी होत आहे.

> माचणूर भिमा नदी पात्रात दिवस रात्र मोठया प्रमाणात वाळू उपसा सुरू असून महसूल कर्मचार्यांचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष आहे. मोटारसायकलद्वारे ही वाळू चोरी केली जात आहे. नदी पात्रात वाळू उपशामुळे मोठाले खड्डे पडले आहेत. तात्काळ वाळू चोरी थांबवावी.
>
> **- प्रताप पाटील, ग्रामस्थ, माचणूर**



माचणूर गावालगत भिमा नदी असून भिमा नदीमधील पाणी कमी झाल्याने वाळू तस्करानी या वाळूवर डोळा ठेवला आहे. वाळू तस्कर मोटर सायकल व वाहनाम धून या वाळूची रात्री व दिवसा चोरी करत आहेत. परिणामी नदी पात्रात जागोजागी मोठाले वाळूचे खड्डे पडल्याचे विदारक चित्र आहे. वाळू तस्कर वाळूची चोरी करीत असल्याची माहिती संपूर्ण परिसराला माहित होत असताना महसूल खात्याच्या अधिकारी व कर्मचार्यांना कशी काय होत नाही. हे न उलगडणारे कोडे असल्याच्या प्रतिक्रिया परिसरातील नागरिकातून व्यक्त होत आहेत. मध्यंतरी मोठया प्रमाणात नदीला पाणी आल्यामुळे वाळू पाण्याखाली गेली होती. सध्या नदीच्या पाण्याची पातळी खालावल्याने वाळू उघडी पडल्याने वाळू तस्कर याचा फायदा घेत आहेत. वाळू तस्करी ही संगनमताने सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# पिंपळनेरसह करकंब कारखान्यात मील रोलर पूजन

## विठ्ठलराव शिंदे कारखाना दोन्ही युनिटचे २६ लाख टन गाळपाचे उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१९ जून-**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथील गाळप हंगाम २०२५-२६ ची पुर्वतयारी सुरू असून या कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर येथील मील रोलर पुजन माढा पंचायत समितीचे मा.सभापती तथा संचालक विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते व युनिट नं.२ करकंब येथील मील रोलर पूजन व्हा. चेअरमन वामनराव उबाळे यांच्या हस्ते दि.१९ जून रोजी कारखाना कार्यस्थळावर करण्यात आले.



> कारखान्याचे संस्थापक चेअरमन मा.आ.बबनराव शिंदे हे आजारपणातून लवकर बरे होऊन पुन्हा एकदा त्याच ताकदीने जनतेच्या सेवेत सक्रिय व्हावे यासाठी मील रोलर पुजन प्रसंगी उपस्थित सर्व मा.संचालक सदस्य व दोन्ही युनिटचे कारखाना अधिकारी व कर्मचारी यांनी श्री गणेशाची आरती करून देवाला साकडे घालून ईश्वराकडे प्रार्थना केली.

यावेळी संचालक निळकंठ पाटील, वेताळ जाधव, शिवाजी डोके, लक्ष्मण खुपसे, लाला मोरे, पांडूरंग घाडगे, सुरेश बागल, सचिन देशमुख, संदीप पाटील, पोपट चव्हाण, तज्ञ संचालक भरत चंदनकर, अशोक मिस्कीन कार्यकारी संचालक एस.एन.डिग्रजे, युनिट २ चे जनरल मॅनेजर पी.एस.येलपले, फायनान्स मॅनेजर डी.डी.लव्हटे, केन मॅनेजर एस.पी. थिटे, चिफ इंजिनिअर एस.डी.कैचे, डिस्टीलरी मॅनेजर पी.व्ही.बागल, चिफ केमिस्ट ए.के.जगताप, सिव्हील इंजिनिअर एस.आर.शिंदे, हेड टाईम किपर आर. एन.आतार, युनिट २ चे चिफ इंजिनिअर एस.एस.महामुनी, चिफ केमिस्ट बी.जे साळुंखे, मुख्य शेतकी अधिकारी आर. जे.पाटील, शेतकी अधिकारी बी.डी. इंगवले, असि. परचेस ऑफिसर एस.व्ही चौगुले, हेड टाईम किपर टी.ए.लोंढे, कामगार प्रतिनिधी अनिल वीर व इतर म ान्यवर उपस्थित होते. यावेळी संचालक विक्रमसिंह शिंदे म्हणाले, कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रति हंगामामध्ये विक्रमी गाळप होत आहे.

ऊस गाळप हंगाम २०२५-२६ साठी युनिट नं.१ पिंपळनेर येथे २० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ निश्चित केले असून आजअखेर ३१ हजार ४६३ हेक्टरची ऊस नोंद झाली आहे. तसेच युनिट नं.२ करकंब येथे आज अखेर ९ हजार १५१ हेक्टरची ऊस नोंद झाली असून ६ लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ निश्चित केले आहे. दोन्ही युनिटचे मिळून २६ लाख मे.टन गाळप होईल असे अपेक्षीत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यादृष्टीने आवश्यक ऊस तोडणी वाहतूकीचे करार करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच करार करणेत आलेल्या ट्रक, ट्रॅक्टर्स, बैलगाडी व ट्रॅक्टर टायरगाडीचे यंत्रणेस कारखाना धोरणाप्रमाणे तीन लाख रूपये प्रमाणे पहिला अॅडव्हान्स हप्ता अदा केला आहे. दोन्ही युनिटकडील सर्व कामे वेळेत पूर्ण करून गाळप हंगाम २०२५-२६ शासनाचे धोरणानुसार वेळेत सुरू करणार आहे. तसेच पुढील हंगाम यशस्वीरित्या पार पाडणेसाठी सभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांनी जास्तीत जास्त ऊस नोंदी कारखान्याकडे देवून हंगाम यशस्वी करणेसाठी सहकार्य करावे असे आवाहन व्हाईस चेअरमन वामनराव उबाळे व संचालक विक्रमसिंह शिंदे यांनी केले.

## महत्वाचे...



### अॅड. बादल यादव यांच्यातर्फे शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**पंढरपूर, दि. १९ जून-**

सामाजिक कर्तव्य म्हणून येथील अॅड. बादल यादव यांच्यातर्फे पंढरपूर शहरातील शाळा नंबर ६, शाळा नंबर ७, शाळा नंबर ९, शाळा नंबर १०, गौतम विद्यालय, विवेक वर्धिनी विद्यालय, खड्डा वस्ती शाळा तसेच अनेक विद्यार्थ्यांना वह्या व पेन वाटप करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या सामाजिक योगदानाबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. नगरसेवक संजय निंबाळकर, कृष्णा वाघमारे, दलीतमित्र दुर्यो धन यादव, समाजसेवक रामेश्वर सातपुते, संतोष सर्वगोड, युवा नेते उमेश सर्वगोड, राजाभाऊ देवकुळे, भोला साठे, दत्तात्रय यादव, अजित खिलारे, कबीर देवकुळे, संदेश कांबळे, पंढरीनाथ कदम, किरण अवघडे, बाळू मोरे, चंदू वाघमारे, निखिल गायकवाड, लखन खिलारे, वायदंडे, विशाल यादव, विनोद यादव, अमोल यादव यांची यावेळी उपस्थिती होती.

### मोहोळ येथे मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

**वाळूज, दि.१९ जून-**

मोहोळ येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहामध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मोहोळ तालुक्यातील म ागासवर्गीय विद्यार्थिनींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृह गृहपाल के. जी. उतकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. वसतिगृह प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी वसतिगृहामध्ये ऑफलाईन अर्ज सादर केलेले आहेत, त्यांनीही पोर्टलद्वारे प्रवेश अर्ज ऑनलाईन भरणे बंधनकारक आहे. वसतिगृह प्रवेशासाठी अर्जासोबत गुणपत्रिका, पालकांचा चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड प्रत, रहिवासी दाखला, बँक पासबुक पहिल्या पानाची प्रत, शाळा सोडल्याचा दाखला, बोनाफाईड, शैक्षणिक शुल्क भरणा पावती, गॅप सर्टिफिकेट (शिक्षणात गॅप असल्यास) व रेशन कार्ड प्रत इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. वसतिगृह पात्र विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा मोफत स्वच्छ निवासगृहे, नाश्ता, सकस आहार, शुद्ध पिण्याचे पाणी, क्रीडा साहित्य, पाठ्यपुस्तके दिली जाणार आहेत. तसेच सीसीटीव्ही सुरक्षारक्षकांची उपस्थिती याव्यतिरिक्त निर्वाहभत्ता प्रति माह ६०० रुपये विद्यार्थ्यांना दिला जातो.



### पिलीवमधे शालेय साहित्याचे वाटप; आ.जानकरांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार

**पिलीव, दि. १९ जून-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील संग्राम दोस्ती मंडळाच्या वतीने आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणीक साहित्याचे वाटप व दहावी - बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करणयात आला. यावेळी नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच अमोल मदने-पाटील, माजी उपसरपंच नानासाहेब देशमुख, शिवामृत दुध संघाचे संचालक दादासाहेब शिंगाडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शिवराज पुकळे, माजी ग्रामपंचायत सदस्य जीवन गुरव, राजेंद्र जामदार, कल्याण जावळे, उमेशभाऊ सरवदे, अशोक बगाडे, पुनमताई भैस, संतोष पडळकर, कदीरखान पठाण, सचिन पुकळे, संग्राम मंडळाचे अध्यक्ष अतुल भैस, जिशान शेख, शशिकांत लोखंडे, रणजित काळे, सागर भैस, सुरज कस्तुरे, बाबा सय्यद, मारुती शेंडगे, अरमान शेख, अमीर शेख, संतोष खेत्रे, वसिम आतार, युवराज गायकवाड, दामोदर धायगुडे, समीर पठाण, हुसेन शेख, वाहीद सय्यद, दिगंबर भैस ,शरद लोखंडे, अमन सय्यद, यासीन पठाण, वाजीद शेख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संग्राम मंडळाने गेल्या अनेक वर्षापासूनची परंपरा कायम जपली आहे. सुत्रसंचालन कदीरखान पठाण यांनी केले. तर आभार अमीनखान पठाण यांनी मानले.



### विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाचे मोठे समाधान

**निवृत्त प्रा. डॉ.आडवितोट : सेवापूर्ती सत्काराप्रित्यर्थ मनोगत**

**अक्कलकोट, दि. १९ जून-**

येथील सी.बी.खेडगी महाविद्यालयात प्राध्यापक व प्राचार्य म्हणून ३० वर्षांच्या काळात विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव देवून योग्य मार्गदर्शन करता आल्याचे मला समाधान असल्याचे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राचार्य कॅप्टन प्रा.डॉ.शिवराया आडवितोट यांनी केले. श्रीवटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्यावतीने चेअरमन महेश इंगळे यांनी प्रा.डॉ.आडवितोट यांच्या सेवापुर्ती प्रित्यर्थ श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून सत्कार केला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रा. शिवशरण अचलेर, अशोक कलशेट्टी, रमेश बाडगंडी, सुनिल कटारे, प्रशांत जाधव, प्रतिक आडवितोट, बापू गुज्जा, श्रीकांत मलवे, गिरीश पवार, सागर गोंडाळ, विपूल जाधव उपस्थित होते.

## महत्वाचे...

### रविवारी पंढरपुरात सायकल वारी संमेलनाचे आयोजन

**पंढरपूर, दि.१९ जून -**

चतुर्थ अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी संमेलनाचे येत्या रविवारी (ता.२२ जून) आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाचे अध्यक्षस्थान युटोपियन शुगर्सचे सर्वेसर्वा तथा उद्योजक उमेश परिचारक हे भूषविणार आहेत. या संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आणि महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे उपस्थित राहणार आहेत. पंढरपूर सायकलर्स क्लब, नाशिक सायकलिस्ट व बारामती सायकल क्लब आयोजित व लातूर सायकलिस्ट क्लब प्रायोजित चतुर्थ अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल वारी संमेलन २०२५ चे आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर येथे खास आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनास लातूर सायकलिस्ट क्लबचे अध्यक्ष श्रावण उगले, नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनचे कार्याध्यक्ष राजेंद्र वानखेडे, बारामती सायकल क्लबचे अध्यक्ष अँड. श्रीनिवास वायकर यांची देखील उपस्थित राहणार आहे. विशेष म्हणजे या संमेलनास नागपूर येथील १९ वेळा आयर्न मॅन किताब पटकाविलेले अमित समर्थ यांची देखील प्रमुख उपस्थित असणार आहे. या शिवाय विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे हे देखील उपस्थित राहणार असल्याचे परिचारक यांनी सांगितले.

**संमेलनातील कार्यक्रमाची अशी आहे रुपरेषा**

येत्या रविवारी भागवत एकादशीच्या दिवशी (ता.२२ जून ) सकाळी ६ ते १२.३० या वेळात हे संमेलन संपन्न होणार आहे. सुरुवातील सकाळी सहा वाजता पंढरपूर येथील नगरप्रदक्षिणा मार्गावरुन सायकलवरुन नगरप्रदक्षिणा केली जाणार आहे. त्यानंतर ७.३० ते ९ या वेळेत येथील रेल्वे मैदानावर खास सायकल रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९.३० ते १२.३० या वेळेत शहरातील आरती मंडप प्रांगण, एलआयसी कार्यालया समोर भक्तीमार्ग पंढरपूर येथे मुख्य सायकल संमेलनाचा कार्यक्रम आयोजिण्यात आले आहे.





### संतश्रेष्ठ गजानन महाराज पालखीला शहरात खड्ड्यांचे अन् कचऱ्याचे विघ्न

**सोलापूर, दि.१९ जून**

**महापालिकेने तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी**

तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी वारीसाठी शेगाव येथून संतश्रेष्ठ ब्रह्मांडनायक श्री गजानन महाराजांची पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. अनेक गाव आणि जिल्हे पार करून सदरची पालखी ही महिना अखेरीस सोलापुरात दाखल होणार आहे. पालखी मार्गावर खड्ड्यांचे विघ्न निर्माण झाले आहे. श्रीं ची पालखी तुळजापूर नाका ते जोशी गल्ली ते रूपाभवानी चौक ते तुळजापूर वेस चौक ते शिवागंगा मंदिर मार्गे रात्री मुक्कामी कुचन प्रशालेत आहे. सकाळी रूपाभवानी मंदिर चौकात पालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पूजन होणार आहे. त्याच परिसरात कचरा डम्पिंगच्या कचऱ्यामुळे सर्वत्र अस्वच्छतेचे आणि घाणीचे साम्राज्य आहे. पालखीतील वारकरी, टाळकरी व भक्तगण या भागात आल्यावर फराळ घेत असतात. परंतु दुर्गंधीमुळे सोलापूरची प्रतिमा मलिन होण्याची शक्यता आहे. पालखी मार्गांवरील खड्डे बुजवणे, कचरा साफसफाई, आजोरा काढणे,दिवाबत्ती व ड्रेनेज, गटारी साफ त्वरित करण्याची मागणी आहे. सदरची कामे न झाल्यास आंदोलनाचा इशारा माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी दिला आहे.

# वारकरी सेवा रथ पंढरीकडे मार्गस्थ

- शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचा उपक्रम
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून भगवा सिग्नल; सेवा रथाचे यंदा दुसरे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जून -**

आषाढी वारीनिमित्त शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या वतीने पाठवण्यात येणाऱ्या वारकरी सेवा रथाला शिवसेनेचे प्रमुख नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदें कडून भगवा झेंडा दाखवून रथ पंढरपूरकडे मार्गस्थ झाल्याची माहिती शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय म हाराज यांनी दिली.

**काय आहे नेमका वारकरी सेवा रथ उपक्रम**

वारकरी संप्रदायाची सेवा म्हणजेच पांडुरंगाची सेवा, या भावनेतून शिवसेना पक्ष यंदाच्या पंढरपूर वारीसाठी पूर्णतः सज्ज झाला आहे. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रेरणेने, आणि खासदार डॉ.श्रीकांत दादा शिंदे यांच्या मार्गदर्शनाने, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या माध्यमातून 'वारकरी सेवा रथ' उपक्रमाचे हे दुसरे यशस्वी वर्ष साजरे होत आहे.

**अध्यात्म आणि जनजागृतीचा समन्वय**

शासकीय योजनांची माहिती. प्रबोधनात्मक कीर्तन व वासुदेव, गोंधळी माध्यमातून जनजागृती.शिवसेनेच्या सामाजिक कार्याचा प्रसार सेवा रथातून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या विविध जनहित योजनांचा परिचय व लाभ वारकऱ्यांपर्यंत थेट पोहचवण्याचे कार्य या उपक्रमाद्वारे केले जात आहे.



**वारकऱ्यांसाठी 'सेवा, संस्कार आणि समर्पण ' यांचा संगम**

वारकरी सेवा रथ उपक्रम अंतर्गत पायी चालणाऱ्या लाखो वारकऱ्यांना शारीरिक आणि मानसिक दिलासा देणाऱ्या पुढील सेवा दिल्या जाणार आहेत: कापडी बुटांचे वाटप - फोड, जखमा आणि वेदना टाळण्यासाठी. विशेष ट्यूब्स - चालताना पायांवर होणाऱ्या घर्षणावर त्वरित आराम.रेनकोट व छत्र्या - पावसाळी हवामानात संरक्षणासाठी.हँडबॅग्स - टाळ, ग्रंथ व साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी. औषध व गोळ्यांचा पुरवठा - प्राथमिक आरोग्य सेवा. शुद्ध पिण्याचे पाणी व इतर मूलभूत सुविधा

**संपूर्ण महाराष्ट्र व्यापणारा उपक्रम**

हा उपक्रम केवळ एखाद्या पालखीपुरता मर्यादित न राहता, महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पालखी सोहळ्यांत कार्यरत राहणार आहे. वारकरी संप्रदायातून या उपक्रमाचे भरभरून स्वागत होत असून, हा उपक्रम वारकऱ्यांच्या मनामनात शिवसेनेच्या कार्याचा ठसा उमटवणारा ठरणार आहे. यामध्ये खासदार डॉ.श्रीकांत शिंदे फाउंडेशन, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, वारकरी संप्रदाय युवा मंच, ज्ञानपीठ गुरुकुलम, विश्वात्मक लोकसेवा फाउंडेशन, रोस्ट्रम सोशल ऑरगनायजेशन , सोशल रिस्पॉन्सब्लीटी आदी संस्थांचा सहभाग असल्याची माहिती शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांनी दिली.

**समर्पित संघटनात्मक सहभाग**

वारीतील वारकऱ्यांना विश्रांती स्थळी पायाची मॉलिश देण्यासाठी शिवसेना स्वयंसेवक तत्पर असणार आहेत. हजारो स्वयंसेवक, युवासेना, महिला आघाडी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, व सकल अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सेवा रथासोबत वारीत सहभागी होणार आहेत. शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांच्या नेतृत्वात ११२ प्रमुख सदस्यांची टीम या अभियानाला दिशा देत आहे. सर्व दिंड्यांसाठी या सेवा समर्पित असणार आहेत.





# मानाच्या दहा पालख्यांतील भाविकांसाठी १०० रुग्णवाहिका

**यंदा भाविकांच्या वैद्यकीय मदतीसाठी खास अँपची निर्मिती**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जून -**

आषाढीवारी साठी पालखी सोहळ्यासोबत पायी चालत येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी शासनाचा १०८ अत्यावश्यक वैद्यकीय सेवा विभाग व राज्य आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे यंदा वारीसाठी मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवा उभारली आहे. यावर्षी प्रथमच १० मानाच्या पालखी सोहळ्यांसोबत १०० पेक्षा अधिक रुग्णवाहिका सज्ज करण्यात आल्या आहेत. काही रुग्णवाहिका कार्डियाक (हृदयविकार ग्रस्तांसाठी) सुविधा असलेल्या आहेत.

यंदा आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रुग्णवाहिकेत एक डॉक्टर व चालक सज्ज राहणार असून, त्यांच्याजवळ अत्यावश्यक औषधाचा मुबलक साठा उपलब्ध राहणार आहे. देहू ते पंढरपूर (जगद्गुरु संत तुकाराम महाराज), आळंदी ते पंढरपूर (संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज), सासवड ते पंढरपूर (संत श्री सोपानकाका महाराज) आणि इतर सात मानाच्या पालख्यांबरोबर १०८ रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आल्याची माहिती सोलापूर जिल्हा व्यवस्थापक डॉ. अनिल काळे यांनी दिली. तसेच आरोग्य विभागाने यावर्षी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत 'समारिटन' नावाचे मोबाइल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वारकऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीसाठी त्वरित संपर्क साधता येणार आहे. ॲपवर आलेल्या माहितीवरून रुग्णवाहिका चालकाला रुग्णाचे ठिकाण अचूक कळणार. यामुळे वारीतील रुग्णांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळून रुग्णाच्या जीवितास धोका कमी होण्यास मदत होणार आहे. 'समारिटन' हे ॲप शासनाच्या आरोग्य विभाग आणि एसपीईआरओ या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आले आहे. ॲपल स्टोअर आणि गुगल प्ले स्टोअरवरून ते मोफत डाउनलोड करता येते. या ॲपमुळे केवळ रुग्णवाहिकेशी संपर्कच साधता येणार नाही, तर प्राथमिक उपचाराची माहितीही यामध्ये दिली आहे. त्यामुळे रुग्णवाहिका पोहोचण्यापूर्वी रुग्णाला काही आवश्यक मदत दिली जाऊ शकते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने व १०८ चे मुख्य अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर शेळके यांच्या मार्गदर्शनाखली जिल्ह्यात वारकरी -भाविकांना पालखी मार्ग, तळांवर तसेच पंढरपूर शहरात आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचेही डॉ. काळे यांनी सांगितले. रखुमाई सभागृह पोलीस संकुल, पंढरपूर येथे 'समारिटन' मोबाईल ॲप तसेच कार्डिओपल्मोनरी रिसक्सिटेशन (सीपीआर) या बाबतचे प्रशिक्षण पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले,पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, पुणे जिल्हा व्यवस्थापक डॉ. प्रियांक जावळे, प्रशिक्षक डॉ. साक्षी पोटदुखे, डॉ.वैभव भिंगारे, १०८ चे सहा.व्यवस्थापक सुनिल चव्हाण, दिलीप शिंदे तसेच पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# आषाढी यात्रेनिमित्त धावणार मिरज-कलबुर्गी रेल्वे

**अशोक कामटे संघटनेच्या पाठपुराव्याला यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ जून-**



सकाळच्या सत्रामध्ये कोल्हापूर-कलबुर्गी एक्सप्रेस सुरू करण्याची मागणी सांगोला येथील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केली होती. या मागणीच्या अनुषंगाने मध्य रेल्वे कडून येणाऱ्या पंढरपूरच्या आषाढी यात्रेनिमित्त सकाळच्या सत्रात दि.१ जुलै पासून गाडी क्र.११०७/०८ मिरज-कलबुर्गी-मिरज दरम्यान स्पेशल १४ डब्यांची गाडी चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ही गाडी मिरज येथून दररोज पहाटे ५ वा निघेल व कलबुर्गी येथे दु.१.३० वा पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी कलबुर्गी इथून दु.३.३० वा सुटेल व मिरज येथे रा.११.५० वा पोहोचेल. या गाडीस आरग, बेळंकी, सलगरे, कवठेमंकाळ, लंगरपेठ, ढालगाव, जत रोड, म्हसोबा डोंगरगाव, जवळा, वासूद, सांगोला, पंढरपूर, मोडलिंब, कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, अक्कलकोट, दुधनी, गाणगापूर याठिकाणी थांबे देण्यात आले आहेत. ही गाडी सुरू झाल्यानंतर पंढरपूरच्या पांडुरंगाबरोबर, सोलापूरचे सिद्धेश्वर, तुळजाभवानी, अक्कलकोटचे स्वामी समर्थ तसेच गाणगापूरचे श्री दत्त यांचे दर्शन घेण्याची सुविधा होणार आहे.

> या रेल्वेस रेल्वे प्रशासनाकडून वेळापत्रकात दोन तासाचे लूज मार्जिन ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरहून रेल्वे मिरजेतून पहाटे ५ ऐवजी ७ वाजता सोडण्यात यावी. त्यामुळे प्रवाशाची सोय होईल. सर्व थांबे दिल्याने प्रवासात समाधानाचे वातावरण आहे. ती कायमस्वरूपी करण्यात यावी याकरिता रेल्वे विभागाकडे तिन्ही खासदार, डी आर यू सी सी सदस्य प्रयत्नशील व पाठपुरावा करत आहेत. तसेच प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेऊन प्रतिसाद द्यावा. **-निलकंठ शिंदे, अध्यक्ष, कामटे संघटना**

# वारकरीत बनतोय मॉडेल पालखीतळ

**संत ज्ञानेश्वरांच्या पालखी कट्याला ग्रॅनाईट तर सोपानकाका पालखीसाठी नविन कट्टा**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जून -**

राज्यातील सर्व पालखी सोहळ्यांचा शेवटचा विसावा असलेल्या वाखरी येथे प्रशासनाने मॉडेल पालखीतळ बनवण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार कामाचे नियोजन केले गेले आहे. याचाच भाग म्हणून वाखरी येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी कट्याला ग्रॅनाईटची सजावट केली जात आहे. तर संत सोपान काकांच्या पालखीसाठी नविन कट्टा बांधला जात आहे. ही दोन्ही बांधकामे सध्या अंतिम टप्प्यात आल्याची माहिती पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. आषाढी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी ज्ञानोबा, तुकोबांसह विविध संतांच्या पालख्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे.



पंढरपूरमध्ये आषाढी वारीच्या तयारीची लगबग सुरू आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी कट्ट्याचे जूने झालेले ग्रॅनाईट काढण्यात आले आहे. त्या ठिकाणी कट्याला आता संपूर्णपणे नव्याने ग्रॅनाईटने सजवण्यात येत आहे. सध्या हे काम वेगात सुरू आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी तळाच्या बाजूलाच संत सोपानकाका यांची पालखी विसावण्यासाठी यावर्षी नव्याने पालखी विसाव्याचा कट्टा बांधण्यात येत आहे. या कट्याचे देखील बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. यालाही संपुर्णपणे ग्रँनाईटचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. याबरोबरच वाखरी तळावर स्वच्छता, पाणी पुरवठा, पुरेशा विजेची व्यवस्था, शौचालयांची डागडूजी आदी प्रकारची कामे सध्या वेगात सुरु आहेत. येत्या सात ते आठ दिवसांमध्ये ही सर्व कामे पुर्णत्वास जातील. दरम्यान संपूर्ण वाखरी पालखी तळ हा मॉडेल पालखी तळ म्हणून विकसित करण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट असल्याचे देखील यावेळी मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

> पालकमंत्री जयकुमार गोरे तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सुचनेनुसार पालखी तळावर विविध कामे केली जात आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी कट्याचे सुशोभीकरण आणि संत सोपानकाका यांची पालखी विसाव्यासाठी या ठिकाणी नव्याने कट्याचे बांधकाम हाती घेण्यात आलेले आहे. येत्या आठवड्याभरात दोन्ही विसावा कट्यांचे काम पुर्ण होईल. **- महेश रोकडे,** मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

# आषाढी यात्रेसाठी पंढरीत होड्यांच्या डागडुजीची लगबग सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जून -**

आषाढी एकादशीच्या सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना आपल्या होडीतून चंद्रभागेची सफर घडवून आणण्यासाठी येथील कोळी बांधवांची आपल्या होड्या सज्ज करण्यासाठी सध्या लगबग सुरु असल्याचे दिसत आहे. येथील कोळी समाजातील सुमारे दोनशे ते अडीचशे कुटुंबांचा उदरनिर्वाह आजही होडी व्यवसायावरच अवलंबून आहे.

आषाढी, कार्तिकी तसेच इतर यात्रांच्या काळात येथे लाखो भाविक दाखल होतात. विठ्ठलाचे दर्शन घेवून चंद्रभागेची होडीतून सफर करण्याचा आनंद हा न्याराच असतो. येथील अनेक कोळी बांधव आजही होडी व्यवसाय करुन आपल्या कुटुंबांचा उदरनिर्वाह भागवितात. यात्रांच्या काळात चंद्रभागेला पुरेशा प्रमाणात पाणी असेल तरच या कोळी बांधवांना होडी व्यवसायातून चार पैसे मिळतात. येथे येणारे भाविक होडीतून चंद्रभागेच्या पात्रात असणाऱ्या विष्णूपद तसेच गोपाळपूर पर्यंत जाणे पसंत करीत असतात. होडीतून चंद्रभागेच्या विष्णूपद मंदिरा पर्यंत जाण्यायेण्यासाठी एका भाविकाला ७० ते ८० रुपये द्यावे लागतात. साधारणपणे होडी व्यवसाय करणारी सुमारे दोनशे ते अडीचशे कुटुंबे आजही येथे कार्यरत आहेत. या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय हा होडी चालविणे हाच असतो. त्यामुळे यात्रांच्या काळात चार पैसे मिळावेत यासाठी अगोदर पासूनच त्यांच्या होडीच्या डागडुजी करण्याची कामे सुरु असतात.

काही कोळी बांधव खास आषाढी यात्रेच्या अगोदर आपल्या जुन्या झालेल्या मोडकळीस आलेल्या होड्या मोडून नवीन होड्या देखील तयार करीत असतात. यात्रांच्या काळात जुन्या होड्या पेक्षा नवीन होड्यांमधून चंद्रभागेची सफर करण्यास परगावाहून येणाऱ्या भाविकांची जास्त पसंती असते. भाविक कुटुंबियां समवेत होडीत बसून सफर करीत असताना अगदी नदीपात्रात फोटोसेशन देखील करीत असतात. अनेक भाविक हल्ली मोबाईलवर सेल्फी देखील घेत असतात. या मध्येच काही हौशी भाविक होड्या चालविणाऱ्या कोळी बांधवांच्या जागेवर बसून स्वत: होड्या चालवित असल्याचे देखील फोटो काढून घेत असल्याचे येथील होडी व्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांकडून सांगितले जाते.

**आकर्षक घोड्यांचा मुखवटा**

होडीस पुढील बाजूस असलेल्या घोड्याच्या मुखवट्यामुळे होड्यांच्या रुबाबदारपणात चांगली भर पडत असते. होडीच्या लांबीवर घोड्याच्या मुखवट्याची उंची अवलंबून असते. होड्यांच्या घोड्याचे मुखवटे तयार करण्यासाठी देखील सागवान लाकडाचाच वापर केला जातो. सागवानावर केलेली कलाकुसर अधिक ठळकपणे दिसत असल्याने घोड्यांच्या मुखवट्यासाठी त्याच लाकडाचा खास वापर केला जातो.



**होडी बनविण्यासाठी मोठा खर्च**

साधारणपणे एक नवीन होडी तयार करण्यासाठी सध्याच्या महागाईच्या काळात लाखों रुपयांचा खर्च येतो. होडी तयार करण्यासाठी दर्जेदार सागवान लाकडांच्या फळ्यांचा उपयोग केला जातो. होड्यांची बांधणी करण्यासाठी खास तांब्यांच्या किंवा पितळी खिळ्यांचा वापर प्रामुख्याने केला जातो. जेणे करुन हे खिळे पाण्यात गंजू नयेत हाच या पाठीमागचा उद्देश असतो. एक होडी तयार करण्यासाठी महिना ते दीड महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे सध्या येथील कोळी बांधवांची जूऩ्या होड्यांच्या डागडूजी बरोबरच नवीन होड्यांची कामे पुर्ण करण्याची लगबग दिसून येत आहे.